''भारतीय रेल्वेने प्रवास करण्यात किती धोके असतात ? '' मित्राने प्रश्न केला.

''असंख्य '' मी ठाम उत्तर दिले .

'' ते खरं, पण काही सांग ! '' त्याचा आग्रह झाला.

''किती सांगू ? पहिलं म्हणजे आरक्षण असूनही जागा न मिळणे. चोरचिलटांचा व फेरीवाल्यांचा त्रास, असे किती तरी. सगळे कसे सांगायचे ? '' मी कंटाळून उत्तर दिलं.

''ते खरं रे ! पण अजून एक धोका; फार मोठा धोका असतो'' तो म्हणाला.

'' कसला?'' न रहावून मी उत्सुकतेने विचारले.

''अरे खरा धोका तोच आहे. भारतीय रेल्वेने भारतीय माणसे प्रवास करतात'' त्याने खाजगीतल्या आवाजात सांगितले.

''मूर्खच आहेस'' मी चिडून म्हटले, ''भारतीय रेल्वेने भारतीय नाही तर, काय अमेरिकन माणसे प्रवास करतील ?''

''तसं झालं असतं तर खरंच चांगलं झालं असतं.'' तो स्वप्नात असल्यासारखा बोलला, ''मग आपला सहप्रवासी काय बोलतो ते आपल्याला कळलं नसतं. मूर्खांची संगतसोबत टळली तरी असती.''

''कशाला स्वत:ला नावं ठेवतोस'' मी दिलासा देत म्हणालो.

''कळला रे तुझा विनोद. पण फारसा दाद देण्याजोगा नाही, आता बघ काय नग भेटतात भारतीय रेल्वेत.....'' तो पुन्हा थबकला.

''तू भलताच घायाळ झालेला दिसतोयस. एखाद्या नटीचा पीए बीए तर नाही भेटला तुला या वेळी'' मी चिमटा घेतला.

''छोडो यार ! कोण डँबीस होता कोणास ठाऊक.....'' तो भूतकाळातील उदासीनता जगत असल्यासारखा बोलला.

''अरे पण झालं काय ?'' मी.

''काय होणार सालं, चांगलं सेकंड क्लास ए.सी. चं तिकीट घेतलं, जागा पण मिळाली. आरक्षण असूनही मिळाली कां नाही मिळणार? त्या चार लोकांच्या कम्पार्टमेंटमध्ये आम्ही इन मिन दोघंच तर होतो.''

''मग तर आनंदात प्रवास झाला असेल. गर्दी नाही, पोरासोरांचा टँऽऽ टँऽऽ नाही, तुझा सहप्रवासी आणि फक्त तू. मस्त गप्पा झोडल्या असतील.'' मी त्याचा हेवा करीत म्हणालो.

''गप्पा? हं स्साला मूर्ख माणूस. मी, मीच मूर्ख तो बोलावा म्हणून वाट पाहत राहिलो. शेवटी बोलला. पण काय माहितेय?''

'' कसं माहित असणार रे ?'' मी प्रश्न केला. '' प्रवास तू करत होतास. नीट सांगशील तरच मला कळेल.''

''काय काय सांगू राजा ?'' तो अचानक प्रश्नार्थक बोलू लागला. ''तब्बल सात आठ तास प्रवास केल्यानंतर तो बोलला. म्हणजे त्याने प्रश्नच केला. सरळ सरळ प्रश्न !''

''कसला?'' मी गोंधळून विचारून गेलो.

''माणूस लग्न कोणाशी करतो ?''

त्याच्या स्वरातला कळवळा मला जाणवला. ''कोणाशी म्हणजे बायकोशी. माणूस बायकोशी लग्न करतो, अगदी सोपं उत्तर. तू सांगायचंस त्याला.'' मी म्हणालो.

''गाढवच सगळे. अबे माणूस बायकोशी लग्न करत नसतो. स्त्रीशी करत असतो. लग्न झाल्यानंतर स्त्री ही बायको होते.'' तो चिडत चिडत म्हणाला.

'' मग सांगायचंस तू त्याला.'' मी वरमलो.

''कसं सांगणार? तो मूर्ख माणूस. तो स्साला घूम्मा माणूस. तो स्साला.....''

तो पुढं फक्त गाढव हीच शिवी त्याच्या नावे मला सुनावणार हे कळून मी त्याला रोखत म्हणालो, ''........गाढव माणूस. पण तो म्हणाला काय ?''

''काय म्हणजे ? काय म्हणणार ? म्हणाला, माणूस लग्न एनसायक्लोपीडियाशी म्हणजे ज्ञानकोशाशी करतो; मला हे नवे ज्ञान आताच प्राप्त झाले आहे. आणि तो कम्पार्टमेंटमध्ये नाचू लागला. ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर बुद्धाने सार्थवाहाच्या तांडयाला हाका दिल्या नसतील तेवढ्या जोराने तो ओरडला. म्हणाला, '' गाडी थांबव, मला जगाला नवा संदेश द्यायचाय, गाडी थांबव..... राजा !'' तो थबकत म्हणाला, '' मेल्यानंतर पैसे नाही मिळाले तरी चालेल. पण, यापुढे मी भारतीय

रेल्वेने प्रवास करणार नाही.''

''नकोच करूस. त्यामुळे भारतीय रेल्वेच्या नावे शिव्या हासडणाऱ्यांची संख्या निदान एक ने कमी होईल. अर्थात किती तरी शून्य दशांश एकने.''

एखाद्या येडपटाकडे पहावे तसे माझ्याकडे पाहत माझा तो मित्र निघून गेला !

मित्र निघून गेला खरा. पण मला त्याच्या म्हणजे त्या अज्ञात पुरुषाच्या व्यवस्थाप्रवर्तक विधानाचे कोडे पडून राहिले. तसा तो नवीन असे काही बोलला नाही. पण ते विचार आपल्या बायकोसमोर बोलायचा सराव करण्यासाठी त्याने माझ्या मित्राचा माध्यम म्हणून उपयोग करून घेतला असावा. बिच्चारे; दोघेही बिच्चारे !!

जगाच्या लिखित इतिहासाला माहीत असलेले पहिले जोडपे आदाम आणि हव्वाचे. हव्वानेच आदामला बागेतील पहिले ज्ञानाचे फळ जबरदस्तीने खावयास लावले. ही गोष्ट माझ्या मित्राच्या सहप्रवाशाला सुचली असावी.... एकूण काय तर इतिहासासोबत विचाराची पुनरावृत्ती होत असावी ! होय ?

एदेन बागेवरून आठवले. महाराष्ट्रातील अकोला या जिल्हा ठिकाणी काही बगीचे आहेत. त्यातून बसस्थानकासमोर एक आहे.

एकदा बसला वेळ आहे (उशीर नव्हे !) म्हणून या बगिच्यात जाऊन बसलो. वेळ लोक बागेत येऊ लागल्याची. एक जोडपे येऊन माझ्या पाठीमागे बसले. त्याचं नुकतंच लग्न झालं असावं. कारण आपलं लग्न साक्षात ज्ञानकोशाशी झाल्याचा साक्षात्कार बिचाऱ्याला व्हायचा असावा. त्याने तिला विचारलं, '' का गं तुला तुझ्या माहेरगावी असलेल्या या बागेचा इतिहास आहे काही माहीत ? ''

'' तुम्हाला नसेल माहीत तर सांगू ?''

'' सांग ! '' तो म्हणाला.

ती सांगू लागली, '' या बागेचे नाव गांधी -जवाहर बाग आहे.''

''हे गांधी -जवाहर मुलगा आणि बाप असतील मग '' त्याने आपल्या समंजसपणाचे प्रदर्शन करावयाची संधी दवडली नाही.

''छट्'' तिने त्याची चूक त्याच्या तोंडी मारली. ''गांधी-जवाहर हे दोघे भाऊ-भाऊ होते. जवाहर

लहान व गांधी मोठे.''

''मग या बागेला जवाहर □गांधी बाग असे कां म्हणत नाही ?'' त्याला कसली तरी शंका आली असावी, पण तो विचारत होता चाचरत □चाचरतच.

मी आता सावध झालो. हे नवपरिणित जोडपे अगदी उच्चशिक्षित दिसत होते आणि त्यांच्या गोष्टी ऐकून माझ्या ज्ञानकोशात भर पडत होती. म्हणून तर मी जीवाचे कान केले आणि गाडी गेली तरी चालेल पण हे अगाध ज्ञान गाठीस बांधून घ्यावयाचे ठरविले.

पतीचा प्रश्न ऐकून ती म्हणाली, ''चला तुम्हाला बाग दाखविते. आणि सगळं सांगते.''

ते उठले. त्यांच्या नकळत मी त्यांचे बोलणे ऐकत होतो.

बागेत गांधी आणि जवाहरचे अगदी सुंदर पुतळे आहेत. पूर्णाकृती पुतळे करणाऱ्याचे कौतुक झाले असावे इतके ते खरंच सुंदर म्हणावे लागतील. पुतळ्याकडे पाहत तो तरुण विचारता झाला, ''आधी एक सांग राणी ! हे पुतळे भावाभावांचे कशावरून ?''

त्याचा प्रश्न तिला अज्ञानपूर्ण वाटला असावा. ती शिक्षकाच्या आक्रमकतेनं ठामपणे म्हणाली, ''कशावरून म्हणजे ? तुम्ही ते कालपरवा आलेलं गाणं ऐकलं नाही दूरदर्शनवर ? दोन आक्टोंबरला ?''

''तू घरात असतांना मी दूरदर्शनचं कांही ऐकतो कां?'' तो नमूपणे म्हणाला. नंतर भीत भीत म्हणाला, ''गाणं ऐकवू नकोस, नुसतंच सांग.'' स्वत:ची शोभा बागेत टाळण्याची ती केविलवाणी विनंती असावी.

''हं ! कळलं '' ती फणकारली. ''मला कुठं बागेत गाऊन बागकोकिळा व्हायचंय. पुरुषांना शिकवलेलं कळत नाही हेच खरं, असू दे.

फूलों की सेज छोडके दौडे जवाहरलाल
साबरमती के संत तूने कर दिया कमाल''

तो पुरुष सगळ्या पुरुषांसारखाच मोठा सोशिक असावा. तसाच थोडाफार बंडखोर व आपल्या ज्ञानावर थोडाफार विश्वास असणारा असावा. त्याने आक्षेप घेत प्रश्न केला, ''मला हे गाणं माहीत आहे. लग्नानंतर मी तुझंच गाणं ऐकतोय. (त्याला 'रडगाणं' तर म्हणावयाचं नसेल ?) पण या गाण्याचा आणि गांधी □जवाहर भाऊ भाऊ असण्याचा काय प्रश्न ? लवकर सांग, माझ्या डोक्यात दुसराही प्रश्न आहे.''

''अहो !'' तिने समजावणीचा सूर काढला, ''फूलोंकी सेज सोडून भाऊच भावासाठी दौडू शकतो. आय मिन पळू शकतो. इतिहासात त्याला साक्ष आहे. रामासाठी लक्ष्मणाने अशीच फूलोंकी

सेज सोडली होती.'' ती ठाम होत म्हणाली. ''आणि थांबा तुमचा प्रश्न जपून ठेवा. (टाळक्यात?) दुसराही एक जगभर पसरलेला पुरावा आहे म्हटलं माझ्याजवळ !''

'' कोणता ?'' तोही कडमडला.

'' गांधीला लोकं काय म्हणत होते?'' ती.

''बापू !'' तो.

'' आणि जवाहरलालला ?'' ती.

''चाचा !'' तो.

'' झालं तर मग ! बापू काका भाऊ भाऊ असणार नाहीत तर काय मेहुणे मेहुणे होतील ?'' तिने विजयी गुगली टाकली.

'' ते झालं गं'' तो हताशला असावा. म्हणाला, ''त्या गाण्यात साबरमतीचा उल्लेख आहे तिथले गांधी इथे विदर्भ महाराष्ट्रात कसे ? इथे विदर्भात सेवाग्रामला एक गांधीजी होतेच ना ? ''.

''कप्पाळ !'' न ठोकता ती डोळ्याने त्याला जरब देत म्हणाली. ''साबरमतीच्या आश्रमात जवाहरलाल पुन्हा पुन्हा जायचे कारण ते भाऊ होते.''

''आणि, सेवाग्रामला ?'' पुन्हा तो.

''इंदिरा गांधी जायच्यात कारण ते बापलेक होते.''

''काय ?'' तो भीतभीत पण न किंचाळता प्रश्नवाचक उद्गारला, ''इंदिरा गांधी गांधींची मुलगी होती ?''

''कसे हो तुम्ही अगदीच असे ? '' तिने त्रासिकपणे म्हटले, ''आता इंदिरा गांधी गांधीची लेक नसणार तर काय नेहरूची असणार ?''

आपले अज्ञान उघडे पडतेय हे दिसून पडलेले असतांना देखील तरुणाने बळ एकवटले व पुन्हा प्रश्न केलाच. तो ऐकून त्याला तरूण समजावे की विक्रमादित्याच्या गोष्टीतील वेताळ ? मला कळेना ! बिचारा सारखे प्रश्न विचारत होता, ''मग अकोल्यात पुतळा असलेल्या गांधीची समाधी कोठे आहे ?''

''कोठे म्हणजे साबरमती आश्रमात !'' ती सहजपणे म्हणाली.

''आणि सेवाग्रामच्या ?'' त्याचा आणखी एक प्रश्न.

''साहजिकच सेवाग्रामच्या आश्रमातच.'' ती.

''पण मी तर ऐकलंय की राष्ट्रपिता गांधींची समाधी राजघाटवर आहे ?'' वेताळोबा !

''आता तेही सांगावं लागणार की काय ?'' ती नाटकी नाराजीने म्हणाली.

''सांग ना ! काय हरकत आहे ?'' तो.

''अहो खरे तर ती कुण्या राष्ट्रपिता गांधीची समाधी नाही. रामाचा बाप रामपिता गांधीची समाधी आहे. गोळ्या लागल्यावर त्यांनी मुलाला हाक मारली. मदतीसाठीही असेल. किंवा प्रेमापोटीही असेल. म्हणून तर त्यांच्या समाधीवर हे राम... हे राम... हे राम...लिहून आहे. आता गांधीच्या एका मुलाचं नाव रामदास गांधी होतं. हे तरी माहीत आहे की नाही ?''

वेताळाला सगळी उत्तरं जणू मिळाली होती. पण तरीही त्या शंकाखोराने शेवटचा प्रश्न कौतुकाने केलाच. म्हणाला, ''तुला ही सगळी माहिती कुठून ?''

''मग काय विद्यापीठानं मला इतिहासाचं सुवर्णपदक फुकटच दिलंय ?'' ती अभिमानाने म्हणाली ! आणि त्या बिच्चाऱ्याने सैन्यभरतीच्या वेळी उमेदवार फुगवतात तशी छाती फुगवली.....

मी प्रवासात गाडी न चुकवता स्थानकावर बसून राहणारा प्राणी आहे. पण 'गांधी जवाहर बागेत' बसल्यामुळे गाडी चुकली. मी रेल्वे गाठली. तिकीट काढले प्रथम श्रेणीचे. गाडीत बसलो. दोघेजण बोलत होते. एक म्हणाला, ''तुला जिब्रानचा तो प्रसिद्ध कोल्हा आहे माहीत ?''

''नाही बा !'' तो अपराधी स्वरात म्हणाला, '' मी गावच्याच जंगलात कधी गेलो नाही. तर जिब्रानच्या जंगलात कसा जाईन ?''

''गाढवच आहेस'' उत्तर मिळाले. ''ते एका जगप्रसिद्ध कवि, लेखक, तत्त्वचिंतक व चित्रकाराचे नाव आहे, समजलास ?''

''असं म्हणतोस ?'' दुसऱ्याने प्रश्न केला. ''एवढा मोठा जगप्रसिद्ध कवि, लेखक, तत्त्वचिंतक व चित्रकार तुझा तो कोण खलिल जिब्रान आणि त्याने लिहून लिहून गोष्ट कोणावर लिहिली तर म्हणे कोल्ह्यावर ? तो नवसाहित्य काळातील होता कां रे ?''

''नाही रे, नवसाहित्य काळातील असता तर त्याची गोष्टही काढली नसती कुणी. जिब्रान तर सरत्या शतकाच्या सुरुवातीसच होऊन गेला. आणि अजूनही त्याचं साहित्य वाचलं जातं. ही कोल्ह्याची गोष्ट तर हमखास.''

आता कोल्हाकावळ्याच्या गोष्टीकडे कोण लक्ष देणाार? पण करतो काय बापडा मी ? ''पार्थासवे तुम्ही श्रोते'' असं कुणी म्हटल्याप्रमाणे मी ती गोष्ट ऐकू लागलो. ती अशी □

एकदा एक कोल्हा उंच टेकडीवर उभा होता. सूर्योदय झाला. कोल्ह्याने टेकडीकडे पाहिले तर त्याला स्वत:ची सावली खूप दूरवर गेलेली दिसली; तेव्हा तो स्वत:शीच म्हणाला, ''आज मी एवढा मोठा झालोय की, एखादा हत्ती खाईन तरच माझे पोट भरेल.''

कोल्हा मेलेला एखादा हत्ती सापडतो का म्हणून वणवण भटकला. दुपार झाली. त्याने खाली पाहिले तर त्याची इवलीशी सावली त्याला दिसली तेव्हा तो स्वत:शी म्हणाला, ''आता तर माझे पोट एखाद्या उंदराने देखील भरेल.''

''पुढे काय झाले ?'' ऐकणाऱ्या मित्राने प्रश्न केला.

''काय होणार ? गोष्ट संपली !'' पहिला.

''काय पण लोकं यार बकबक करतात.'' तो आता चिडला होता.आपल्यावर लादले गेलेले श्रोतेपण सपशेल नाकारत तो म्हणाला, ''साला ही काय जगप्रसिद्ध लेखकाची गोष्ट झाली ? गाढवा तो जिब्रान ठेव खिशात. यापेक्षा लाखमोलाच्या कोल्ह्याची गोष्ट तर मला माहीतेय.''

''असं म्हणतोस ?'' पहिल्या वक्त्याने पडते घेतले. तो म्हणाला, ''ऐकवच मग तुझा तो लाखमोलाचा कोल्हा.''

तो सांगू लागला, ''एका जंगलात राहणाऱ्या एका कोल्ह्याला एकदा खूप भूक लागली. भुकेने व्याकुळ होऊन तो वणवण भटकत होता. दुपार टळून चालली होती. नशिबाने त्याला एक मेलेला हत्ती दिसला. दुपारच्या रखरखत्या उन्हामुळे त्या मेलेल्या हत्तीचे तोंड वासले होते. कोल्ह्याने ते पाहिले. त्याला वाटलं बाहेर उभे राहून ही आपसूक मिळालेली शिकार का म्हणून खायची ? त्यापेक्षा या हत्तीच्या पोटात शिरून ही शिकार तोडायची.

कोल्हा पोटात शिरला. तो भरपूर खाऊन थोडावेळ पडावे म्हणून हत्तीच्या पोटात झोपी गेला.

सायंकाळ झाली. गारवा पडला. हत्तीचे उन्हामुळे वासलेले तोंड आपोआप मिटले गेले. त्यानंतर केव्हातरी कोल्ह्याला जाग आली. आपण अडकलो हे त्याने ओळखले.

आणि कोल्हा विचारात पडला. काही धडपड करून युक्तीने बाहेर पडलो नाही तर आपला मृत्यू अटळ आहे हे त्याने ताडले. व तो हत्तीच्या पोटातून हाका मारू लागला, ''मला वाचवा....''

कोल्हा खूप ओरडला. पण कोणी मदतीला येईना. शेवटी कोल्हाच तो. हार तरी कशी मानणार ? पुन्हा ओरडून रान दणाणू लागला, ''मला वाचवा, एक लाख देतो... मला वाचवा, एक लाख देतो.''

कोल्ह्याचे ओरडणे दोघा पांथस्थांनी ऐकले. त्यांना लोभ सुटला. सध्या एक लाख मिळतेय. वरती एक जीव वाचवण्याचे पुण्य ! सोडावयाचे तरी का ?

त्यांनी मरून पडलेल्या त्या हत्तीचे पोट फाडले. कोल्हा बाहेर पडला. त्याने त्या दोघा पांथस्थांचे आभार मानले. तेव्हा त्यातील एक म्हणाला, ‘‘आभार कसले मानतोस? दे आम्हाला आमचे एक लाख.’’

‘‘कोठले बाबा ?’’ कोल्हा धूर्तपणे हसत म्हणाला. ‘‘मी तर जंगलचा कोल्हा. मजकडे कसले असणार एक लाख. आम्ही वनवासातले आदिवासी. गरीबचे गरीबच. तरी पण माझे प्राण वाचविलेत म्हणून मी तुम्हाला लाखाची एक गोष्ट सांगू शकतो.’’

तेव्हा आपला हावरेपणा त्या दोघांच्या लक्षात आला. पण शेवटी लाख नाही तरी लाखाची गोष्ट तरी ऐकून घेऊ या असे वाटून तो म्हणाला, ‘‘सांग बाबा सांग !’’

कोल्हा म्हणाला, ‘‘तुम्ही गरीब, निर्बल असाल तर कधीही मोठ्याच्या पोटात शिरू नका.’’ आणि कोल्हा चालता झाला.’’

त्या दोघांनी मिळून कोणता कोल्हा लाख मोलाचा हे ठरविण्यापूर्वी माझे स्टेशन आले होते.

त्या प्रवासातून घरी आलो. थकलो तर होतोच. थोडसं जेऊन व थोडीशी घेऊन झोपलो.

सकाळी पेपर वाचत होतो. तेवढयात चहा ठेवत सौ. कानात म्हणाली, ‘‘ऐकलंत कां, शेजारी एक नवं भाडेकरू आलंय. त्यांच्याशी जरा जपून रहा.’’

‘‘कां ?’’ मी विचारलं, ‘‘ते चोर, दरोडेखोर, की खिसेकापू वगैरे आहेत ?’’

‘‘ते परवडले. पण हे परवडणार नाही.’’ तिचे ठाम उत्तर.

‘‘ते फार उधार मागणारे आहेत का ?’’

‘‘तसं असतं तर तेही परवडलं असतं !’’ □ती.

‘‘अहो पण काही सांगाल तर नां?’’ मी विचारले.

‘‘अहो ते चक्क वेडे आहेत वेडे. म्हणून इथे बदली झालीय म्हणे.’’

‘‘कोणी सांगितलं तुला हे?’’ माझा प्रश्न .

‘‘कोणी कशाला लागला सांगायला? ते स्वत:च सांगत सुटलेत मी वेडा आहे म्हणून’’ □ही.

‘‘असं असं, ठीक. मी लक्षात ठेवीन’’ मी म्हणालो.

म्हणायला म्हणालो. पण मनातून उत्तेजित झालो होतो. कोणी वेडा स्वत:ला वेडा म्हणवून घेत

नाही. मानतही नाही. तो तर इतर सर्वांना वेडा समजतो. मग हा स्वत:ला वेडा समजणारा माणूस नक्कीच शहाणा असला पाहिजे. मी शोध घेतला.

आणि मी थक्कच झालो. एक छंद जोपासल्यापायी लोक त्याला वेडा समजत होते. आणि आता तर बालपणापासून जपलेला छंद अपुरा राहील की काय? असे वाटून तो स्वत:ला वेडा म्हणवून घेऊ लागला होता. त्याचा छंद होता, 'भारतमातेच्या तुटून पडलेल्या गुलामीच्या बेडया शोधण्याचा.'

कधी कधी माणसं कशी झपाटून जातात ते कळत नाही.

१९४८ सप्टेंबर चा त्याचा जन्म. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उण्यापुऱ्या १३ महिन्यांनी.

५२-५३ साली तो शाळेत जाऊ लागला. शाळेत गुरुजी शिकवायचे, ''१५ ऑगष्ट १९४७ रोजी भारतमातेच्या गुलामीच्या बेडया क्रांतिकारकांनी तडातडा तोडून टाकल्या.''

२ री, ३ री, ४ थी, ५ वीत देखील सारखे तेच !...... तेच !!

त्याला विचार पडला, '' भारतमातेच्या त्या गुलामीच्या बेडया किती मजबूत, किती मोठ्या असतील ? म्हणून त्या तोडावयाला साऱ्या भारतीयांचे बळ लागले असेल ?''

वर्गात गुरुजी काय काय शिकवायचे. काय काय करायला सांगायचे. तो काळ बहुधा गुरुजींनी शिकवायचाच असावा. गुरुजींनी शिकवायचे सोडून केवळ शिकवणी घेण्याचा नसावा. तर त्याला एका गुरुजींनी काहीतरी छंद जोपासायला सांगितले. त्याने आनंदाने होकार दिला.

कुठला छंद पाळावा म्हणून तो विचार करू लागला. पोष्ट स्टॅम्पचा ? की, जुनी नाणी मिळवायचा ? चित्रकलेचा की फुलबाग फुलवायचा ? त्याने खूप दिवसांनी निश्चय केला. लोकांनी जोपासलेले छंद आपण का पाळायचे ? त्याने निर्णय घेतला आणि तो त्या गुरुजींकडे सुरुवात करावयाची परवानगी मागायला गेला. तेव्हा तो त्यांना म्हणाला, ''गुरुजी, मी लोकं पाळतात तसे छंद पाळणार नाही. मी एक आगळावेगळा छंद पाळणार आहे.''

''कसला ?'' गुरुजींनी आनंद व कुतूहलाने विचारले.

''भारतमातेच्या तुटून पडलेल्या बेडया शोधून त्या जमवण्याचा.'' त्याने एका दमात सांगितले.

गुरुजी विस्मयचकित झाले. त्याची ती कल्पना त्यांना विधायक मोलाची वाटली. ते म्हणाले, ''बाळ, तुझा निश्चय फार फार मोलाचा ठरो. या देशासाठी. येथील सर्व जनतेसाठी. माझे तुला आशिर्वाद आहेत. कारण आता मी बदलून जात आहे.''

भारतमातेच्या गुलामीच्या बेडया, क्रांतिकारकांनी तोडून टाकलेल्या बेडया, क्रांतिकारकांनी कोठे बरे टाकल्या असतील ? ज्यांना ज्यांना तो विचारायला गेला, त्यातील बहुतेक जण म्हणाले. ''आम्ही

आनंदात येवढे गाफील होतो की, भारतमातेच्या आम्ही तोडलेल्या गुलामीच्या बेडया कोठे पडल्या, कोणी उचलल्या, यापैकी आम्हाला काही एक ठावे नाही...... हां, तत्कालीन पोलिसांनी जप्त केल्या असतील तर पोलिसांच्या मालखान्याच्या जप्तीपुस्तकातून सापडू शकेल..... पहा प्रयत्न करून.'' काळ पुन्हा बदलत होता म्हणावे लागेल; लोक आता काही मदत करावयाचे सोडून प्रयत्न करावयास सांगू लागले असावे.

त्याने देशभरातील पोलिसांचे मालखाने तपासले. तेथील जप्तीनामे अभ्यासले. पण कोठेही जप्ती तर सोडा भारतमातेच्या बेडया तोडल्या गेल्याबद्दल साधा रिपोर्टही नव्हता. झाले, पोलीस सूत्रांनी सांगून टाकले, ''अशा कुठल्या बेडया कधी तुटल्याच नसाव्यात. नाही तर कोठे न कोठे निदान एफ.आय.आर. नोंदला गेला असता.''

पोलिसांचे उत्तर ऐकून तो कळवळला. भारतमातेच्या गुलामीच्या तुटलेल्या बेडया सांभाळू शकले नाहीत ते पोलिस कितपत कार्यक्षम समजावे ? त्याला कळेना.....

तो बोलायचा, लिहायचा तेव्हा लोकं त्याला बावळट समजू लागले.

एक दिवस त्याला पाठयपुस्तकातील एक कविता वाचावयास मिळाली.

''दक्षिण मे पैरों को धोता,
सागर राज विशाल है।''

कोणीतरी त्याला सांगितले, ही भारतमातेसंबंधी कविता आहे. झाले, त्याला पुन्हा उत्साहवायू झाला. त्याला वाटले, बेडया पायातच ठोकतात. मग भारतमातेच्या गुलामीच्या तुटून पडलेल्या बेडया दक्षिण भारतात सापडतील. तो दक्षिण भारतात गेला. खूप परिश्रम घेतले. पण उपयोग झाला नाही. भारतमातेच्या गळून पडलेल्या गुलामगिरीच्या बेडया तेथेही सापडल्या नाहीत. तो पुन्हा निराशला.....

एकजण त्याला म्हणाला, ''माझ्या माहितीप्रमाणे बेडया फक्त पुरुषांच्याच पायात टाकत असतात. स्त्रियांच्या हातातच बेडया ठोकण्याची पद्धत आहे.''

मग तो भारत मातेच्या चित्रात व नकाशात हात कुठे असावेत याचा अंदाज करून खूप खूप शोधत फिरला. तरी पण त्याला काही केल्या त्या सापडल्या नाहीत. त्याचे सदाचे हिरमुसलेपण व पुनश्च धडपड पाहून लोक त्याला वेडपट धडपडे म्हणू लागले.

अवघा भारत फिरून होईपर्यंत त्याचे लग्न झाले होते. कुठेतरी काहीतरी हरवल्यागत वागणारा पती पाहून त्याची सुविद्य बायको हबकली नाही. तिने प्रयत्नपूर्वक त्याला बोलता करून काय ते विचारले. त्याचे बोलणे ऐकून ती म्हणाली, ''तुम्ही येडे की खुळे ? साध्या साध्या गोष्टी समजून घेतल्या नाही

आणि निघाले आयुष्य घालवायला ! गडे !! ते इंग्रज होते ज्यांनी भारतमातेच्या हातात आणि पायात व कुठे कुठे बेडया घातल्या होत्या. त्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता म्हटलं ! आणि त्यातून ते जगभरात सभ्य म्हणून प्रसिद्ध. त्यांनी काय भारतमातेला लोखंडी साखळीने जखडले असेल ? अहो त्यांनी चांगल्या शुद्ध सोन्याच्या बांगडया व बेडया करून भारतमातेला घातल्या असतील. ते काही पेशवे नव्हते काचेच्या बांगडया भरून त्याचाही हिशेब पानिपतापर्यंत ठेवायला !''

पत्नीच्या बोलण्याकडे थोडे फार लक्ष देत असल्याचे दाखवत त्याने सहज म्हटले, ''मग ? म्हणून काय ??'' ''मग काय म्हणजे साधे गणित आहे.'' तिने निकराचा वार केला व त्याला कोलमडवीत म्हणाली, '' तुमची भारतमाता की कोण ती ? अखेर एक स्त्रीच ना ? स्त्रिया या मुळातच सोन्याच्या शौकीन व काही प्रमाणात आक्रमक हावऱ्या देखील असतात. मग सोन्याच्या त्या पारतंत्र्याच्या बेडया तुमच्या त्या भारतमातेनेच दाबल्या, चापल्या नसतील ते कशावरून ?''

तो निरुत्तर झाला. तिचा सगळा युक्तिवाद बिनतोडच होता. आपल्या सामान्य त्याच्यासाठी.....

काही दिवस तो ठीक राहिला. मग कुठल्याश्या एका आंदोलनाच्या काळात वृत्तपत्रात बातमी आली की, ''भारतमातेच्या गुलामीच्या बेडया तोडायला आमची संघटना सज्ज झाली आहे. आमचा निर्धार आहे की आम्ही त्या तोडू !''

संघटनेचे नांव जाहीर केलेले नव्हते. किंवा माहीत असूनही वृत्तपत्राने ते छापण्याचे मुळीच धाडस केले नव्हते.

त्याने त्या संघटनेचा शोध लावला आणि तिच्या प्रमुखाला भेटला. त्याची याचना ऐकून तो दया दाखवीत म्हणाला, ''महोदय, भारतमातेला पडलेल्या अनेक बेडया आहेत. मांसाहारापासून तर मंदिरापर्यंत आणि मस्जिदीपासून मद्यपानापर्यंत. तुम्हाला कुठल्या बेडया तोडावयाच्या आहेत सांगा ? म्हणजे पुढचे रास्त भाव बोलता येतील.''

''बाकी कसल्या नाही हो. आणि मला काही तोडफोड पाडझूडही करायची नाही'' तो काकुळतीने म्हणाला, ''मला फक्त १५ ऑगस्ट १९४७ रोजी तुटलेल्या भारतमातेच्या पारतंत्र्याच्या बेडया पाहिजेत. त्या कुठे आहेत तेवढेच सांगा.''

''कुठे म्हणून काय विचारता ? त्या जिथे होत्या तिथेच आहेत. त्या आम्ही तोडल्या हे सांगणारे खोटारडे. भारतमाता इंग्रजांच्या गुलामगिरीत होती असे प्रतिपादणारे सात खोटारडे. ती इंग्रजांची गुलाम नव्हे, गहाण होती. १५ ऑगस्ट ४७ ला ती स्वतंत्र नाही झाली; तिचे फक्त गहाणवटदार बदलले.'' त्या संघटनानेत्याच्या बोलण्याने तो हबकून गेला. तरी नेता बोलावयाचा थांबत नव्हता. म्हणाला,

''आमच्याकडे अशा असंख्य बेडयांची अधिकृत यादी आहे. त्यातून ज्याची गहाणवट सोडवायची असेल त्यासाठी रक्त, मत, पैसा काय देऊ शकता ते सांगा ?काम चोख करू. आता संघटना चालवायच्या म्हणजे काही ना काही घ्यावेच लागते ना ? अहो आजकाल साध्या साहित्यमंडळाच्या कारखान्यांना मिळणारे फंडदेखील अपुरे आहेत असे लोक म्हणतात. आम्ही तर बेडया तोडणारे बिनपगारी मजदूर संघटक..........''

''नेता साहेब'' तो मध्येच संघटनावाल्यास अडवीत म्हणाला, ''आपण बेडयांची जी यादी दिली त्यात तुमच्या संघटनांचा उल्लेख नाही हे माझ्या लक्षात आहे. मला एकच एक हवे आहे. भारतमातेच्या निखळून पडलेल्या बेड्या. पारतंत्र्याच्या बेडया. पारतंत्र्याला जन्म देणाऱ्यापेक्षा ते वाढवणारे अधिक घातक असतात......... त्यात कोणीही असू शकतात. तुम्हीच काय.......?''

काय झाले होते कोणास माहीत पण तो पुन्हा दिसला नाही. दुसरा एखादा असा शहाणा वेडा गृहस्थ दिसेल असे आता वाटेनासे झालेय........ असा शहाणा वेडा !!

शहाणा वेडा ! काय पण शब्द. आठवले. असेच एकदा कुठेतरी भाषणात बोललो, म्हणालो □

.... नेमका काळ सांगता येत नाही. पण तुकारामाला □देहूच्या तुकारामाला कळले की, उत्तरेत कोणी कबीर नावाचा मोठा सत्पुरूष राहत असतो. तुकारामाला वाटू लागले आपण या सत्पुरुष संताला याचि देही याचि डोळा बघावयास पाहिजे.

तुकारामाने तयारी केली. आणि एके दिवशी भल्या पहाटे हातात वीणा □चिपळया आणि खांद्यावर पडशी घेऊन तो निघाला. भल्या पहाटे असे तुकारामाचे निघणे पाहून काही कुटाळक्यांनी कुत्सितपणे विचारले, ''काय तुक्या कोठे निघालास ?''

तुकाराम म्हणाला, ''तिकडे उत्तरेत कोणी कबीर नावाचे मोठे सत्पुरुष राहतात म्हणतात. मी त्यांच्याशी बोलायला निघालोय.''

ऐकणाऱ्यांना गंमत वाटली. हा वेडा तुकोबा कबीरासारख्या थोर पुरुषाशी बोलणार तरी काय ? आणि त्याचे ऐकणार तरी कसे ?

झाले, एक एक करत कित्येक कुटाळके लोक तुकोबापाठी चालू लागले. केवळ गंमत बघावयाची म्हणून...... वेळ दवडत....

उत्तरेत एक वेडा कबीर जन्माला आलाय असा समज होता. तो एक दिवस प्रवासाचे सामान घेऊन भल्या पहाटे कुठेसा निघाला. लोकांना अचंबा वाटला. बावळट कबीर कुठं बरं निघाला असेल ? त्यांनी त्याला विचारले, ''कबीरा कबीरा कुठे निघालास?''

कबीर शांतपणे म्हणाला, ''तिकडे दक्षिणेत कोणी तुकाराम नावाचा साधुपुरुष झाला आहे म्हणतात. मी त्याच्याशी बोलावयास जात आहे.''

काहींनी आपसात म्हटले, ''या खुळचट कबीराला तुकारामासारख्या थोर पुरुषाशी बोलायचे सोडा, त्याच्या सावलीचे दर्शन तरी घडेल काय ? तो तुकाराम महाराज फार तर कबीराला बुकलणार !''

झाले उत्तरेकडील लोकांनी कबीराची फजिती पाहण्यात गंमत मानली आणि, तेही एक एक करत भल्या मोठ्या घोळक्याने कबीरापाठी चालू लागले.

तुकाराम उत्तरेकडे निघाला.

कबीर दक्षिणेकडे निघाला.

चालता चालता दोघे जवळ आले. पण मध्यात भल्यामोठ्या पात्राची नर्मदा पुराने दुथडी भरून आडवी आली. दोघेही एकमेकांकडे कसेबसे फक्त पाहू शकत होते. पण बोललेले एकमेकांना ऐकता येत नव्हते.

हतबल होऊन तुकाराम कबीराला अभिवादन करण्यासाठी जमिनीवर ओणवा होऊ लागला. कबीराने ते पाहताच तो जमिनीवर वाकला आणि हाती सापडलेला एक भला मोठा धोंडा उचलून वाहत्या नर्मदेच्या पुरात फेकून दिला. तुकारामाने ते पाहिले आणि तो बोंबा मारत परत वळला. कबीरही परत फिरला.

चिडलेल्या एका सोबतच्याने तुकारामाला दटावले, ''तुक्या, तू कबीराशी बोलायला आला होतास ना ?''

''बोललो'' तुकाराम शांतपणे म्हणाला.

''काय बोललास ? नुसत्या बोंबा मारल्यास.....'' चिडलेले सगळे म्हणाले.

''बोललो'' तुकाराम आणखीनच शांतपणे म्हणाला, ''आम्ही दोघं बोललो. त्यांनी दगड पुरात फेकून सांगितले, हे जग बुडत आहे. मी बोंबा ठोकून सांगितले की, मी बोंबलतो पण कोणीही ऐकत नाही तर मी काय करू ?''

लोक गप्प होऊन आपापल्या घरी निघून गेले.

हे ऐकून चिडलेल्या आमच्या ज्ञानकोशाने डोळे वटारत म्हटले, '' हे असलं काहीही बोलायला

व्याख्यानाला जात जाऊ नका. तुकारामाचं ऐकून लोक घरोघरी गेले असतील. पण तुमचं भाषण ऐकून लोक माझ्याच घरी येतील. म्हणतील अशा भलत्या बडबडयाचा संसार तुम्ही का करता ?''

''अगं भलतंच काय विधान करतेस ?'' मी अनुत्साहित होत म्हणालो.

''कुठलं भलतं विधान?'' ती फणकारली. अगदी समीक्षकाच्या माफक शब्दांत म्हणाली, ''भलती विधानं करता तुम्ही. समजलं ? म्हणे कबीर आणि तुकारामाची भेट झाली ! दोघांच्या काळातला शतकांचा फरक आहे माहीत ? आणि काय हो, नदीच्या पुरात उचलून फेकावयाचा दगड त्या आंधळ्या कबीराला नेमका कसा सापडला? ''.........

कबीर आंधळा होता ? मी तसा चिडत नाही. पण, लोकं कबीरालाच का आंधळा म्हणतात ? असेल तर असेल बिचारा.....

एकदा काय झाले की एक म्हैस, एक घोडी आणि एका आंधळ्या कोल्ह्याची मैत्री होती आणि त्यांच्या मैत्रीत सगळे आलबेल चाललेले होते.

म्हशीचे काम होते जे काही भेटेल ते खाऊन जास्तीत जास्त दूध देणे. ती ते करायची. पण, शेवटी मालक मालकच असतात. म्हशीच्या मालकाला वाटायचे की, म्हशीपेक्षा घोडी बरी. तिला चाराबिरा काही फारसा घालावा लागत नाही आणि ती आपले काम मात्र बरोबर करते.''

घोडीचे काम होते लादलेले सामान वाहून नेणे, पोहचवणे आणि फावल्या वेळात भेटेल तेव्हा भेटेल ते चरणे.

म्हैस व घोडी एकदा एकत्र आल्या. म्हशीच्या मालकाच्या शेतातच घोडीचा मालक रात्र झाली म्हणून थांबला.

मैत्रीण मैत्रीण असलेल्या म्हैस व घोडी एकत्र आलेल्या पाहून त्यांचा मित्र असलेला आंधळा कोल्हाही तेथे पोहचला.

गप्पाटप्पा झाल्या. मग म्हैस व घोडी दोघींनाही वेणा सुरू झाल्या. कोल्हा दोघींनाही मदत करू शकत नव्हता. कारण तो आंधळा होता. तो आपल्या गुहेकडे निघून गेला.

सकाळी झाले काय तर म्हशीचा मालक व घोडीचा मालक हे एकदाच मिळून तेथे पोहचले. पाहतात तर काय, म्हैस व घोडी दोन्ही जनलेल्या आहेत. पण घोडीखाली वगार व म्हशीखाली शिंगरू

उभे आहे.

झाले ! कसलीही बोलचाल न करता अत्यंत आनंदाने म्हशीचा मालक शिंगरू घेऊन निघाला. घोडीच्या मालकाने त्याला हरकत घेतली. तो म्हणाला, ''गृहस्था, हे माझ्या घोडीचं शिंगरू का नेतोस? तुझ्या म्हशीचं वगार का नेत नाहीस ?''

तो गृहस्थ म्हणाला, ''वेडा रे वेडा ! माझ्या व्यालेल्या म्हशीखाली शिंगरू आणि तुझ्या व्यालेल्या घोडीखाली वगार आपण दोघांनी पाहिली नाहीत काय? मग तू कसं म्हणतोस की तुझी घोडी शिंगरू जनली व माझ्या म्हशीनं वगार दिली ?''

आणि तो गृहस्थ आपली म्हैस व घोडीचे शिंगरू घेऊन निघून गेला.

घोडीचा मालक हतबल होऊन राजाकडे गेला. त्याने फिर्याद गुदरवली. राजाने म्हशीच्या मालकाला दरबारी बोलावले व आपल्या न्यायाधीशासमोर हजर केले.

कोर्टाच्या नियमानुसार फिर्याद करणाऱ्याने आपली बाजू मांडायची असा नियम आहे. घोडीच्या मालकाने आपले म्हणणे मांडले. त्यावर म्हशीचा मालक आपली बाजू मांडताना म्हणाला, ''सरकार, आम्ही दोघं घटनास्थळी पोहचलो तेव्हा याची घोडी व माझी म्हैस जनलेल्या होत्या. आम्ही पाहिलं की माझ्या जनलेल्या म्हशीखाली शिंगरू व याच्या जनलेल्या घोडीखाली वगार होती. म्हणून मी माझी जनलेली म्हैस व तिच्याजवळचं शिंगरू घेऊन गेलो. त्यात माझं काय चुकलं ?''

न्यायाधीशाने निवाडा दिला. ''घोडीखाली वगार आणि म्हशीखाली शिंगरू पाहिल्याचे दोन्ही मालक मान्य करतात. त्या अर्थी या गोष्टी सत्य मानल्या पाहिजेत. यात एकच कायदेशीर सूट फिर्याद करणाऱ्यास देता येईल की, घोडीने शिंगरू व म्हशीने वगार जनल्याचा पूत्यक्ष पुरावा समोर आला तर फिर्यादी पक्षाला त्याचे शिंगरू मिळू शकेल.''

घोडीचा मालक या निर्णयामुळे हतबुद्धच झाला. कारण हा निर्णय कोणा एका राजाचा नव्हता तर न्यायाधीशाचा होता. आता तो पुरावा आणणार तरी काय ? आणि कुणाचा ?

पण बोलक्याच्या भाषेचे वेगवेगळे अर्थ असले तरी, मुक्यांची भाषा नेमकीच कळत असते.

म्हैस व घोडी आंधळ्या कोल्ह्याकडे आल्या आणि त्यांनी सांगितले, ''आमचे बछडे एकमेकांकडे आहेत. आमचे सामंजस्य आहे म्हणून आम्ही त्यांना जपू. पण हा काय न्याय झाला ? हा आमच्या मातृत्वावर केवढा अन्याय. आम्ही पाहिलं तर परस्परांची पिलं एकमेकांना देऊन मोकळी होऊ शकतो. पण तुमचा हा कायदा आडवा येतोय बघ. आता सर्व संपलं.''

म्हैस आणि घोडीची अवस्था पाहून कोल्हा म्हणाला, ''घाबरू नका. तुम्ही तुमचे नेमके बछडे

जनल्याची साक्ष मी देईन.''

''देशील.... देशील....एकवेळा नाही हजार वेळा देशील, पण ऐकेल कोण ? आंधळ्याची खरी साक्ष कोण मानणार ?'' त्या दोघी निराशेने म्हणाल्या.

''ते तुम्ही माझ्यावर सोडा'' म्हणत कोल्हा तेथून निघून गेला.

आणि काही दिवसांनी घोडीचा मालक राजदरबारात हजर होत फिर्याद करू लागला, ''राजेश्री, माझ्या घोडीने शिंगराला जनले होते आणि त्या म्हशीने वगारच दिले होते हे पाहणारा पूत्यक्षदर्शी एक आहे.''

राजा म्हणाला, ''ठीक तर, मी उद्या म्हशीच्या मालकाला पण बोलावून घेतो. पण एवढं सांग तुझा तो साक्षीदार कोण आहे?''

''एक आंधळा कोल्हा....'' काहीसा चाचरत घोडीचा मालक म्हणाला.

''मूर्ख आहेस?'' राजा कडाडला, ''आंधळ्याची साक्ष प्रत्यक्षदर्शी म्हणून कशी दरबारी मान्य होईल ?''

''क्षमा ! क्षमा ! त्रिवार क्षमा महाराज !! पण तो आंधळा कोल्हा म्हणतो की, त्याने घोडी व म्हशीला जनतांना पाहिले आहे !'' तो घोडी मालक म्हणाला.

''ठीक ! ठीक !'' राजा गालात हसत म्हणाला, ''उद्या आमच्या राजन्यायाधीशाकडे त्या लबाड आणि आंधळ्या कोल्ह्याची साक्ष तपासू. खरा निघाला तर तुला घोडीचे शिंगरू परत मिळेल.''

दुसरे दिवशी राजाचा दरबार भरला. कोल्ह्याच्या विनंतीवरून त्याजसाठी एक खुर्ची दरबारात ठेवण्यात आली. कोल्हा तीवर बसला. सर्व दरबारी हजर झाले. न्यायाधीश पण आले. फिर्यादी आरोपीही हजर झालेले पाहून भालदार चोपदारांनी ललकारी दिली. राजा राजसिंहासनावर येऊन बसला.

आता सर्वांचे लक्ष कोल्ह्याकडे लागले. तो आता साक्षीला सुरुवात करणार असेच सर्वांना वाटत होते. पण झाले ते भलतेच. साक्षी द्यावयास दरबारात आलेला कोल्हा खुर्चीवर बसून डुलक्या देत होता. त्याची साक्ष ऐकण्यासाठी लोकांची अधीरता वाढत चालली होती.

ते सगळे पाहून राजाला राग आला. राजाने कोल्ह्याला तंबी दिली. राजा म्हणाला, ''कोल्ह्या, कोल्ह्या तू दरबारात साक्ष द्यावयास आला आहेस की झोपा काढावयास ?''

''क्षमा महाराज !'' कोल्हा आळसावल्या स्वरात म्हणाला, ''रात्री समुद्राला आग लागली होती. ती विझवता विझवता पुरी रात्र गेली. म्हणून डोळ्यात नीज येतेय.''

कोल्ह्याचे बोलणे ऐकून राजाला आणखीच रागच आला. तो आवाज उंचावून म्हणाला, ''लबाड व मूर्ख कोल्ह्या, समुद्राला कधी आग लागते काय ?''

''क्षमा करा महाराज'' कोल्हा धूर्तपणे बोलला, ''आपल्या राज्यात जर घोडीला वगार व म्हशीला शिंगरू होऊ शकते, तर समुद्राला आग का लागू शकत नाही ?''

राजाला आपल्या न्यायदानातील चूक कळली व त्याने घोडीच्या मालकाला त्याचे शिंगरू परत केले.

त्या आंधळ्या कोल्ह्याला समुद्राला लागलेली आग दिसली कशी ? तो तर आंधळा होता ना ??

कसकसले शेजारी मला भेटत गेले ते कसे सांगू ? परवा एक शेजारी नव्याने राहायला आला. मी सहज कोण, कुठला म्हणून त्याजकडे चौकशीला गेलो आणि विचारले, '' तुम्ही काय करत असता ?''

''मी शोधकर्ता आहे.'' त्याने अभिमानपूर्वक उत्तर दिले.

'' कसला शोध करता तुम्ही ?'' मी विचारले.

'' सध्या मी भारतीय लोकशाहीचा शोध घेतोय.'' ते म्हणाले.

मला त्याच्या येडपट चक्रमपणाची गंमत वाटली. मी म्हणालो, '' भारतीय लोकशाहीला काय झालंय ?''

''माहीत नाही.'' तो ठामपणे म्हणाला, ''पण आता ती अस्तित्वात आहे की नाही, सांगता यायचे नाही. ती हरवली आहे. मी तिचा शोध घेतोय.''

''अहो पण कशावरून ?'' त्रागा येवून मी विचारले.

''हे बघा. '' तो शांतपणे म्हणाला, ''हरवलेल्यांचा शोध घेणारं एक स्वतंत्र पथक भारतीय पोलीस खात्यात असतं हे आहे का माहीत तुम्हांस ?''

''आहे.'' मी विचारले, ''त्याचा इथं काय संबंध ?''

''आहे. सांगतो. संबंध आहे. मी १९५० साली आमची लोकशाही हरवल्याची तक्रार पोलिसात नोंदविली. तेव्हापासून आजवर ती सापडल्याचं पोलीस सांगत नाहीत.''

''अहो'' मी त्याला समज देत म्हणालो, ''आजकाल पोलिसांकडून काम करून घेताना त्यांचे हात ओले करावे लागतात असं ऐकतो.''

''मी केले.'' तो म्हणाला.

''काय ?'' मी विचारले.

''प्रयत्न केले मी. पोलिसांचे हात ओले करायचे.'' तो म्हणाला.

‘‘कसे ?’’ मी विचारले.

‘‘ मी राज्याच्या सर्वोच्च पोलीस अधिकाऱ्याला भेटलो. आणि त्याला म्हणालो, माझी स्थावर जंगम मालमत्ता मी पोलीस कल्याण निधीला देतो. मला लोकशाहीचा शोध तेवढा लावून द्या.’’

‘‘मग काय म्हणाले ते सर्वोच्च पोलिस अधिकारी ?’’ मी विचारले.

‘‘ते म्हणाले, पोलीस कल्याण निधीची काळजी करायला सरकार बसले आहे. तुम्ही माझ्यासारख्या अधिकाऱ्याच्या कल्याणाची काळजी केलीत तरी चालेल.’’ तो म्हणाला.

‘‘मग तुम्ही होकार द्यायचा.’’ मी म्हणालो.

‘‘दिलाच मी त्यांना होकार.’’ तो म्हणाला.

‘‘मग आता काय राहिलं ? झालंच तुमचं काम. पोलीस अधिकाऱ्यांनी होकार दिल्यावर काम होणार नाही असं कुठं होतं ?’’ मी म्हणालो.

‘‘नाही झालं बाबा माझं काम.’’ तो अधिक हताश होत म्हणाला, ‘‘त्या अधिकाऱ्यानं मला विचारलं, तुमच्या लोकशाहीचं अधिकृत रंग, रूप,उंची वगैरे वर्णन आणि अगदी शेवटचं छायाचित्र द्या. ’’

आता शेजाऱ्याच्या दु:खाने मीही हळहळत होतो. न राहवून विचारून गेलो, ‘‘ मग ?’’

‘‘मग?’’ मग मी लोकसभा सचिवाला लोकशाहीचं छायाचित्र द्यायला विनंती केली. तो म्हणाला, ‘‘सांसदीय मंत्र्यांची परवानगी आणा. आणि मी सांसदीय मंत्र्यांना भेटलो. ते म्हणाले, मी पंतप्रधानाच्या आधीन राहून काम करतो. त्यांनी परवानगी दिली तर देईन लोकशाहीचं छायाचित्र.’’ तो थांबला.

‘‘एका छायाचित्रासाठी एवढा आटापिटा !’’ मी न राहवून विचारले.

‘‘मी केला तो आटापिटा.’’ तो धीरोदात्तपणे सांगू लागला. ‘‘मी पंतप्रधानांना भेटून विनंती केली. ते म्हणाले, मी, मी सत्ताधारी आहे, पण देशाचा कारभार मी राष्ट्रपतीच्या नावाने चालवितो. तुम्ही त्यांना भेटून पहा. मी राष्ट्रपतीला भेटलो. त्यांनी माझ्या अर्जावर लिहून दिलं. शासकीय छायाचित्रकाराकडे उपलब्ध असल्यास सुरक्षा सचिवाच्या संमतीने देण्यास हरकत नाही.’’

‘‘मग भेटायचं तुम्ही सुरक्षा सचिवाला.’’ मी म्हणालो.

‘‘गरज पडली नाही. शासकीय छायाचित्रकारानेच सांगून टाकले. शासकीय धोरणानुसार मोठ्या प्रकल्पाचे छायाचित्र घेण्यास बंदी असते. ही लोकशाही बहुधा अशा प्रकल्पांच्या सूचीत असावी. म्हणून आमचे संगूही तिचे छायाचित्र नाही. सबब लोकशाहीचे छायाचित्र देण्याबाबत हे कार्यालय असमर्थ आहे.’’ तो बोलता बोलता थांबला.

''मग ?'' मी पुन्हा विचारले.

''मग मी परत पोलीस अधिकाऱ्याला भेटलो.'' तो सांगू लागला. ''तर ते म्हणाले , ठीक आहे. नसले छायाचित्र तरी चालेल. मला तुमच्या त्या लोकशाहीचे वर्णन सांगा, वय सांगा.''

मी म्हणालो, '' ती फार सोशिक असावी एवढेच मी सांगू शकतो. हां. आणखी एक, ती पन्नाशीच्या वरची झालीय.'' तर यार तो पोलिस अधिकारी म्हणाला, तो आय. जी. रँकचा पोलिस अधिकारी म्हणाला, '' यार, बायका सोशिक असतातच, आणि वयाचं काय घेऊन बसलात ? परदेशात स्त्रिया नव्वदीनंतरही लग्न करतात. तुमची लोकशाही तर पन्नासचीच. केला असेल तिने दुसरा घरोबा.द्या सोडून तिचा पिच्छा. आणि तुम्हीही घ्या हवी तर दुसरी करून......

कुठला काळ होता माहीत नाही. पण म्हणतात कुठलीही राजेशाही नव्हती. जमाना आपल्या लोकशाहीचाच होता. लोकही लोकशाहीला सरावलेले होते.

एक दिवस आमच्या गावात कुणीसे मंत्री आलेले होते. मंत्र्याचा दौरा म्हणजे मोठ्या गाडयांचा ताफाच ताफा. सगळं कसं साफसूफ झालेलं गाव पाहून मला भरून आलं होतं. हा येणारा जो कोणी असेल तो इथंच राहिला तर आपलं गाव असंच स्वच्छ स्वच्छ राहील ! असं वाटून गेलं.

मंत्रीमहोदयांनी सगळ्यांची ख्यालीखुशाली विचारली. आणि लगेच जवळच्या कुणाला तरी विचारलं, ''काय तुमच्या शिवारात विहिरी कुणाकुणाकडं आणि किती आहेत ?''

साहेबानं ज्याला विचारल होतं तो नेमका गबू होता. त्यानं नमूपणे उत्तर दिलं, ''जी... तशा कागदोपत्री ऐंशी आहेत.''

''कागदोपत्री म्हणजे?'' मंत्रीमहोदयांनी जवळ उभ्या असलेल्या बँकेच्या अधिकाऱ्याकडे पाहिले.

''होय साहेब'' अधिकारी अधिकच नमूपणे म्हणाला, '' कागदोपत्री ऐंशी आहेत. पण प्रत्यक्षात एकोणऐंशीच आहेत. एक विहीर चोरीला गेलीय.''

''चोरी? विहिरीची चोरी ? आणि मग आपले पोलिस काय करतायूत?'' मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली.

''आम्ही तपास करतोय साहेब.'' एक पोलिस अधिकारी समोर आला. म्हणाला, ''साहेब आम्ही तपास करतोय.''

''करा.'' मंत्रीजी म्हणाले, ''तपास करा. आणि चोरीस गेलेली विहीर सापडली की ज्याची त्यास सुपूर्द करा.''

आज्ञा देऊन मंत्रीजी निघून गेले. आणि खऱ्या नाट्याला सुरुवात झाली. गबूने आपली विहीर चोरीस गेल्याची फिर्याद पोलिस ठाण्यात नोंदवली !

झाले. पोलिस घटनास्थळी आले तर त्यांना विहीर खोदली गेल्याचा पुरावा सापडेना. चोरांनी अगदी मुद्देमालासह विहीर लंपास केली होती. एवढया मोठ्या चोरीचा पत्ता फक्त दोनच पोलिस लावू शकतात असा स्थानिक पोलिसांचा समज झाला. एक तर जगभरात स्कॉटलंड यार्डचे पोलिस चोरी प्रकरणात प्रख्यात आहेत. नाही तर, मुंबई पोलिस. स्थानिक पोलिस मुंबईला शरण गेले. तर त्यांना वरून दट्ट्या मिळाला. ''चोरी पकडा, मुद्देमाल कोर्टात हजर करा.''

अवघे पोलिस ठाणे दणाणले. त्यानी गबूलाच धारेवर धरले..... दटावू लागले.... म्हणाले, ''सांग.... तुझ्या शेतात विहीर होती कोठे ? ती खणली कोणी ? आणि चोरीस कशी गेली ? चोरांनी ती पाठीवर नेली की खांद्यावर ? बैलगाडीतून नेली की ट्रकमध्ये ?''

गबू घाबरला. पण त्याने हिंमत मात्र सोडली नाही. तो शांतपणे म्हणाला, ''साहेब, विहीर चोरीला गेलीय. खरोखर गेलीय ! पण ती कोणी खांद्यावर किंवा गाडीतून चोरून नेलेली नाही; तर खिशात घालून नेलीय.''

''विहीर खिशात?'' पोलिसही आश्चर्याने दचकत म्हणाले, ''मग ती गळली नाही ? तिला काय बिर्ला व्हाईट लावून ठेवलं होतंस तू ?''

''नाही जी. मी बिर्ला व्हाईट कुठलं आणणार ? गरीब माणूस मी. हां, साहेबांनी आधीच खिशाला लावून ठेवलं असेल तर नाही बा माहित....'' बिलंदर गबू म्हणाला.

'साहेब' शब्द ऐकताच सगळ्या पोलिसांनी आधी सलाम ठोकला. आणि मग एकमेकांकडे पाहात विचारलं, ''साहेब ? कोठे आहेत साहेब ?''

''तुमचे साहेब नाहीत जी,'' गबू म्हणाला, ''आमचे साहेब. बँकेचे साहेब. त्यांनी चोरली माझी विहीर.''

ठाणे स्तब्ध झाले. जो तो विचारात पडला. आता काय करायचे ? प्रसंग मोठा बाका होता. अवघ्या पोलिसांना आपला सोडून दुसऱ्या साहेबाची माहिती नव्हती. हा कोण साहेब बँकेत उपटला ? ते चक्रावले.

''मी साहेबाला ओळखत नाही,'' गबू शांतपणे म्हणाला. ''पण तो होता साहेबच. मी विहिरीसाठी

कर्ज मिळावे म्हणून अर्ज केला. पैसे भरून बँकेचा खातेदार झालो. कर्ज मिळणार म्हणून मजुरांना बोलावून खोदकाम ठरवून टाकले. वडारांना बांधकामासाठी दगडाचे बोलून टाकले. पाथरवट बेलदारांना विहीर बांधायचा कंत्राट देऊन बसलो. पण कर्ज काही मिळत नव्हतं. शेवटी कंटाळून त्या बँकेच्या साहेबाला भेटलो. सगळं सांगितलं. ते म्हणाले□चुकलंच राव तुमचं. त्याचं असं आहे की, व्यापारी सोडून शेतकऱ्याला कर्ज द्यायला बँक काय खुळी की वेडी समजलात तुम्ही ?''...

... गबूला ब्रम्हांड आठवले. शेतात विहीर नाही; म्हणजे दुबार पीक नाही. दुबार पीक नाही तर जास्तीचा पैसा नाही. आणि जास्तीचा पैसा नाही, म्हणजे पुढे आलेलं मुलीचं लगीन नाही. गबू धास्तावला. त्याने गयावया करत साहेबाला दया करायला विनवले.

''असं करा राव'' साहेब विचारमग्न होत म्हणाला, ''तुम्ही पहिला हप्ता घेऊन जा. आठ दिवसांनी येऊन विहीर १५□२० फूट खणल्याची नुसती बातमी द्या. मी दुसरा हप्ताही मिळवून देईन. नंतर पुरवणी खर्च व इंजिन पंपचे कर्जही मंजूर करून पैसे देईन. पण तुम्ही तूर्तास पहिला हप्ता घ्याच.''

गबू हरखला. त्याने होकार दिला तसे साहेब म्हणाले, '' पण एक आहे राव. यात रिस्क आहे. निरीक्षकांचे रिपोर्ट अनुकूल हवे, तर तुम्हाला ४० टक्के खर्चात जमवून घ्यावं लागेल.''

हरखलेला गबू मनाने पत्याच्या बंगल्यागत कोसळला. पण उपाय नव्हता. शेतात विहीर होणे अगत्याचे होते. तो कबूल झाला.

पहिल्या हप्त्याची ६० टक्के रक्कम त्याने घेतली. त्यातूनही बँकेचे कारकून □शिपायी यांनी चिरीमिरी लाटली. उरलेले पैसे गाठीशी ठेऊन गबू आठ दिवसांत बँकेत गेला.

''या.या.'' साहेब अगत्याने म्हणाले, ''काय पैसे लागतील वाटतं ?''

''हो. पैसे हवेत म्हणून तर आलो.'' गबू चाचरत म्हणाला, ''पण साहेब ते चाळीस टक्के म्हणजे फार होतात हो.''

''छे.छे. कुठले राव ?'' साहेब लगेच म्हणाले, ''तुम्हाला म्हणून साठ टक्के दिले. एरव्ही आम्ही साठ टक्के ठेऊन शेतकऱ्याला ४० टक्केच देत असतो.''

गबू गप्प राहिला. साहेबाने निरीक्षकाला बोलावणे केले. तो लगेच आला. त्याला साहेब म्हणाले, ''खादाडे, तुमचा एक रिपोर्ट हवा. हे गब्बरसिंग. म्हणजे ते शोले मधले नव्हे. आपल्या गादेगावचे. यांना आपण पहिला हप्ता दिला. दुसरा द्यायचाय. तर, तुम्ही अहवाल द्या. 'स्थळ पाहिलं. विहीर पाहिली. १५□२० फूट झालीय. दुसरा हप्ता देण्यास हरकत नाही.' आणि हो, यांना पुरवणी कर्ज मंजूर करण्याची शिफारस करा. इंजिन मोटरसह, कळलं ? माणूस आपला आहे राव !''

गबू दुसरा हप्ता घेऊन गेला. गबू जात राहिला. त्याच्या विहिरीच्या खोदकामाची प्रगती निरीक्षक खादाडे आपल्या अहवालात नोंदवू लागला. बँकेत बसून. गबूने मुलीचे लग्न उरकून टाकले.

तीन वर्षानंतर बँकेने कर्जवसुलीची नोटीस पाठविली. साहेब बदलून गेले होते. नव्या साहेबासमोर गबूने कर्ज घेतल्याचे नाकारले. साहेबाने केसपेपर पाहिले. त्यात खोदकामाची प्रगती, लागलेल्या पाण्याची खोली, बांधकामाचा आढावा, सगळे काही होते.

ते पाहून तो म्हणाला, ''असं आहे गबूजी. तुमच्या शेतात विहीर तर आहेच आहे. तुम्ही नाही म्हणालात तरी माझ्याकडील कागदपत्रांत ती आहे. तेव्हा मला तुमचे शेत जप्त करावे लागेल.''

''साहेब'' गबू धोरणीपणाने म्हणाला, ''आपले कर्ज माझ्या विहिरीसाठी होते. शेतासाठी नाही. तुम्ही हवी तर विहीर जप्त करा.''

''चालेल. ती कोठे आहे ?'' साहेबांनी विचारले.

''तुमच्या कागदपत्रांत'' गबू शांतपणे म्हणाला. ''तुम्ही तुमची कागदपत्रं जप्त करा. कारण विहीर माझ्या शेतात नाही. तुमच्या कागदपत्रांत आहे.''

''असं म्हणता ?'' साहेब अनाहूत सल्ला देत म्हणाले, ''गबूजी, हा चोरीचा मामला आहे. तुमच्या शेतात आमच्या सुपरवायझरने वेळोवेळी विहिरीचे खोदकाम पाहिलं आहे. तसा त्याचा अहवालही आहे. आणि तुम्ही म्हणता शेतात विहीर नाही. तर नक्कीच ती चोरीला गेली असेल. तुम्ही ताबडतोब पोलिसात फिर्याद करा.''

.... आणि गबू पोलिसठाण्यात गेला. त्याच्या चोरीचा तपास लागला की नाही, हे वृत्त लिहीपर्यंत कळू शकलेले नाही.

आचार्य अत्र्यांनी त्यांचे गुरू राम गणेश गडकऱ्यांनी सांगितलेली एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले...

'' एकदा कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी मोठी मेजवानी दिली. पुष्कळ सरदार मानकऱ्यांना बोलाविले. तर त्या ठिकाणी त्यांनी आपले जुने मास्तर बोलाविले. तो बिचारा मास्तर फाटके कपडे घालून कसातरी आला होता. त्याच्याकडे कोण पाहणार? बाकीचे सरदार पटके बिटके घालून बसले होते. हा बिचारा मास्तर फाटके कपडे घालून बसला होता. महाराजांनी देखील त्याच्याकडे लक्ष दिले नाही. शेवटी जेवण झाले, तेव्हा मास्तर उठले. म्हणाले, ''मला दोन शब्द बोलायचेत या प्रसंगानिमित्त.''

महाराज म्हणाले, ''कशाला ? काय बोलायचं ?'' ... ''नाही नाही, थोडंसं.''... ''बरं बोला.'' मास्तर म्हणाले, ''मला एवढंच बोलायचं की, एवढी आपली पार्टी, मोठे मोठे सरदार आले आहेत कपडे करून आणि मी फाटके कपडे घालून आलोय इथं. याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटत असेल. वाईट वाटत असेल. तेव्हा मला फाटके कपडे घालून इथं का यावं लागलं, त्याचं कारण सांगायचं.'' ''अहो मास्तर नको''........ ''नाही, नाही थोडंसं''... ते म्हणाले, ''असं झालं, आपलं आमंत्रण आलं. आम्ही गरीब. तेव्हा शिंप्याकडे गेलो आणि सांगितलं की मला असे असे कपडे शिवायचे आहेत.'' शिंपी म्हणाला, ''दोन दिवसात शक्य नाही.'' मग परटाकडे गेलो. तर परीट म्हणाला, ''आमच्याकडे असे कपडे मिळायचे नाहीत.'' मग भाड्याने कपडे देणाऱ्याच्या दुकानात गेलो आणि त्याला सांगितलं, ''असे असे कपडे मला पाहिजेत. शेरवानी पाहिजे, सुरवार पाहिजे.'' तेव्हा दुकानदार म्हणाला, ''सगळे कपडे सरदार लोकांनी भाड्याने नेले आहेत. त्यामुळे मला आपल्याला काही देता येत नाही.'' एवढे सांगून मी आपले आभार मानतो.''

''एखादा मास्तरही हुशार असतो बघा !'' गोष्ट वाचून दाखवताच अज्ञानकोश म्हणाले, ''चांगलीच जिरवली त्यानं तो कोण छत्रपती होता त्याची. पण आमच्या दिवानजीएवढा नाही ....''

आत्ता, 'आमचा दिवानजी' म्हणजे, अज्ञानकोशाच्या आजोळचा. हिचे आजोळ जमीनदार; आता जमिनी गेल्यात, दिवानजीच्या गोष्टी तेवढ्या आहेत. तिने सांगितलेली ही गोष्ट .....

एका इजारदाराकडे मुलगी पहायला जायचे होते. रावसाहेब निघाले घोडागाडीतून, सोबत ते प्रसिद्ध दिवानजी आणि काही नातलग.

रावसाहेबाच्या आगमनाची वर्दी गेलेली होती. यजमान तयारीत होते. पाहुण्यांना दिवाणखान्यात बसवण्यात आले. फराळ, चहा झाला. बोलणी सुरू व्हायची तेवढ्यात यजमान इजारदार गरजले....

''दिवानजी !''

''मालक ?'' दिवानजी नम्रपणे उत्तरले.

''दिसत नाही पाहुणे आलेत ते ?''

''मालक ! ''

''काय मालक मालक लावून बसलात. जा दोन तांब्याच्या मोठ्या चरव्या काढा. दूध आणा. झक्कास बासुंदीचा बेत ठेवा.''

''मालक ....'' म्हणत दिवानजी मान घालत निघून गेले.

रावसाहेबांचे दिवानजी... ते प्रसिद्ध दिवानजी हुशार. ते जाऊन बसले वाड्याच्या दिंडीदरवाज्यात.

इजारदाराचे दिवानजी दोन मोठ्या तांब्याच्या चरव्या घेऊन दरवाजातून बाहेर पडले. आणि खूप वेळाने परतले तेव्हा, त्यांच्या हातात दुधाने भरलेली एकच चरवी होती.

रावसाहेबांचे दिवानजी काय समजायचे ते समजले. आणि लगेच बाहेर पडले. या दिवानजीने गावात जुनी भांडी घेणारी दुकानं शोधली. एका दुकानात इजारदाराकडची चरवी त्याला सापडली. ती विकत घेऊन त्याने परस्पर आपल्या गावी पाठवून दिली.

इजारदाराकडील पाहुणचार घेऊन रावसाहेब परतले. परतताना त्यांनी इजारदाराला आपल्याकडे येण्याचे आमंत्रण दिले.

इजारदार बिचारे मोठ्या तयारीने रावसाहेबाकडे आले. रावसाहेबांनी हुकूम सोडला, ''दिवानजी चांगलं दही बोलवा. श्रीखंडाचा बेत ठेवा.''

दिवानजी पटकन म्हणाले, ''मालक दही कुठल्या चरवीत आणायचं ? आपल्याकडच्या की इजारदारांकडच्या ?''

बिचारे इजारदार मोठे खजिल झाले. आणि सोयरीकीची बोलणी अर्धवट सोडून परतले.

किती हुशार आमचे दिवानजी. कशी जिरवली इजारदाराची !

सोयरीकीवरून आठवलं. यात मध्यस्थी करणारा हटकून फसतो. आणि त्याच्यावरच फसवणुकीचा आळ येतो. म्हणून मी सहसा कोणाच्या सोयर□संबंधात मध्यस्थी करत नाही.

एकदा माझ्या एका मित्राची मुलगी उपवधू झाली. म्हणून तिच्यासाठी उपवर शोधणे सुरू होते. तर दुसऱ्या एका मित्राचा मुलगा 'कर्तव्या' ला आला होता. झाले, दोन्ही कुटुंबियांना मी उभयतांचा मित्र, तोही जवळचा मित्र असल्याचा सुगावा लागला.

माझा अनुभव असा की, माझ्या मध्यस्थीने झालेल्या लग्नाला जन्मभर अपयश येत गेले. फार कशाला माझं लग्न ठरवितानाही मीच मध्यस्थ होतो. एवढे सांगितले तरी दोन्ही कुटुंबांनी मला मध्यस्थी करण्याच्या भरीस पाडले. सुटीच्या एके दिवशी मी मुलाला घेऊन मुलीकडे गेलो.

आधी निरोप दिला होताच. ते तयारी करून वाटच पाहत होते. मुलगी सुंदरच होती. मुलाला ती पहिल्या नजरेतच पसंत पडली. भावली. त्याने पोहे घेता घेता मला पसंतीच्या परवलीची खूण केली. मुलगाही देखणा होता. मुलीकडून होकार मिळणारच याची मला खात्री होती.

मुलाचा होकार मी मुलीच्या वडिलांना सांगितला. तसे ते म्हणाले, ''असं आहे राणाजी, आजकालची आपली पद्धत आहे. तेव्हा मुलीला काही विचारायचे असेल तर विचारा.''

आता मुलगी काहीशी अस्वस्थ दिसू लागली. मी मुलाकडे पाहिले. तो म्हणाला, '' लेडीज फर्स्ट !''

''तुम्हाला काय काय येते ?'' मुलीने तत्परतेने विचारले.

''खूप काही येते मला, क्रिकेट, गाणं, फोटोग्राफी,चित्रकला,कविता....'' तो अभिमानाने म्हणू लागला.

''ते सारं काही नको.'' तिने ठामपणे विचारलं, ''किचनमधलं, स्वयंपाकातलं काय काय येतं ते सांगा.''

''तेही सगळंच येतं. मी खोली करूनच शिकलोय. स्वयंपाक येतो मला.'' तो म्हणाला.

''ठीक.'' मुलगी हरखून म्हणाली, ''आता तुम्ही विचारा काय ते.''

''तुम्हाला...'' मुलगा चाचरत म्हणाला, ''नाही म्हणजे तुम्हाला काय काय येतं ?''

''कधी कधी सर्दी पडसं, कधी ताप येतो'' उपवधू जरबेनं म्हणाली, ''पण जातातही लवकर. फक्त एकच गोष्ट आहे, ती आली म्हणजे जन्मभर जात नाही.''

''कोणती ?'' मुलाने घाबरून विचारले. ती मिरगी फेफरं असलं काही सांगेल की काय ? तो अस्वस्थ झाला.

''मूर्खासारखं माझेच प्रश्न मला विचारणाऱ्यावरचा राग.'' ती म्हणाली, ''हा राग जन्मभर जात नाही.''

मुलीचे विचित्र उत्तर ऐकून मुलगा नकार देणार, असा माझा व वधूपित्याचा अंदाज होता. पण झाले उलटे; मुलाने होकार दिला. लग्न झाले. म्हणतात ती दोघं सुखी आहेत.....

स्त्री पुरुष समानतेच्या या काळात पुरुषाला स्वयंपाक येत असेल तर ते जोडपे सुखी होणारच.

गोष्ट बहुधा ६२ सालची. मी तिसरी□चवथीत शिकत होतो. महाराष्ट□राज्य निर्माण झाले होते. आम्ही पंचायत राज पद्धती स्वीकारली होती.

एकदा गुरुजी आमच्या वर्गावर शिकवत होते. तेवढ्यात आमच्या गावाकडील एक मंत्री शाळेत आले. त्यांच्या सोबत जि. प. चे नवनियुक्त अध्यक्षही होतेच. ते मंत्री महोदयांचे कट्टर समर्थक

म्हणवीत.

मंत्रीजी सरळ आमच्या वर्गावर आले. गुरुजींनी आम्हाला गणितं घातली होती. मंत्रीजींनी गुरुजींना विचारले,

‘‘काय मास्तर शाळा कशी चालू आहे तुमची ?’’

‘‘छान’’ मास्तर म्हणाले.

‘‘पटावरची सगळी मुलं येतात ? कोणी मधल्या सुटीत पळून नाही जात ? ’’

‘‘हो, पटावरची सगळी मुलं येतात आणि कोणी पळून देखील जात नाही.’’

‘‘छान छान’’ मंत्रीजी आनंदून म्हणाले आणि लगेच त्यांनी पुढचा पृश्न केला,

‘‘मास्तर, आता तुम्ही मुलांना काय शिकवताय ?’’

‘‘गणित’’□मास्तर.

‘‘कोणत्या पद्धतीनं ?’’□मंत्रीजी.

‘‘नेहमीच्याच एकमान पद्धतीनं’’□मास्तर.

‘‘मास्तर’’ मंत्रीजी समंजस स्वरात म्हणाले, ‘‘आपण ५९ साली दशमान पद्धती स्वीकारलीय. तेव्हा तुम्ही आता दशमान पद्धतीनं शिकवलं पाहिजे. हो ना?’’

‘‘ठीक आहे साहेब.’’ गुरुजी देखील नमूपणे म्हणाले, ‘‘मी उद्यापासून दशमान पद्धतीनं शिकवायचा प्रयत्न करीन.’’

मंत्रीजी माघारी वळले. त्यांचे वरील संभाषण जि.प.चे नवनिर्वाचित अध्यक्ष ऐकत होते.

काळ बदलत गेला. माझ्या गावात माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती. म्हणून मी एक माध्यमिक विद्यालय काढले. तेथे वसतिगृहाची व्यवस्था देखील केली. एक दिवस मी शाळेच्या पटांगणात कुणाशी बोलत होतो. तर जि.प. अध्यक्षांची गाडी येऊन थडकली.

मी पुढे झालो. नमूपणे म्हणालो, ‘‘साहेब कशाला कष्ट घेतले ? मला कळवलं असतं तर आलो असतो. इथं कुणाशी काम असेल तर त्यालाही घेऊन आलो असतो.’’

‘‘नाही.’’ अध्यक्ष महाराज आढ्यतेने म्हणाले, ‘‘कुणाशीच काम नाही माझं. मी नुस्ती शाळा पाहायला आलो आहे, तुझी शाळा कशी चालतेय ती.’’

‘‘चांगली चालते साहेब’’ मी म्हणालो. ‘‘आजकाल खेड्यात पुरेसे विद्यार्थी मिळत नाहीत. पण मी मिळवले आहेत. आणि मुख्य म्हणजे, आम्हाला कर्मचारी चांगले हुशार आणि कामसू मिळाले आहेत.’’

''ठीक. ठीक.'' ते म्हणाले, ''मला एखाद्या वर्गावर जायचंय.''

''चला. मी नेतो तुम्हाला म्हणाल त्या वर्गावर ''—मी.

''नको. तू बाहेरच थांब. मी एकटा जाईन.''

''ठीक.'' म्हणत मी त्या नव्या पुढाऱ्याला वाट दिली. जि.प.चे अध्यक्षसाहेब सरळ एका वर्गावर गेले. तेथे आमचे शिक्षक शिकवीत होते. अध्यक्षमहाराज वर्गात शिरले आणि त्यांनी शिक्षकाला विचारले''हा वर्ग कुठला ?''

''दहावीचा''—शिक्षक.

''तुम्ही मुलांना काय शिकवताय ?''—अध्यक्ष.

''भूगोल.''—मास्तर शांतपणे.

''कोणत्या पद्धतीनं?''—अध्यक्षमहोदय.

''नेहमीच्याच नकाशावाचन पद्धतीनं.''—शिक्षक.

''लाज नाही वाटत?'' अध्यक्षमहाराज वर्गातच गरजले. ''आज किती वर्षं झाली आपण दशमान पद्धती स्वीकारून, आणि तुम्ही आपली नेहमीचीच पद्धती घेऊन बसलायत. भूगोल असो की भाषा, दशमान पद्धतीनंच शिकवलं पाहिजे....''

''पण साहेब....'' शिक्षक किंचाळत म्हणाला, ''साहेब, भूगोल दशमान पद्धतीनं शिकवता येत नाही.''

''शिकवता येत नाही ?'' अध्यक्षांनी डोळे वटारले. म्हणाले, ''तर राजीनामा द्या. शाळा बंद करा. पण शिकवायचं असेल तर दशमान पद्धतीनंच सगळं काही शिकवा.....''

शिक्षणाबद्दल बोलायला लिहायला मी काही तज्ज्ञ नाही. मी अल्पशिक्षितच नव्हे, तर अत्यल्प शिक्षित आहे. पण ज्ञानकोशाच्या साहचर्यामुळे कदाचित माझी ज्ञानवृद्धी झाली असावी.

तसा मला एकच मुलगा. तो आज कितवीत आहे मला माहीत नाही. गरीब माणूस ना मी ! गरीबाजवळ काहीच नसते. वेळ देखील ! त्यामुळे मुलगा कितवीत शिकतो ? माहीत नाही !

मागे कुणी महात्मा गांधी नावाचे मोठे गृहस्थ होऊन गेले म्हणतात. या माणसाजवळ किती बरं मोठा वेळ असेल ! नाही ? पण छे, एवढ्या मोठ्या माणसाजवळ एवढा मोठा वेळ असून देखील ते

आपली मुलं काय शिकतात हे पाहू शकले नाही म्हणतात.... मग मी तर गरीब बापडा.....

काल गॅलरीत बसून काही लिहीत होतो. तर बाळासाहेब .....आमचे चिरंजीव...... लहान मुलांच्या नावात 'साहेब' असला की मोठेपणी तो साहेब होतो, मोठा माणूस होतो हा हिचा ठाम समज ! तसं महाराष्ट्रापुरतं ते खरंही असावं. मागे महाराष्ट्रात विदर्भाचे एक बाळासाहेब उपमुख्यमंत्री झालेत. तर एक बाबासाहेब मुख्यमंत्री झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुलाचं नावही भैय्यासाहेब होतं असं म्हणतात !

तर बाळासाहेब..... जाऊ द्या हो; तुमच्यापुरते तरी बाळ्या म्हणू द्या ! हं, बाळ्या येत होता. पाठीवर दफ्तराचे ओझे, आणि सोबत शाळेतील मुलांशी मस्ती. स्वारी झक्कास येत होती. मला त्याच्या ओझ्याची दया आली. खाली येऊन मी त्याच्यासाठी दार उघडले.

मला पाहून बाळ्याने भोकांड पसरले. अचानक. मला काही कळेना. तरी प्रसंगावधान राखून मी धोका घरातच असल्याचा इशारा केला, पण झाले भलतेच. तो अधिक जोराने रडू लागला. काहीही न कळून मी लिहायला बसलो.

''अहो. दिसत नाही, बाळासाहेब रडतोय.'' ती बाहेर येत म्हणाली. आता दिसण्याचा आणि रडण्याचा काही संबंध असतो कां ? त्याचा संबंध ऐकण्याशी. पण या अज्ञानकोशाला सांगणार कोण ? मी मठ्ठ बसलेला पाहून ती चवताळून म्हणाली, ''सांग माझ्या सोनू ! तुला कोणी मारलं ? मी आताच जाऊन त्याच्या बरोबर त्याच्या सात पिढ्या बोखरून काढून त्यांची बोटी घेऊन येते.''

मी दचकलो. सायंकाळी अज्ञानकोश कुठली भाजी करणार ? फ्रिजमधली की, आता बोखरून आणणार असलेली. कदाचित बाळ्यादेखील याच विचाराने घाबरला असणार.

तो घाईघाईने म्हणाला, ''नाही मम्मी ! मला कोणी मारलं नाही.''

''तुला कोणी मारलं नाही ?'' एक संधी हुकल्याच्या विषादात जणू तिने विचारले.

''मग तुला काय भूक लागली ? सांग ! काय देऊ चिवडा, पकोडा, कचोरी, रसगुल्ला?''

''नाही.'' बाळ्या म्हणाला, ''मला भूकपण लागलेली नाही.''

''मग काय तुझ्या बापावर मरी आलीय ? म्हणून भोकांड पसरतोस.'' ती फिसकारली.

''मला....मला'' तो अडखळत स्फुंदत म्हणाला, ''मला टिचरेसनं दटावलं.''

ऐकताच आमचे अज्ञानकोश न संतापले असते, तरच नवल ! आता हिचा पुढील मोर्चा माझ्याकडेच असेल हे मी जाणून गेलो.

''काय घुम्म्यासारखे बसलात ?'' ती पिसाळल्या मांजरीसारखी फिसकारली, ''ती डोमडी म्हैस ....''

''तू'' मी तिला अचानक खिंडीत गाठत विजयी आविर्भावात विचारलं, ''तू स्वत: बद्दल बोलतेस ?''

''राहू द्या'' तिने मला आपली नेहमीची जरब दिली, ''माहीतैय तुमचा शिळाशार विनोद. ती भैसाडी, ती डोमडी म्हैस, रोज रोज बाळासाहेबाला दटावते म्हणजे काय ? सांगा तिला नाही तर माझ्याइतकं वाईट कुणी नाही .....''

मी म्हणणार होतो, आताही करून देवू शकतो 'प्रतिज्ञापत्र'; तुझ्यापेक्षा कोण वाईट असणार ? पण वेळकाढूपणा हा माझा एकमेव बचाव होता. बोललो नाही. ''जातो'' मी म्हणालो.

मी निघालो, पण.... मला विचार आला. कशाला बरं ती टिचरेस बाळ्याला रागावली असेल. कळलं तर बरं. मी भीत भीत तिला म्हणालो, ''असं आहे बघ ! ती तुझी शत्रू म्हैस (!) बाळासाहेबाला आपल्या कां रागावली ते नको कळायला ? कळलं तर आपण मग त्याचे सोनियाचे असो की चांदीचे कान आपण पिरगाळूच पिरगाळू.''

मी दिलेल्या खोट्याखोट्या अभिवचनाचा परिणाम होता की सोनियाच्या उल्लेखाचा कोणास ठाऊक; ती म्हणाली, ''पिरगाळा ते सोनियाचे कान पिरगाळा. आणि बाळासाहेबांना मुक्त करा. निश्चित करा. विचारा बाळासाहेबाला की तिने त्यांना कां रागावलं ? ''

''हं.'' हायसं वाटून मी सुस्कारा सोडला व बाळ्याला विचारलं, ''बाळासाहेब, सांग, कां बरं टिचरेस तुला रागावली ?''

''तिनं आम्हांला निबंध लिहायला सांगितलं होतं.'' तो म्हणाला.

निबंध हा तर... माझा लेखकूचा, म्या बापड्याचा विषय ! मी सरसावत त्या क्षणाला पकडले व म्हणालो, ''बाळासाहेब, मी डझनानं पुस्तकं लिहिली. तू माझा मुलगा. तुला एक निबंध लिहिता येऊ नये ?''

''बापूश्री'' बाळ्यानेही बाणेदार उत्तर दिले, ''तुम्ही डझनभर पुस्तकं लिहिल्याचं काय घेवून बसलात, मी शेकडो लिहीन...''

''मग ?'' मी त्याला लगेच प्रश्न केला, ''एक निबंध तेवढा कां बरं लिहून काढला नाहीस ?''

''सुरुवात केली होती. पण, टिचरेसनं विषय सांगितला तेवढा लिहून थांबावं लागलं. दाखवू कां ?''

बाळ्याने निबंधाची वही काढली. एका पानाच्या शिरोभागाला लिहिले होते, ''मी मंत्री झालो.''

''अरे या विषयावर तर कितीतरी लिहिता आलं असतं, मग तू थांबलास कां ?'' मी विचारलं.

''बापूश्री '' तो वेडावत म्हणाला, ''आमच्या टिचरेसपूमाणे तुम्हीही असेच दिसतां. अहो, मी मंत्री झालो म्हटल्यावर मंत्र्याला पी.ए. असते, स्टेनो असते. त्याच आल्या नाहीत तर मी कां लिहित बसू.....''

''बघितलंत.. माझ्या बाळासाहेबाला परिस्थितीचं भान किती लवकर येतं ते !

''हं.... भान ! ''मी उद्वेगाने पुटपुटलो ....

बाळ्याच्या कोणत्याही गोष्टीचे तिने केलेले कौतुक ऐकणाऱ्याचे मन भरून जावे असे ! मी तर ते ऐकून ऐकून सद्‌गदित अवस्थेच्या कितीतरी पलीकडे गेलो आहे.आता परवाचेच पहा ना....

मन लागत नव्हते. रोज रोज अज्ञानकोशाचे ऐकून ऐकून कान जणू किटले होते. म्हटलं थोडा चेंज हवा. मी सेवागामला जाऊन यायची घोषणा केली.

''तुम्ही एकटेच कंटाळले आहात घराला असं थोडंच आहे ?'' अज्ञानकोश म्हणाले, ''आम्ही पण येणार बापूजींच्या समाधीच्या दर्शनाला. ''

''अग पण बापूंची समाधी सेवागामला नाही ....'' मी समज देण्याचा प्रयत्न केला.

''आहे.'' ती ठामपणे म्हणाली, ''सेवागामचा आश्रमच विदर्भाच्या बापूची समाधी आहे. उगाच मुलांची दिशाभूल करून त्यांचा इतिहास बिघडवू नका. मी तुम्हाला लग्न झाल्या झाल्या ते सांगितलं होतं. आठवतं ?''

एदेन बागेत रमणारा मी अचानक अकोल्याच्या गांधी जवाहर बागेत पोचलो ! आणि आपण होऊन पराभव पत्करला.

सेवागाम म्हणजे..... म्हणजे नेमकं काय ? हा प्रश्न मला पडलेला नाहीये. नक्की नक्कीच पडलेला नाहीये. कारणही सांगायची गरज नाही. सेवागाम आश्रम म्हणजे बापूजींची □महाराष्ट□ाच्या त्यातूनही विदर्भाच्या बापूजींची समाधी. अज्ञानकोशानेच ते सांगून ठेवलंय मला. आणि त्यावर कुठले अपील असू शकते यावर माझा विश्वासही नाही. नाहीच.

तर..... सेवागामला जायचे ठरले. गेलो. बाळ्या, अज्ञानकोश व अस्मात्. सेवागामचा आश्रम म्हणजे अणूरेणूत गांधीजी भरलेले असावेत, अशी माझी बापड्याची कल्पना होती. पण झाले भलतेच,पाहिले तेही वेगळेच. तिथेही आपण विशिष्ट, अतिविशिष्ट श्रेणीतील नाही आहोत ही जाण

अज्ञानकोशाला झाली हे खूप, नाही तर तिने इंदिरा गांधी पासून तो प्रियंकाच्या शाळेच्या बाईपर्यंतच्या ओळखी सांगून वेगळी जागा मिळविण्याचा प्रयत्न केला असता. हो कोणी सांगावे? पण अतिविशिष्ट नाही तरी विशिष्ट श्रेणीचा हेका तिने लावलाच; म्हणाली, आमचे 'हे' रावसाहेब लेखक आहेत आणि तिन्ही गांधींवर पुस्तक लिहिणार आहेत; म्हणजे साबरमती, सेवाग्राम व राजघाटचे नव्हे तर ती बहुधा इंदू ,संजू ,राजूबद्दलच बोलली असावी ! समजणारा बिचारा काय समजला कोण जाणे ?

पण झटकन एक चड्डीवाला सामोरा आला. गांधींनी गरीब भारतीयांना कपडे कमी लागावेत म्हणून पंचावर भागवले. या आश्रमवासीयांनी ' फैशन का जमाना' वाढावा म्हणून तोकडे घातलेत की काय कळलं नाही ! या आश्रमवासीयांचा आणि गांधींचा संबंध काय तेही कळले नाही ! कारण गांधी कधी अनुदानावर अवलंबून नसायचे म्हणतात. आणि यांची अनुदानाशिवाय बापूकुटी साफसूफ होत नाही. या कुटीला आता बापू कोठी म्हणायला हवे ! एवढा खर्च तिच्यावर सहज होत असावा. जाऊ द्या, आपल्याला काय ?

अज्ञानकोश तन्मयतेने आश्रम पाहत फिरत होते. अचानक तिला काय वाटले कुणास ठाऊक ? तिने एक आश्रमवासी गाठला. गृहस्थ सत्तरेक वर्षाचा असावा. त्याचा पेहराव तोच. बिनबाह्याची बनियन आणि दादा कोंडके सारखी अर्धी अधिक चड्डी म्हणा किंवा पाऊण इजार म्हणा. एक विचित्र आकार. बरं गृहस्थ कुठंतरी हरवल्यासारखा विचारमग्न. तिने विचारले, ''अहो आजकाल नक्षलवाद, दहशतवाद फोफावतोय. मग, गांधीवाद कां बरं फोफावत नाही ?'' ''असं आहे, आम्ही आश्रमवासी शासकीय धोरण राबविणारे. शासनाने कुटुंबनियोजनाचा पुरस्कार केलाय. आम्ही पण प्रत्येक गोष्टीचे नियोजन करून चालतो. मग सूतकताई असो की, गांधीविचाराचा प्रचार.''

''सूतकताई ?'' बाळ्या मध्येच कोकलला, ''तुम्ही पण सूतकताई करता ?''

''हो मी काततो रोज. तुला येतं बाळ कातता ?'' आश्रमवासीने विचारले.

''तर ! येते मला सूतकताई.'' बाळ्या म्हणाला.

''छान !'' आश्रमवासी आनंदाने म्हणाले, ''छान ! तू जर रोज कातत राहून महिन्याला पाठवशील, तर तुला पैसे मिळतील. तू देशाचा भावी आधारस्तंभ, तू स्वावलंबी झाला पाहिजेस'' तो पुन्हा हरवत चालल्यासारखा बोलला.

''किती पैसे मिळतील आजोबा मला रोज कातण्याचे ?'' बाळ्याने विचारले.

''पंधरा पैसे रोज तरी पडतील तुला.'' ते म्हणाले.

''म्हणजे महिन्याला साडेचार रुपये. अहो आजोबा, यात तेवढे पेळूही येणार नाहीत. मग कसलं

आलं स्वावलंबन ?''

''हो बाळ, पेळू महागलेत खरे.'' ते विचारमग्न झाले. विचित्र खिन्नता त्यांच्या चेहऱ्यावर उमटली.

''असं आहे आजोबा, आम्ही मुलं म्हणजे देशाचे भावी आधारस्तंभच, '' तो म्हणाला, ''मग आम्हाला तुम्ही सूत कातण्याचे साडेचार रुपये देणार ? आणि साठ वर्षावरील म्हाताऱ्यांना महिना साठ रुपये निराधार अनुदान. छे ! छे ! आजोबा हा कसला समाजवाद आणि आम्ही कसले देशाचे उद्याचे आधारस्तंभ !''

बाळ्या बोलला आणि आमच्या अज्ञानकोशाने अनाहूतपणे त्याची पाठ कुरवाळल्याचे आम्ही पाहिले.

□

बाळ्याचे किस्से खूपच खूप ! परवा शाळेतून आल्याआल्या म्हणाला, ''बापूश्री ! आज टिचरेसने माझी पाठ थोपटली !''

खरे पाहता असे क्षण फार कमी ! टिचरेसने बाळ्याची पाठ कुटल्याची उदाहरणं अधिक.

''कशाबद्दल थोपटली तुझी पाठ तुझ्या टिचरेसने ?'' मी विचारले.

''मी सांगितलेला विनोद त्यांना आवडला म्हणून.'' बाळ्या आनंदाने म्हणाला.

''कुठला ?'' मी अनाहूतपणे विचारून गेलो.

''बापूश्री'' बाळ्या सांगू लागला,

''एकदा एक सरदारजी प्रवासाला निघाले होते. ते रेल्वेच्या तिकिट खिडकी समोर रांगेमध्ये उभे राहिले. ते सारखे चुळबुळत होते. त्यामुळे त्यांच्या पाठीस असलेला माणूस त्यांना बारकाईने निरखून पाहत होता. शेवटी सरदारजींचा तिकीट काढावयाचा क्रम आला. हातातील पैसे समोर करत व आजूबाजूला पाहत सरदारजी हळूच पुटपुटले. ''अमृतसर देढ.''

सरदारजी तिकिट घेऊन घाईघाईने बाजूला झाले. मागोमाग असलेल्या गृहस्थालादेखील अमृतसरला जावयाचे होते. तिकीट घेऊन ते पण प्लॅटफॉर्मवर आले. गाडी आली. सरदारजी व ते गृहस्थ एकाच डब्यात चढले. आणि योगायोग असा की दोघांनाही एकाच कंपार्टमेंटमध्ये जागा मिळाली.

गाडी सुरू झाली. सरदारजी चुळबुळ करू लागले, तसतसे त्यांच्या पाठीमागून तिकीट घेणारे गृहस्थही अस्वस्थ होऊ लागले. त्यांनी डबा फिरून पाहिला तर, डब्यात एकही लहान मुलगा

नावालाही नाही. त्यांच्याने राहवले नाही. त्यांनी सरदारजीला खाजगीत विचारले, ''सरदारजी ! तुमच्यासोबत कोणी मुलगा नाही.मग तुम्ही दीड तिकीट काढलीत ती कोणाकोणाची ?''

''अबे चूप....'' सरदारजी दबक्या आवाजात पण चोरी पकडली गेल्यासारख्या खजिल स्वरात म्हणाले, ''वो टी.सी.आयेगा, तो मैं उसे आधा तिकिट बताऊंगा. वो मान गया तो मान गया, नहीं तो मेरे पास एक और पुरा तो हैच...''

बाळ्या गोष्ट पूर्ण करीत म्हणाला, ''पिताश्री या गोष्टीच्या नेमकी उलट गोष्ट जो सांगेल त्याला टिचरेस उद्या काहीतरी बक्षिस देणार आहे. तुम्ही सांगू शकता एखादी गोष्ट ?''

''हं.....'' मी बाळ्याच्या टिचरेसच्या बुद्धयांकाची कल्पना करीत पुटपुटलो, ''सांगू शकेन पण तुझी ती टिचरेस माझ्या गोष्टीला बक्षिस वगैरे देईल की नाही कुणास ठाऊक...''

''पिताश्री'' बाळ्या कोकलला, ''बक्षिसाची चिंता करू नका.अर्ध्या गोष्टीत मिळालं तर ठीक. नाही तर, अख्खी गोष्टच मी राखून ठेवीन. आणि कृष्णाने कर्मण्ये......, की काय ते म्हटले आहे, म्हणतातच की नाही लोक !''

आपल्या भारतीय उपखंडात खरोखर किती अद्भुत गोष्टी घडून गेलेल्या आहेत ? आपण बिचाऱ्या सरदारजींना नुसतेच हसत आलो. अरेरे ! दिव्याखालचा अंधार दिव्यालाच दिसू नये ?

मी बाळ्याला गोष्ट सांगू लागलो,

'' कोणे एके काळी एका संस्थानिकाने आपल्याला मूल व्हावे म्हणून खूप उपासतापास केले, दानधर्म, ब्राह्मणभोजनं घातली, सदावर्त चालवले, पण त्यांना मूल होईना.''

संस्थानिक महाराज कंटाळले आणि आपल्या गुरूकडे जाऊन निराशेने म्हणू लागले, ''गुरुजी, मला मिळालेले हे संस्थान, हे वैभव मी कोणाला देऊ ? मला वारस नसेल तर या सर्वाचे सुख तरी काय ? त्यापेक्षा मी हे सर्व तुम्हाला देऊन तीर्थाटन कां करू नये ?''

''मुला !'' गुरुजी शांतपणे संस्थानिकाला म्हणाले, ''मूल देणे कोणाच्या अखत्यारीतील बाब नव्हे. मूल हे देवाघरचे फूल असते म्हणतात. आणि फूल देवाच्या मर्जीने फुलते, त्यासाठी जप□तपाचे श्रम वेचून उपयोगाचे नाही. आणि तीर्थाटनही फायद्याचे नाही. तरी पण, तू माझे एक म्हणणे ऐकशील तर तुला कदाचित मूल होऊ शकेल. ''

''आज्ञा गुरूवर !'' तो संस्थानिक नम्रपणे आतुरतेने म्हणाला.

''तुला मूल झालं तर..'' गुरुजी म्हणाले, ''तुला सव्वालाख रुपयांचं कुंकू मी म्हणेन त्या देवाला वाहावं लागेल.''

''आमेन !''

संस्थानिकांना मुलगा झाला. ते व त्यांची प्रजा आनंदली आणि आनंदाच्या भरात संस्थानिक गुरूजवळ बोललेला नवस विसरून गेला.

संस्थानिकाचा मुलगा १५-१६ वर्षाचा झाल्यावर एकदा अचानक आजारी पडला. राजवैद्याने उपाय केले. अंगारे धुपारे सर्व काही झाले. पण त्याच्या प्रकृतीत उतार काही पडेना. सर्व चिंताक्रांत झाले. असे कां होतेय याचा विचार करता करता संस्थानिकाला आपल्या नवसाची आठवण झाली. देवाला क्षमा मागत तो गुरूकडे गेला. त्यांची पण क्षमा मागितली व म्हणाला, ''गुरूवर ! माझे अपराध पोटात घाला. माझ्या मुलाला बरे करा. आणि सांगा मी कोणत्या देवाला सव्वालाखाचे कुंकू वाहू ?''

''राजन !'' गुरूवर्य म्हणाले, ''राज्यकर्त्यांनी दिलेली वचनं पाळायची असतात, टाळायची नव्हे ! तुला नवस आठवला बरे झाले. शेजारच्या गावात एक मोडके मंदिर आहे. तेथे जा आणि जाऊन तेथील मूर्तीला सव्वालाखाचे कुंकू आजच्या आज वाहून नवस फेड. मुलाला नक्की आराम पडेल.''

संस्थानिक आपल्या गुरूला प्रणाम करून शेजारच्या गावी गेला. तेथे एक दोन, एक दोन जेमतेम चालणारी किरकोळ किराणा दुकानं होती. संस्थानिकाने चौकशी केली. दुकानदार म्हणाले, ''महाराज सव्वालाखाची आमची ऐपतही नाही तर तीत सव्वालाखाचे कुंकू कसले असणार ?''

संस्थानिकाला काय करावे कळेना. गुरुजींनी तर आजच्या आज कुंकू वाहावयाला सांगितले आहे. आणि जवळपास मोठी बाजारपेठही नाही. तर सव्वालाखाचे कुंकू आणायचे कसे निराश होऊन संस्थानिक त्या मंदिराच्या ओसरीत जाऊन बसला.

तिथे एक म्हातारी राहत होती. त्या मंदिराची झाडझूड करून ती त्याच्या आसऱ्याला राहत असे. आले गेले लोक तिला कपडे, धान्य देत, त्यातच तिची गुजराण होई. संस्थानिकाला खूप वेळ काळजीत पडलेला पाहून तिला त्याची दया आली. पाण्याचा गडवा घेऊन ती त्याच्याकडे गेली. संस्थानिकाने पाणी प्याल्यावर तिने म्हटले, ''राजा तू एवढा सुखी माणूस, मग आज काळजीत कसा ? कुठलं दु:ख तू पावला आहेस मला सांग !''

राजाला आपले दु:ख कोणाला तरी बोलून दाखवावेसे वाटतच होते. त्याने सगळी हकीगत म्हातारीला सांगितली व खिन्न होत म्हणाला, ''इच्छा व ऐपत असूनही मला सव्वालाखाचे कुंकू देवाला

वाहता येणार नाही. तेवढं कुंकू या गावातच नाही. आणि गुरुजींनी तर आज सायंकाळपर्यंत ते वाहायला सांगितलं आहे. मी काय करू ? माझ्या मुलाचं कसं होईल ?''

''राजा !'' म्हातारी म्हणाली, ''काळजी करू नकोस. मी देईन तुला सव्वालाखाचं कुंकू !''

''तू !'' राजा अविश्वासाने म्हणाला, ''तू देशील मला सव्वालाखाचं कुंकू ?''

''होय !'' म्हातारीही ठामपणे म्हणाली, ''दे मला तुझे सव्वालाख, देते मी कुंकू.''

संस्थानिकाने आपल्या दिवाणाला इशारा केला. दिवाणाने उंटावर लादून आणलेले सव्वालाख रुपये नेऊन म्हातारीच्या सामानाजवळ ओतले. म्हातारी त्या संस्थानिकाजवळ आली आणि थरथरत्या हातातील एक लहानशी पुडी त्याच्याकडे देत म्हणाली, ''हं घे तुझं कुंकू !''

संस्थानिकाला म्हातारीचा वेडेपणा आवडला नाही. रागंरागं म्हणाला, ''काय, हे चिमूटभर कुंकू सव्वालाखाचं झालं?''

''राजा तू सव्वालाखाचं कुंकू वाहायचा नवस केला आहेस. आणि, सव्वालाख घेऊन मी ते तुला दिलं आहे. हे कुंकू खरं तर खूप झालं. कदाचित तुझ्या राणीच्या कपाळावर तेवढंही नसेल. जा वाहून ये ते कुंकू देवाला आणि फेड तुझा नवस ! ''

संस्थानिक काय ते समजला. त्याने ते कुंकू देवाला वाहून नवस फेडला आणि परत फिरला....

''तुम्हाला काय वाटते..'' गोष्ट ऐकत असलेल्या आमच्या अज्ञानकोशाने प्रश्न केला,

''त्या थेरड्या म्हातारीने संस्थानिकाला गंडा घातला की देवाला फसविले ?''

अज्ञानकोशाला मी एक गोष्ट सांगितली. कोणी एक मनुष्य स्वत:ला देवाचा पुत्र म्हणवीत असे. एकदा तो भंडारासमोर बसून लोक त्या भंडारात पैसे टाकीत आहेत हे पाहत होता. पुष्कळ धनवान लोक मोठमोठ्या रकमा टाकीत होते. तेव्हा एक गरीब विधवा आली व तिने दोन टोल्या म्हणजे एक दमडी टाकली. तेव्हा त्याने आपल्या शिष्यांना जवळ बोलावून घेऊन त्यांना म्हटले मी तुम्हाला खचित सांगतो, हे भंडारात द्रव्य टाकीत आहेत त्या सर्वांच्यापेक्षा ह्या गरीब विधवेने अधिक टाकले आहे. कारण त्या सर्वांनी आपल्या विपुलतेतून टाकले आहे. परंतु हिने आपल्या कमाईतून आपले होते नव्हते ते म्हणजे सर्व उपजीविका टाकली.

आता हे संस्थानिक लोक खरेच बहकल्या डोक्याचेच असायचे की काय कुणास ठाऊक ? मला बालपणी आजोबांनी सांगितलेली एक गोष्ट आठवते.

एका संस्थानिकाचे दिवाण खूपच चतुर म्हणून प्रसिद्ध होते. अगदी प्रति बिरबलच म्हणा हवे तर. त्याच्या चातुर्याच्या गोष्टी मुलूखभर पसरल्या. त्या ऐकून त्याच्या शेजारच्या संस्थानाच्या दिवाणाला त्याचा मत्सर वाटू लागला. त्याला कसे पेचात पकडावे म्हणून तो रात्रंदिवस विचार करू लागला. शेवटी त्याला सुचले.

त्याने आपल्या संस्थानातील दोन तीन लोकांची निवड करून त्यांना आपली योजना समजावून सांगितली व त्यांना त्या चतुर दिवाणाकडे पाठवून दिले.

ते सर्वजण प्रवास करत त्या दिवाणाकडे पोहचले. तो काहीतरी कामात होता. त्यातून सवड मिळाल्यावर तो त्यांच्याजवळ आला आणि नम्रपणे म्हणाला, ''बोला पांथस्थांनो, मी आपली काय सेवा करू शकतो ?''

आधीच शिकून आलेले ते लोक म्हणाले, ''दिवाणसाहेब, आपली कीर्ती व ऐश्वर्य पाहून आमच्या दिवाणाला आपल्याशी नाते जोडायची इच्छा आहे. आमच्याकडे एक लग्नाला आलेली विहीर आहे. ती आपणाला पसंत पडली तर लग्न करून घेऊन जा, असा आमच्या दिवाणसाहेबांचा आपणास निरोप आहे.''

''व्वा ! छान,छान !'' चतुर दिवाण म्हणाला, ''मला तुमच्या दिवाणाकडे सोयरसंबंध करायला खूप आवडेल. मी आंदण म्हणून काय देऊ ? तेवढे सांगा. म्हणजे लग्न ठरवून तुमच्या विहिरीला इकडे घेऊन येता येईल.''

''जी..जी..'' आलेल्यापैकी एकजण म्हणाला, ''आपली कृपा आमच्या दिवाणावर झाली यात सगळेच भरून पावलो. तरी पण आमच्या मालकांना विशेषकरून आपलेकडले काही आवडले तर, त्यांची इच्छा आपणास अवश्य कळवू !''

चतुर दिवाणाकडे आलेले पाव्हणे विहिरीच्या लग्नाची मागणी घालून निघून गेले. आणि लगेच काही दिवसांनी त्यांनी त्या चतुर दिवाणाला निरोप पाठवला, ''आमच्या लग्नाला आलेल्या विहिरीचा हुंडा पाच शेर अक्कल ठेवलेली आहे. आपण पाच शेर अक्कल पाठवून विहिरीला उजवून घेऊन जावे .''

चतुर दिवाणाला निरोप मिळाला. त्याने लगेच उत्तर पाठवले, ''आम्ही नुकतीच अक्कल पेरायला सुरुवात केली आहे. पीक आले की पाच शेर पेक्षा जास्त अक्कल पाठवून देऊ ! जिवाला तोशीस लावून

घेऊ नये.''

तसे पाहता चतुर दिवाणाचा विरोधक दिवाण प्रथमच हरखला. अकलेचे पीक घेता येत नसते हे त्या बेअक्कलाला देखील माहीत असावे ! तरी पण तो बिचारा चतुर दिवाणाच्या, पीक आल्यानंतरच्या पाच शेर अकलेची वाट पाहत बसला.

दिवस उलटत गेले. आता दिवस उलटले की ऋतू देखील उलटतात म्हणे ! तेही उलटले.

चतुर दिवाणाने एक दिवस एक मडके प्रतिस्पर्धी दिवाणाकडे पाठवले. आणि निरोप दिला, ''यातील पाच शेर अक्कल काढून घेऊन उरलेली अक्कल परत पाठवून द्या. तुमच्याकडे अकलेचा दुष्काळ असेल तर ठेवून घ्यावयास हरकत नाही. पण कृपया तसे कळवावे. आणि मडके तेवढे मात्र नक्कीच पाठवावे.''

त्या मडक्याला तोंड एवढेसे होते. आणि आत मडके भरून अख्खा कोहळा होता. त्या बिचाऱ्या विहिरीचे लग्न कधीच होऊ शकले नसेल ...नाही ?

आणखी एका दिवाण संस्थानिकाने तर कहरच केला म्हणायचा. फार पूर्वी म्हणजे बहुधा १८५० ते १८६० साली घडलेली ही गोष्ट. त्याकाळी 'ज्ञानोदय' मासिकात छापून आलीय.

तंजावर भागातील एक ब्राह्मण पितळेची मूर्ती घेऊन निघाला. दिवस उन्हाळ्याचे होते. ऊन्ह मी म्हणत होते. तशात त्या ब्राह्मण गृहस्थाकडे छत्रीही नव्हती. तो उघड्या हातात आपल्या देवाची पितळी मूर्ती घेऊन चालला होता. दुपार झाली. ती मूर्ती कोण तापली. ब्राह्मणाला वाटलं आपल्या देवाला तापच आला.

आपल्या देवाला ताप आला ही गोष्ट त्याला खटकू लागली. तो अस्वस्थ होऊ लागला. चालता चालता तो संस्थानिकाच्या महालासमोर पोचला, आणि चटकन आत शिरला; पण......

संस्थानिक आपल्या कारभाऱ्यासोबत मसलतीत गुंतले होते. ब्राह्मणाने त्याला तातडीचा निरोप दिला. ते बाहेर आले.

''काय भूदेव ! कसले काम काढले ?'' त्यांनी ब्राह्मणाला विचारले.

''काम कसले काढणार ? राजा मी तुला सावध करायला आलोय. तुझ्यावर मोठे संकट येणार. तुझ्या जनतेचे व्यवहार, तुझी नीतिमत्ता भृष्ट झालीय.'' ब्राह्मण रागेरागे ह्मणाला.

''क्षमा; देव, क्षमा ! कसली चूक झाली ? काय घडलं ते सांगा.'' राजा भीतभीत बोलला.

''मी तुझ्या मुलखातून चाललो होतो. माझ्या देवाची ही मूर्ती माझ्या हातात होती. सकाळी तिला काही झाले नव्हते. आता तुझ्या राज्यात प्रवेश करताच देवाला ताप चढला. एवढा की देवाच्या मूर्तीला हात लावणे शक्य नाही. हे तुझ्या राज्यात वाढलेल्या पापाचे द्योतक नाही काय ?''

''थांबा देव'' घाबरलेला संस्थानिक हात जोडत म्हणाला, ''मी राजवैद्याला बोलावतो. चांगले निदान करवतो व देवाच्या मूर्तीची आजारपणातील सर्व उपचार व शूश्रुषा करवतो. आपण तोवर विश्रांती घ्या.''

संस्थानिकाने ब्राह्मणास विश्रांती घ्यायला सांगून लगेच राजवैद्याला पाचारण केले. राजवैद्य आले. त्यांनी देवाच्या मूर्तीची नाडी पाहिली. आणि उष्माघात व कसल्याशा ज्वराचे निदान केले, उपायही सांगितले; काही मात्रा उगाळून मूर्तीला लावल्या व नंतर गार पाण्याची संततधार तीवर लावली. देव बरा व्हावा आणि त्याने झोपूही नये म्हणून होमहवन, ब्राह्मणभोजन व दान करावयास संस्थानिकांना सांगितलं.

गार पाण्याच्या धारेमुळे पितळी मूर्ती थंड झाली. देवाचा ताप गेला म्हणून संस्थानिकाने मोठा आनंद केला. त्याच्या संस्थानातील जनतेनेही ब्राह्मणभोजनं दिली. दानं केलीत. मूर्तीच्या मालकाला व इतरांनाही.

हा असला अचंबा आपल्या माणसातच आढळतो असे नसावे. पशुपक्ष्यांतही व जलचरांच्या जीवनातही घडत असावा. म्हणून तर कबीर म्हणतो,...

> एक अचंबा हमने सुना,
> कुआंमे लागी आग।
> पानी था सो जल गया,
> मछली खेले फाग ॥

आता हे असले आश्चर्य खुद्द कबिराने कोठे ऐकले ? ऐकले असले तरी त्यावर विश्वास कसा ठेवला ? आणि आग लागलेली विहीर, जळून गेलेले अवघे पाणी, आणि त्यातून जगून आनंदाची रंगपंचमी खेळणारे मासे यावर स्वत:च्या (अंध) विश्वासाने विश्वासून तो पांगळा विश्वास आपल्या

कवितेतून तुम्हाआम्हांवर का बरं लादला ? हे प्रश्न जाऊ द्या. अशीच एक आश्चर्याची गोष्ट मला स्वप्नात दिसली. ती सांगतोय□

एकदा एका कावळ्याला पक्ष्यांचे संमेलन व्हावे असे वाटले. त्याने आपल्या मित्रांसमोर ही कल्पना मांडली. सगळ्यांनी त्याला आनंदाने होकार दिला. आणि झाले ठरले पक्ष्यांचे संमेलन.

मूळ कल्पना कावळ्याची. म्हणून त्याचीच संमेलनाचा स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाली. निवड अर्थात निवडणुकीतून होणारी. कारण कबुतर, पोपट, बगळे, मोर वगैरे सुंदर पक्ष्यांनी कावळ्याला विरोध केला होता. त्यामुळे संमेलन दोन गटांत विभागले जाऊन प्रत्येक निर्णय मतदानानेच होणार असा होरा पत्रकारांनी बांधला होता.

संमेलनात आपले विचार मांडताना कावळा म्हणाला, ''मित्रांनो ! मी एक माणसांच्या वस्तीजवळ राहणारा पक्षी आहे. म्हणून मला त्यांच्या संस्कृतीची चांगली माहिती आहे. मी इथे काही पुस्तके आणली आहेत. ही काही गृंथालयातील पुस्तके नव्हेत. तर भारतातील माणसाची मुले शिकतात त्या त्या वर्गाची व विषयाची विविध पुस्तके आहेत. ती तुम्ही चाळलीत तरी वेगवेगळ्या वर्गाच्या व विषयाच्याही पुस्तकात एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे 'प्रतिज्ञा !'

''आम्हाला दाखवा, आम्हाला दाखवा '' सर्व पक्ष्यांनी गोंगाट केला.

''दाखवतो.'' कावळा म्हणाला, ''आधी माझे म्हणणे ऐकून घ्या. या भारतातील माणसांनी लोकशाही नावाची संकल्पना स्वीकारली आहे. म्हणून त्यांची मुले व शिक्षक रोज 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत' असे म्हणू शकतात.

''आम्हाला ऐकवा, आम्हाला ऐकवा'' पक्ष्यांनी पुन्हा गोंगाट केला.

''नुसतं पाहून, ऐकून भागणार नाही. मित्रांनो, लोकशाहीत आचरणाला महत्त्व आहे. आणि तुम्हाला काय सांगू ? त्या माणसासारख्या माणसांनी ते करून दाखवलं आहे. ते एकमेकाला भाऊ भाऊ समजतात. अगदी काश्मीरचा माणूस कन्याकुमारीच्या माणसाला भाऊ मानतो. तर आसामची बाई गुजरातच्या स्त्रीला बहीण मानते. माझ्या पूर्वजांनी मला सांगितलेलं आठवतं की, एका घरात राहणाऱ्या दोन बायांचं देखील पटत नाही. आणि आता हा एवढा बदल. ही किमया लोकशाहीची ! बंधू आणि भगिनींनो ! माणसाची धाव तरी किती, आमच्यापैकी कोणासोबत तो धावू शकतो ? नाही. कोणाच्याच नाही. म्हणून तर या पाषाणहृदयी माणसाने आपल्याला पकडण्यासाठी फासे, जाळे शोधून काढले. आणि आपली झेप केवढी ? अगदी आकाशाएवढी. तरी आपण आपसात भांडत बसलोय. छी...छी.... ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. बंधूंनो, म्हणून आपण लोकशाही स्वीकारलीच पाहिजे. आणि

म्हणून मी या संमेलनाचे आयोजन केले आहे. आता निर्णय तुम्ही घ्यायचा ! तोही बहुमताने. कारण, लोकशाहीत बहुमताला अनन्यसाधारण महत्त्व असते. आता बोला ! बहुमताने बोला !''

एवढे बोलून कावळा बसला. सर्व पक्ष्यांनी ''लोकशाही आणा, लोकशाही आणा'' असा गोंगाट करून पत्रकारांना भंडावून सोडले. एका पत्रकाराला राहवले नाही. तो कावळ्याजवळ गेला व म्हणाला, ''कावळे साहेब, तुमचे भाऊबंद एवढा गोंगाट करतायत् आणि तुम्ही शांत कसे ? त्यांना गप्प का करीत नाही ?''

''लोकशाहीच्या आगमनाची चाहूल म्हणजे जनतेचा आरडाओरडा वाढणे होय.'' कावळा शांतपणे म्हणाला, ''आणि पत्रकार साहेब, जनतेचं ओरडणं लक्षात न घेणे ही लोकशाहीतील यशस्वी नेत्याची पहिली ओळख होय.''

पत्रकार बिचारा मानेने होकार देत परत फिरला. कावळ्याने आपल्याजवळ बसलेल्या एका पक्ष्याच्या कानात सांगितले, ''बघ हा पत्रकार. लोकशाही पत्रकाराचा खरा प्रतिनिधी शोभेल. जनतेचा गोंगाट झाला की नेत्याला लगेच प्रश्न विचारणे आणि त्याच्या कोणत्याही उत्तरावर मान डोलावणे हे ज्याला जमते, तोच लोकशाहीत उत्तम व यशस्वी पत्रकारितेचे पुरस्कार घेऊ शकतो.'' कावळा बोलला पण काय ते त्या पक्ष्याच्या काही लक्षात आले नाही. नेत्याचे बोलणे जवळच्यालाही कळू नये हेही लोकशाहीच्या आगमनाचे द्योतक असावे. मागे कुठल्या तरी काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींचे म्हणणे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना कळले नव्हते म्हणतात. खरेच खरे किंवा खोटेच खोटे; काय ते गांधीजी जाणोत ! असो.

कावळ्याची पक्ष्यांच्या अधिवेशनामागील महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली. पक्ष्यांनी भारतीय माणसाप्रमाणे लोकशाही प्रणाली स्वीकारण्याचा बहुमुखी निर्णय घेतला. घटना समिती नेमली गेली. त्या समितीने निवडणुकीची शिफारस केली. निवडणुका जाहीर झाल्या.

कावळ्याने एका पक्षाची घोषणा केली. कावळेतरांनी दुसरा पक्ष काढला. त्यांनी गरुडाच्या नेतृत्वाने निवडणूक लढविण्याची घोषणा केली.

पक्ष्यांची पहिली सार्वत्रिक निवडणूक खूप अटीतटीची झाली. शंभर जागांसाठी निवडणूक झाली. दोन्ही पक्ष आपापल्या हमखास विजेत्याचे दावे करू लागले.

शेवटी निकालाचा दिवस उगवला. मतमोजणीला सुरुवात झाली. जसजसे निकाल येऊ लागले, तसतसे निवडणूक किती चुरशीची झाली हे जगाला कळून चुकले. दोन्ही गटांचे नेते, कार्यकर्ते आपापल्या पक्षकार्यालयात जमलेले होते.

अचानक कबुतर नवीन निकाल घेऊन आला. त्याने पक्षप्रवक्ता पोपटाच्या कानात काहीसे पुटपुटले. पोपटाने घोषणा केली, ''आमच्या कावळेतर पक्षाचे नेते गरूड हेच पंतप्रधान होणार !'' तो एवढे बोलून थांबला तर पोपट कसला? त्याने गरुडाचे अभिनंदन केले.

''पोपटा तू म्हणतोस ते ठीक'' गरूड साशंकतेने म्हणाला, ''आपल्या पक्षाचा नेता मीच. पण आपले खासदार आलेत तरी किती ?''

''किती म्हणजे ?'' पोपट सवयीने गरूडाच्या बोलण्याची नक्कल करत म्हणाला, ''एकदम एकोणपन्नास लोक आलेत आपले.''

''पोपटा'' गरूड म्हणाला, ''लोकशाहीत शंभरपैकी एकोणपन्नास म्हणजे बहुमत नव्हे.''

''हो साहेब.'' पोपट बहुधा भारतीय लोकांच्या पक्षप्रवक्त्याच्या नमूतेची नक्कल करीत बोलला, ''मला माहीत आहे. पण, विरोधी कावळे पक्षाचे सत्तेचाळीसच निवडून आलेले आहेत. तेव्हा निर्विवाद बहुमत आपलेच सिद्ध होईल.''

''कसे होईल !'' गरूड चिंतित स्वरात पुटपुटला, ''एकोणपन्नास व सत्तेचाळीस म्हणजे एकूण शहाण्णवच. उरलेले चार कोण ?''

''उरलेले चार गिधाडे आहेत.'' पोपट म्हणाला, ''ते अपक्ष म्हणून निवडून आले आहेत. त्यांची काय गणती ? बहुमत आपलेच ठरते.''

दोन्ही गटांनी रात्रभर खलबतं केली. कसे जमवायचे ते ठरवीत राहिले. सकाळच्या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर कोपऱ्यात एक बातमी छापून आली.

'आम्हाला पंतप्रधान करा !' गिधाडांची मागणी

गिधाडांचा युक्तिवाद असा की, ''आम्ही अपक्ष असलो म्हणून काय झालं ? आमच्याशिवाय कोणाचेच बहुमत होऊ शकत नाही. दोन्ही मोठे पक्ष एकत्र येण्याचा संभव नाही. तेव्हा ज्यांना राज्य करायचे असेल, त्यांनी आम्हाला नेता म्हणावे ...''

''जाऊ द्या हो, असलं स्वप्न पडल्याचं कुणाला सांगू नका. सांगून ठेवते ! लोक तुम्हाला पाहूनच भलभलत्या शंका घेतात. सरळ आग्र्याला नाही तर येरवड्याला देतील पाठवून, हे असं बोललात तर; हो कोणी सांगावं ? आणि ते खरं थोडंच होणार आहे ? म्हणे पक्ष्यांची लोकशाही.''

असाच कोठून तरी दौऱ्यावरून आलो होतो. थकला भागला. सायंकाळची थोडीशी, व थोडेसे जेवण घेऊन झोपी गेलो. भलतेसलते स्वप्न पडू द्यावयाचे नसेल तर अशी थोडीशी घेणे बरे.

सकाळी उठून पेपर चाळत चहाची वाट पहातोय तर नास्ता आला. दचकल्याचे भाव चेहऱ्यावर होते आणि मन धडकून गेले होते. म्हणतात नं ''आवळा देऊन....'' तसं काही नसलं तर मिळवली म्हणायची. पण कसले काय न कसले काय ? हिने सरळ म्हटलं, ''अहो ऐकलंत का ?''

''बोला'' मी पेपर चाळत कानाडोळा केला.

''मी म्हणत होते एवढ्यात कुठला दौरा, शिबीर, भाषण नाही ना कुठं ?'' ती म्हणाली.

''आहे. का ?'' मी न कळून विचारले.

''नाही, म्हणजे जाताना चेकवर सही करून जा. आठवणीनं, कोऱ्या चेकवर.''

''कोरा चेक ! काय घ्यायचं ठरवलं तू ?'' मी घाबराघुबरा होत विचारलं.

''घाबरायला काय झालं एवढं ?'' ती म्हणाली, ''मी माझ्या मैत्रिणीसोबत घर बांधतेय.''

''आणि आपलं हे घर ?''

''यात मुलं राहतील. आपण नव्या घरी जायचं राहायला.''

''अगं पण हे घर असताना पुन्हा घर बांधायचा खर्च कशाला ?''

''कशाला म्हणजे आम्ही ठरवलंय नक्की. आणि खर्च जास्त नाही पडणार. आम्ही सलग प्लॉटवर घर बांधणार दोघी.''

''त्यानं काय होणार ?''

''मधल्या भिंतीचा खर्च होणार नाही.''

''म्हणजे काय या नव्या घराला मधल्या भिंती नसणार ?''

''नसणार म्हणजे नसणारच ! आमचं मैत्रिणीमैत्रिणींचं प्रेमच तसं आहे. मग कशाला हव्यात मधल्या भिंती.''

''अगं, शेजाऱ्यावर आपल्याइतकीच प्रीती कर असं येशू म्हणाला होता. पण त्याने सुद्धा मध्यात भिंती नको म्हणून सांगितलेलं नाही.''

''विसरला असेल तो.'' ती म्हणाली, ''पत्ता द्या त्याचा मला. मी सांगेन त्याला पुढे भिंती नको म्हणून सांगायला. आणि हो विसरू नका, तो चेक तेवढा सही करून ठेवायला.''

महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक गो.नी.दांडेकर काही काळ गाडगेबाबांच्या सहवासात होते. एकदा गाडगेबाबा कुठेतरी गेले असताना त्यांना बरेच दिवस लागले. ते परत येऊन पाहतात तर गो.नी.दांडेकरांच्या हातापायात बेड्या होत्या. बाबांनी त्यांना विचारलं, ''कुठं डाका टाकला म्हणून या बेड्या पडल्या ?''

गो.नी.दांडेकर बाबांना म्हणाले, ''बाबा हात पाय मोकळे असले की मन काहीबाही करायला पाहतं. चांगलं आचरण घडावं म्हणून मी या बेड्या आपल्या आपण ठोकून घेतल्या.''

बाबा हसले आणि म्हणाले, ''गोनीदा, जगाचा उद्धार व्हायचा काळ जवळ आलेला दिसतो. तुमच्यासारखा पापाबद्दल, घाणीबद्दल किळस असलेला एक सत्पुरुष मला आजच भेटला.''

''तो काय करत होता बाबा ?'' गो.नी.दांडेकरांनी विचारले.

आणि बाबा सांगू लागले, ''एक जण आपला डावा हात बांधून स्वयंपाक करताना दिसला. मी त्याला म्हटले बाबा रे देवाने तुला दोन हात दिलेले असतांना तू एक हात बांधून घेऊन एका उजव्या हातानेच का स्वयंपाक करतोस ?''...

...''बाबा'' तो माणूस बाबांना म्हणाला, ''माझा डावा हात घाण धुतो, तो मी माझ्या स्वयंपाकाला कसा लावू ?''

''वा ! व्वा !!'' गाडगेबाबा त्या गृहस्थाला म्हणाले, ''काय नामी युक्ती शोधलीत तुम्ही. घाण म्हणजे पाप. पाप म्हणजे घाण धुणारा हात बांधायचे ठरवून तुम्ही पापमुक्त घाणमुक्त झाले. वा छान !''

डेबूजी म्हणजे गाडगेबाबा आपल्याला शाबासकी देत असल्याचे पाहून त्या माणसाला खूप आनंद झाला. तो बाबांना म्हणाला, '' बाबा मग आता तुम्ही पण हात बांधायला लोकांना शिकवा.''

''हो. जरूर हात बांधायला सांगेन. कशाला, आताच तुझ्या हाताने बांधून घेतो.''

तो गृहस्थ आणखीनच आनंदला. त्याने दोरी आणली. बाबाचा डावा हात कोपरापासून वळवून बांधला. सगळे लोक काय चाललेय हे न समजून पाहत होते. हात बांधून घेतलेला गृहस्थ लोकांना म्हणाला, ''बघा गाडगेबाबांनी माझे अनुकरण केले. तुम्ही पण असेच करा. पाप घाण वर्ज्य करा !''

''महाराज !'' गाडगेबाबा त्या गृहस्थाला म्हणाले, ''हात बांधला खरा. पण घाण तर पोटातच आहे. मी पोट कसे बांधू ? तेवढे सांगा !''

तो गृहस्थ निरुत्तर झाला आणि गो.नी.दांडेकरांना काय ते कळले. त्यांनी बेड्या काढून टाकल्या.

पापावरून आठवले. एकदा येशू ख्रिस्त पहाटेस मंदिरात आला. त्यावेळी व्यभिचार करीत असताना धरलेल्या एक स्त्रीला शास्त्री व परूशी ह्यांनी त्याच्याकडे आणले व तिला मध्ये उभे करून ते त्याला म्हणाले, ''गुरुजी, ही स्त्री व्यभिचार करीत असताना धरण्यात आली. मोशेने नियमशास्त्रात आम्हाला अशी आज्ञा दिली आहे की, अशांना दगडमार करावा. तर आपण हिच्याविषयी काय म्हणता ?'' त्याला दोष लावायला आपल्याला काहीतरी मिळावे म्हणून त्याची परीक्षा पाहण्याकरिता ते असे म्हणाले. येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला. आणि ते त्याला एकसारखे विचारीत असता तो उठून म्हणाला, ''तुम्हांमध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा.'' मग तो पुन्हा खाली ओणवून जमिनीवर लिहू लागला. हे शब्द ऐकून वृद्धातल्या वृद्धापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले. येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती. नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, ''बाई तुला दोष देणारे कोठे आहेत ? तुला कोणी दंड ठरविला नाही काय ?'' ती म्हणाली, ''प्रभुजी कोणी नाही''. तेव्हा येशू तिला म्हणाला, ''मीही तुला दंड ठरवीत नाही. जा. ह्यापुढे पाप करू नको.''

पापाची भीती सर्वकाळात माणसात विद्यमान होती. आणि आहेही. आपल्या भटकंतीच्या काळात एकदा मच्छिंद्रनाथ स्त्रीराज्यात गेले. हे स्त्रीराज्य म्हणजे मातृसत्ताक व्यवस्था. गेले तर गेले, त्यांच्या तपोबलाने मोहित झालेल्या राणीच्या प्रेमात पडले.

आपले गुरू खूप दिवस परत आले नाहीत म्हणून गोरखनाथ त्यांच्या शोधाला निघाले. गुरूच्या भटकंतीचा मागोवा घेत गोरखनाथ त्या स्त्रीराज्यात पोहोचले. पण पाहतात तर काय ? गुरू मच्छिंद्रनाथ राणीच्या ऐश्वर्याच्या प्रेमात पडलेले. हे तर पाप. गोरखनाथ एक ढोलक घेऊन राजवाड्याबाहेर वाजवू लागले, ''चलो मच्छिंद्र गोरख आया.''

गोरखनाथाचे राजवाड्याबाहेरून केलेले आवाहन ऐकून मच्छिंद्रनाथ ओशाळले. पण ज्या मोहाने त्यांना राजवाड्यात जखडबंद केले होते तो त्यांना तुटत नव्हता. राणीचे मनही मोडवत नव्हते.

पण गोरखनाथही कसले वस्ताद. शेवटी त्यांचेच शिष्य. त्यांनी राजवाड्यासमोर ठाण मांडून आपला ढोलक वाजविणे चालूच ठेवले. शेवटी मच्छिंद्रनाथ राजवाड्याबाहेर आले. येताना त्यांची झोळी भरलेली होती.

परतीच्या प्रवासात सवयीने गोरखनाथ पुढे पुढे आणि मच्छिंद्रनाथ मागे मागे चालत होते. चालत चालत ते एका घनदाट अरण्यात आले. मच्छिंद्रनाथ एकदम थबकून म्हणाले, ''गोरख तू पुढे चालतो आहेस. मागून कोणी आलं तर? मला भीती वाटते. तू माझ्या मागं चाल.''

मच्छिंद्रनाथाचे बोलणे ऐकून गोरखनाथ आश्चर्यचकित झाले. आपले तपोनिधी गुरू कशाला भीत आहेत ? त्यांना कळेना.

ते निबिड अरण्य पार करताना मच्छिंद्रनाथ सतत मागे पुढे, पुढे मागे होत होते. शेवटी ते जंगल संपले. पुढे एका विहिरीजवळ ते थांबले. तेव्हा आपली झोळी गोरखनाथाला देत मच्छिंद्रनाथ म्हणाले, ''गोरख मी बाहेर जाऊन येईपर्यंत ही झोळी सांभाळ. खाली ठेवू नको. कुणाला देऊ नको. मला भीती वाटते.''

मच्छिंद्रनाथ दूर गेल्यावर गोरखनाथांनी झोळीत डोकावले. पाहतात तर काय, ती झोळी हिरे, माणके, पाचू, सोन्याच्या मौल्यवान दागिन्यांनी भरलेली होती.

काही वेळ विश्रांती घेऊन मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ पुन्हा चालू लागले. त्यांना समोर आणखी एक जंगल लागले. तसे गोरखनाथला मच्छिंद्रनाथ म्हणाले, ''तू मागे मागे चाल. मी पुढे पुढे होतो. मला भीती वाटतेय.''

ते ऐकून गोरखनाथ त्याला शांतपणे म्हणाले, ''गुरुजी आता भीती कसली ? भीती मागे राहिली.''

तसे मच्छिंद्रनाथांनी चमकून आपली झोळी पाहिली. आणि ते दचकले. गोरखनाथ बोलले ते खरेच होते. मच्छिंद्रनाथांच्या झोळीतील सर्व धनदौलत गोरखनाथांनी कोठेतरी फेकून देऊन तेवढ्या वजनाचे दगडधोंडे त्या झोळीत भरले होते.

म्हणतात पुढे वाट चालताना मच्छिंद्रनाथांना भीती वाटली नाही.

गुजरातेत बडोदा शहराला लागून ९० ते १०० कि.मी. अंतरावर एक गाव आहे. तेजगढ. गुजरातेतीलच जुन्या छोटा उदेपूर संस्थानात ते येते. तेथील राजघराण्याचे वारसदार श्री. वीरेंद्रसिंहजी चौहान काही काळ संसदसदस्य होते. त्यांच्या सहकार्याने डॉ. गणेश एन. देवी यांनी तेजगढ येथे भाषा संशोधन व प्रकाशन केंद्र स्थापन केलेले आहे. आदिमांच्या प्रत्येक बोलीवर व सर्व भारतीय भाषांवर तेथे संशोधन–अध्ययन व जरूर भासली तर प्रकाशन व्हावे हा केंद्राचा उद्देश !

एकदा 'आदिवासीची ज्ञानपद्धती' या विषयावरील चर्चासत्राला डॉ. जी. एन. देवी यांनी मला बोलावले होते. त्यांना मला गोष्टी सांगण्याचा कोण सोस आहे हे माहीत होते. त्यांनी मला गोष्टी सांगण्याला सांगितले. भारतभरातून सर्वच प्रांतांतून लोक आलेले. मराठी चालणार नव्हते. हिंदीतून बोलणे जमेलच याची खात्री नव्हती. खरे तर माझी तारांबळच उडाली. पण म्हणतात ना 'मान सांगावा जनात आणि अपमान लपवावा मनात.' तर मी जे बोललो ते अपमान लपवत सांगून टाकतो. त्यात मानाचे काय ?

''मित्रांनो ! संयोजकांनी मला गोष्टी सांगायला सांगितले आहे. मी काही जुन्या पुराण्या गोष्टी सांगणार नाही. एक गोष्ट माझ्या शेजारी घडली ती सांगतो.

हवे तर अपवाद म्हणा जगभरातला. पण सुदैवाने मला शेजार चांगला मिळालाय. एकदा माझ्या शेजाऱ्याच्या मोठ्या मुलाचं लग्न ठरलं. मुलगा चांगला शिकलेला, देखणा आणि चांगला कमावता होता. त्याला मुलगी देखील तशीच अनुरूप मिळाली.

लग्न झाल्यानंतर काय झाले कोणास ठाऊक ! हा हसतमुख मुलगा हरवल्यासारखा उदास उदास राहू लागला. मी त्या लग्नात जुळवण्यापासून शेवटच्या सतरंज्या उचलण्यापर्यंत होतो. राहवले नाही. एक दिवस विचारून बसलो, '' सनी बेटा, अलिकडे तू उदास दिसतोस, तुला बरे नसते कां ?''

''तसे नाही काका, मला कसलाच आजार नाहीये'' तो म्हणाला.

''मग ?'' मी पिच्छा पुरवला, ''तुला सूनबाई आवडली नाही, की तुमचं पटत नाही ?''

''आवडली. ती, तिचं घराणं, तिनं आणलेला हुंडा सगळं आवडलं.'' तो किंचित थांबत एकदम बोलून गेला, ''फक्त ती समजदार नाही.''

'' अरे'' मी त्याला समजावलं, ''सहवासानं होईल ती समजदार. अशी काळजी नको करूस.''

सनी काही न बोलता उदासपणे निघून गेला. चार आठ महिने असेच गेले. त्याच्या तोंडावर मला हसू दिसले नाही.

नंतर मी तीनेक महिन्यांच्या एका प्रवासाला निघून गेलो. परत आलो तर सनी पूर्वीसारखाच हसू लागलेला दिसला. बरे वाटले.

चार सहा दिवसांनी कसली तरी सुटी पडली. सनी त्याच्या बायकोला घेऊन माझ्याकडे आला. दोघेही आनंदात होते. दार मीच उघडले होते. सनीला बैठकीत बसवून घेत मी त्याच्या बायकोला म्हटले, ''रेणुका बाळ, किती दिवसांनी आलीस. जा आत जा, आन्टीला चहा पोहे सांग.''

ती आत गेली तसे मी सनीला विचारले, ''आनंदात आहेस ?''

''हो, खूप'' तो म्हणाला.

''अरे पण तुझी रेणुका समजदार नाही म्हणून तू मागे सांगत होतास ना ?'' मी विचारले.

''काका'' सनी आनंदाने म्हणाला, ''आता ती समजदार—शहाणी झालीये.''

''अरे पण कसा शिकवलास तू तिला समजूतदारपणा ?'' न राहवून मी विचारत होतो.

''काका आता रेणुका विपुलच्या साड्या घालते.''

माझी दांडी उडाली. विपुलच्या साड्यांचा आणि समजूतदारपणाचा कसला संबंध मला कळले नाही.

मित्रांनो ! गोष्ट इथेच संपलेली नाही. मी तेजगडला येणार हे सनीच्या बायकोला—रेणुकाला कळले. ती माझ्याकडे आली व म्हणाली, ''अंकल तुम्ही तेजगडला जाताय ?''

''हो'' मी उत्तर दिले.

''बडोद्यावरून?'' तिचा प्रश्न.

''हो.'' —मी.

''बडोदा खूप मोठं शहर आहे ना ?'' —ती.

''हो, तुला काही आणायचं तेथून ?'' मी विचारले.

''हं'' ती म्हणाली, ''पण एक अट आहे.''

''काय ?'' मी बुचकळ्यात पडून विचारले.

''ते ह्यांना कळू देऊ नका'' तिने विनवले.

''असं काय बोलवणार आहेस तू ?''माझी उत्सुकता उगीचच ताणली जाऊ लागली होती.

''मला...'' आणि ती एका दमात म्हणून गेली, ''मला ह्यांच्यासाठी विपुलचा एक सूट मटेरीयल आणून द्या!''

आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास ही एक अलौलिक आनंदाची गोष्ट. आता आदिवासी बोली व साहित्याचा अभ्यास करणारे अनेक व्यासंगी रावण हा आदिवासी राजाच होता असे प्रतिपादन करू लागले आहेत. तसे भारतात रामकथेचे कितीतरी पर्याय आढळतात. प्रांतोप्रांती व बोलीबोलीतून रावणाचीही अनेक रूपे समोर येतात. अशीच एक रावणाची कथा माझ्या बंजारा गोरबोलीत आहे.

रावण हा सीतेचा पिता असे काही लोक मानतात. तसे असेल तर रावणाने सीतेचे अपहरण का केले ? भा.द.वि. ४९८ (अ) पूर्व काळात सासरी मुलीला नीट वागणूक मिळाली नाही तर आदिवासी मुलीला माहेरी घेऊन येत. हा त्यातलाच तर प्रकार नसेल ?

रावण हा दुष्ट होता असेही नाही. अखिल मानवजातीला सुखी करण्यासाठी त्याचं एक उदात्त स्वप्न होतं. ते असं : १. स्वर्गाला शिडी लावायची, २. अग्नीतून धूर काढून टाकायचा, आणि ३. समुद्राचं पाणी गोड करायचं.

मला रावणाच्या या जगावेगळ्या स्वप्नाचं मोठं कोडं पडलं होतं. या तीनही गोष्टींचा नेमका असा एकत्रित संबंध काय ? अर्थ काय ? खूप शोधाशोध केल्यावर एका म्हाताऱ्या गृहस्थाने सांगितले. तो म्हणाला, ''बाबू ! तुमचा फसवा समाजवाद येईल तेव्हा येईल. रावणाने समाजवादाचे भव्योदात्त स्वप्न रंगविले होते. आणि म्हणून तो जगभरातल्या दलित, शोषित, पीडित, वंचितांना स्वर्गापर्यंत पोचवायला निघाला होता. म्हणजे सर्वांना स्वर्गसुखाची समान संधी हे त्याचं ध्येय होतं. अग्नीतून धूर काढायचा म्हणजे माणसाच्या मनातील अहंकार आणि क्रोध काढून टाकायचा. याच अहंकार आणि क्रोधापायी त्याची सोन्याची लंका जळाली होती हे तो विसरू शकत नव्हता. आणि बाबू, एकाच्या मनातील अहंकार आणि क्रोध काढला की दुसऱ्याच्या डोळ्यातील अश्रूही गोड होतात. एरव्ही समुद्राच्या पाण्याइतकेच माणसाच्या डोळ्यातील अश्रूही खारटच असतात. पण हे सांगायचं कोणी कुणाला ? ''

माणसाच्या श्रद्धा कधी अंधश्रद्धेत बदलून जातील याचा नेम नसावा. बालपणी तर मी फारच देवभोळा होतो. निरनिराळ्या बाबांचे चमत्कार, तपोबल, सिद्धीबद्दल ऐकायचो. ते सर्व कसे आत्मसात करता येईल ? याचा तासनुतास, दिवसचे दिवस शोध घ्यायचो. त्यातलीच काळ्या हळदीची गोष्ट.

माझ्या जन्मतांड्यापासून १५ कि.मी. अंतरावर एक गाव आहे. म्हणतात माझ्या जन्मापूर्वीच (?) वर्ष आधी तरी तेथे एक साधूपुरूष येऊन राहत होते. त्या गावालगतच्या टेकडीवर त्यांनी एक मंदिर बांधले. मग पायऱ्या बांधल्या. गावालगत भव्य प्रवेशद्वार उभारलं आणि बघता बघता त्यांचा प्रभाव वाढला. भक्त वाढले. बांधकाम वाढले. त्यांनी आणखीही काही मंदिरं उभारली.

त्यांना लोक 'देव' म्हणत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांचे वय, नाव, गाव काहीही लोकांना माहीत नव्हते. उत्पन्नाचे साधन आणि आराध्यदैवतही माहीत नव्हते. ते कोठे मारुती मंदिर उभारत. तर कुठे

कृष्णमूर्ती. तिकडे मराठवाड्यात देखील त्यांनी काही बांधकाम केले असल्याचे मी ऐकून आहे.

या साधूलोकांची प्रसारयंत्रणा आणि कीर्ती यांच्यात कमालीचे संबंध असूनही त्यांजवर विश्वास अंधविश्वास ठेवणाऱ्यांना ते कधीच समजूनही उमजत नाही. म्हणून त्यांच्या निस्सीम शरणागतांची संख्या आणि संपत्तीची गणिते मांडत नाहीत.

देव एकाच आसनावर बसत. आणि बांधकामाची मजुरी असो, भांडारघराचे बिल, की याचकांची दानं असोत ते त्या आसनाखाली हात घालीत. पैसे काढत. देऊन टाकत. तेथे व्यवहारासाठी, देण्याघेण्यासाठी दिवानजी किंवा कारकून नसे. त्याचे क्षेत्र वेगळे. त्यामुळे त्यांना काळ्या हळदीची सिद्धी प्राप्त आहे असे लोक बोलू लागले. ती काळी हळद ते आपल्या आसनाखाली ठेवून असतात, म्हणून त्या आसनाखाली पाहिजे तेव्हा हात टाकला की पाहिजे तेवढे पैसे काढू शकतात, असे त्या सिद्धीचे स्वरूप होते.

मला कळू उमजू लागले तेव्हा देव विशिष्ट राजकीय नेत्यांची बाजू घेत असत. काहींना जवळ घेत; काहींना दूर ठेवत.

१९८२-१९८३ च्या सुमारास आम्ही जुन्या पुसद तालुकाभर एक पदयात्रा काढली होती. विविध जातीधर्माचे युवक त्यात सामील झाले होते. मी मिळेल त्या वाहनाने पुढे जाऊन पदयात्रींच्या भोजन, निवासाची सोय करायचो. एक मुक्काम देवांकडे येत होता. गेलो, देवांना भेटलो. हेतू सांगितला. ते म्हणाले, ''आम्ही पंचवीसच काय पाचशे लोकांना जेवण देऊ. पण तुमच्यामध्ये कोण जातीचे लोक आहेत ? ते आधी सांगा.'' ''सर्व जातीच काय, पण सर्वच धर्मांचेही लोक आहेत.'' मी उत्साहाने सांगितले.

''तर मग कसं शक्य आहे ? '' ते म्हणाले, ''इथे परधर्मीयांना प्रवेश निषिद्ध आहे.''

मी उठून निघून आलो. तेथून पुढे तीन मैलांवर पदयात्रींच्या भोजन, निवासाची सोय केली. ठरला कार्यक्रम खोळंबला. उपाशीपोटी पायपीट वाढली.

देवांबद्दल आणखी एक प्रसिद्धी होती. त्यांचे वय कोणाला माहीत नव्हते. कोणी सांगत त्यांनी चांगदेवासोबत सिद्धीसाधना केली आहे. तर काहीजण सांगत; ज्ञानेश्वर तुकारामाच्या पंगतीचा लाभ त्यांना झाला आहे. छत्रपती शिवाजींना संकटकाळी आपल्या सिद्धीबलाने त्यांनी मदत केल्याचेही ऐकू येई.

महाराष्ट्राच्या राजकारणातून दिल्लीला गेलेले आणि अनेक पदे भूषविलेले दोघे मराठवाडी मराठे त्यांचे निस्सीम भक्त होते. इतरांचा काय पाड ? देव चिरंजीव आहेत असा समज सर्वत्र पसरला. आणि

हे देव १९८८–८९ च्या सुमारास नागपुरात 'शिव' झाले, म्हणजे मरण पावले.

त्यांचे अनेक भक्त माझ्या वैयक्तिक परिचयातील होते. त्या सर्वांचा सूर एकच होता, ''कोणी तरी करणी केली म्हणून देवाने देह ठेवला. नाही तर देव चिरंजीव होते. कलियुग संपेपर्यंत राहिले असते....''

''तुम्ही कुठवर राहणार ?'' त्यांच्यातील एकाला मी विचारले. तो म्हणाला ''देव ठेवील तोवर !''

''भल्या माणसा ! ज्या देवाने स्वत:चा देह ठेवला नाही, सांभाळला नाही, तो तुझ्या देहाची काळजी कशी काय घेणार ?''

ऐकून गृहस्थ भांबावला. पण त्याने डोलावलेल्या मानेने माझ्या सांगण्याला ठाम नकार दिला होता.

मला भगवान बुद्धांची एक गोष्ट आठवली. ती काहीशी अशी –

एकदा भगवान बुद्धाकडे एक स्त्री येऊन रडू लागली. भगवान बुद्धाने तिला कारण विचारले. ती म्हणाली, ''माझा एकुलता एक मुलगा मरण पावला आहे.''

बुद्धांनी तिला मृत्यूच्या अटळतेविषयी समज देऊन शोक आवरण्यास सांगितले. पण ती बाई अधिकच शोक करत म्हणू लागली, ''तुम्ही एवढे भगवान. मग म्या गरीब बाईचा एकुलता एक मुलगा जिवंत का करू शकत नाही ? तुम्ही माझ्यासाठी ते केले पाहिजे.''

समज देता देता भगवान बुद्ध थकले. शेवटी तिला म्हणाले, ''बाई तू जाऊन ज्या घरात आजवर कोणी मेला नसेल; अशा पाच घरून मूठ मूठ तांदूळ घेऊन ये. मग मी तुझ्या मुलाला जिवंत करीन.''

ती बाई वणवण भटकली. पण माणूस न मेलेले एकही घर तिला सापडले नाही. तिचा हट्ट मावळला.

बुद्ध आणि त्यांचे तत्वज्ञान भारतातलेच ना ?

महाराष्ट्राची गुणी अभिनेत्री स्मिता पाटील अमळथे येथील होती. धुळे जिल्ह्यातील हे गाव. एकदा तेथे गायरानाबद्दल मोठे वादळ झाले. या लढ्यात आदिवासींच्या बाजूने साम्यवादी चळवळीतील युवकांपासून बाबा आढावांपर्यंत सगळेच उतरले होते. 'श्रमिक संघटनेच्या' एका मोर्च्यात सहभागी

व्हायला मी धुळ्यात गेलो होतो.

मी देखील अमळथ्याला गेलो. तेथील छात्र युवा संघर्ष वाहिनीच्या गटाने सभा ठेवली होती. अनेकांची भाषणे झाली. काहींची समज देणारी. काहींची प्रक्षोभक. अमळथ्याला त्या दिवशी सैनिक छावणीचे स्वरूप आलेले होते, एवढे एस.आर.पी.चे तंबू तेथे पडले होते.

परतलो तेव्हा अनेक तरूण प्रक्षुब्ध आविर्भावात एकमेकांबरोबर तावातावाने बोलत होते. सगळ्यांचे म्हणणे थोड्याफार फरकाने शोषितांचे शोषण थोपविण्यासाठी एक राष्ट्रव्यापी संघटन हवे हेच होते. आणि मला जे.पी.जींचे संघटनविषयक विचार आठवत होते.

बिहार आंदोलनाचा तो काळ होता. त्यांनी छात्र युवा संघर्ष वाहिनी रीतसर काढलेली होती. ते खरे तर त्यावेळी राष्ट्रनायक होते. आम्ही काही मित्र पाटण्याला गेलो. त्यांच्या कदमकुआ येथील निवासस्थानी पोचलो. भेट मागितली. ते फार व्यस्त होते. आम्ही महाराष्ट्राच्या अमर हबीब कडून वेळ मिळवला. त्यावेळी तो जे.पी.जींचा जवळचा युवक कार्यकर्ता होता. पाच मिनिटांची भेट मिळाली. त्यातही एक अट होती. जे बोलायचे ते मुद्दे आधी लिहून द्या.

आम्ही एकच मुद्दा लिहून दिला होता. मला आठवतो तो, ‘‘देशाला मिळालेल्या स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी एक मजबूत संघटना हवी. ती कशी असावी याबद्दल सांगा.’’

नियोजित वेळी आम्ही त्यांच्या कक्षात गेलो. अमर हबीब तेथेच होता. संघर्ष वाहिनीतील संबंधामुळे आम्ही अरे कारे ने बोलत असू.

आम्ही काल लिहून दिलेल्या चर्चेच्या मुद्याचा कागद जे.पी.जींनी चाळला. आणि त्यांनी अमीर हबीब कडे पाहिले. अमर म्हणाले,

‘‘अशा खूप संघटना आपल्या देशात आहेत. तुम्ही तुम्हाला आवडेल ती निवडा. आणि राष्ट्रउभारणीला लागा.’’

सोबतचे युवक चुळबुळले. एका मिनिटात भेट संपत होती. तीही जे.पी.जी बोलल्याशिवाय....

कोणी तरी म्हणाला, ‘‘अशा सर्व संघटना फुटीर संघटना आहेत. आम्हाला न फुटू शकणाऱ्या, अभेद्य संघटनेविषयी सांगा.’’

‘‘मग’’ जे.पी.जी.लकाकणाऱ्या नजरेने आमच्याकडे पाहत म्हणाले, ‘‘तुम्ही दरोडे घाला.’’

काय ऐकतोय ? आम्हाला कळेना. राष्ट्रनायक जे.पी.जी मार्गदर्शन मागायला आलेल्या आपल्या स्वतंत्र देशातील युवकांना दरोडे टाकायला सांगत होते !

‘‘ते का ?’’ मी विचारले, ‘‘त्याने काय होईल ?’’

''फार काही नाही.'' ते शांतपणे म्हणाले, ''पण तुम्हाला हवं असलेलं मजबूत संघटन मिळेल. चोर□लुटारू□दरोडेखोरांच्या संघटना कधीच फुटत नसतात. आणि कोणी फुटलाच तर तो वाचत नसतो.''

जे.पी.जींनी अमर हबीब कडे पाहिले. अमरने आम्हाला वेळ व बोलणे दोन्ही संपल्याचा इशारा केला.

परतताना मी या देशातल्या फुटलेल्या व न फुटलेल्या राजकीय पक्षांची गणना मनातल्या मनात करत होतो.

तर... अमळथे येथून परतताना जे.पी.जींना जाऊन झालेले दिवस मोजत होतो.

बाबा आमटेंचा सोमनाथ प्रकल्प मागे एकदा पाहिला होता. खूप गप्पा झाल्या. कवितावाचन झाले. आयुष्यात एक दिवसाचे सोने झाल्याचे समाधान मिळाले होते.

ते पुन्हा आठवायला कारण घडले. परवा तेथे प्रौढ साक्षरांसाठी पुस्तक लिहिणाऱ्या लेखकांचे शिबीर झाले. आमंत्रण होते. चार दिवस राहता येणार होते. चार दिवसात साक्षरांसाठी एक पुस्तक लिहून द्यायचे ही मुख्य अट होती. गेलो.

प्रौढ साक्षर विभागाचे श्री सोनोने होते. त्यांनी मला कथाकथन करायला सांगितले. कदाचित वासरात मी बापडा त्यांना म्हातारा वाटलो असेन!

मी गोष्ट सांगू लागलो...

... एकदा घोरपडीची व एका अजगराची मैत्री झाली. मैत्री वाढता वाढता एवढी गाढ झाली की ते दिवसातून एकदा तरी भेटत.

असेच दिवस जात होते. आता अजगर घोरपडीला 'ताई' म्हणू लागला आणि घोरपड अजगराला 'दादा' म्हणू लागली.

एके दिवशी अजगर घोरपडीला म्हणाला, ''घोरपडताई, घोरपडताई, एवढे दिवस आपण एकमेकांना भेटतो आहोत. आतापर्यंत आपण एकमेकांची घरे पाहिलेली नाहीत. तू उद्या माझ्याकडे ये.'' घोरपडीने आनंदाने अजगराला होकार दिला.

दुसरे दिवशी घोरपड अजगराकडे गेली. अजगर घोरपडीची वाटच पाहत होता. त्याने घोरपडीला

बसवून घेऊन तो तिच्या समोर बसला. आणि जिभल्या चाटू लागला. घोरपडही बोलत बोलत जिभल्या चाटू लागली. जिभल्या चाटता चाटताच अजगराने जनमेजयालाही नाकी नऊ आणणाऱ्या आपला पूर्वज तक्षकाचा इतिहास सांगितला. घोरपडीने तानाजीच्या विजयाची शिल्पकार यशवंती घोरपड आपली कशी जवळची नातेवाईक आहे हे सांगितले.

दिवस मावळत आला. घोरपड व अजगर एकमेकांकडे पाहत जिभा चाटत होते. शेवटी अजगर म्हणाला, ''घोरपडताई, घोरपडताई, आता संध्याकाळ झाली. मी थोर कुळातला असल्यामुळे घरात काही साठवायची मला सवय नाही. म्हणून आता भूक लागल्यामुळे मला गेलं पाहिजे.''

''काही हरकत नाही.'' घोरपड म्हणाली, ''दादा, मी पण काही लबाडाघरी लालची होऊन आलेली नाही. मी देखील थोर कुळातली. घरात काही साठवायची मलाही सवय नाही.''

आणि दोघेही आपापल्या वाटेला लागले.

मी गोष्ट संपवली. मी गोष्ट संपवली की, माझी होणारी हमखास नाचक्की कशी सांगू ?

सोनोनेसाहेब माझे स्नेही. समारोप करताना म्हणाले, ''आत्मारामजींची कथा चांगली असेलही. पण आता आपण आपल्या गोष्टीतून पशु□पक्षी, वृक्ष□वेली यांना बोलावयाला लावू नये. आता माणूस बोलू लागलाय !''

मी मनातून खजिल झालो होतो. ही काय मी भलतीच गोष्ट सांगून बसलो. खरंच आता माणूस बोलू लागला असला पाहिजे. पण मला आठवत कसे नाही ? छत्रपती संभाजीच्या वीरमरणापर्यंत लोक काय काय बोलत आले होते ! शहीद भगतसिंगाला फासावर देताना खरंच महात्मा गांधी काही बोलले होते ?!! तर महात्मा गांधींचा वध केल्यानंतर कोर्टातल्या कबुलीजबाबात नथुराम गोडसेही काही बोलला होता म्हणतात....

खरंच मला आठवत कसे नाही ? आणि ऐन आणीबाणीत आचार्य विनोबांनी मौन धारण करूनही 'अनुशासन पर्व' असे लिहून देऊन माणूस बोलू□लिहू लागल्याचं दाखवून दिलं होतं. आणि आणीबाणीनंतरच्या निवडणुकीत निवडून आलेले सत्ताधारी पक्षाचे खासदार राजघाटाच्या साक्षीने काही बोलले होते ? मला आठवत कसं नाही ?

परवा भाजीवाल्याकडून आणलेले कांदे घरी कमी भरले. तर अज्ञानकोशाने गळा काढला, ''जळ्ळं मेलं गांधीचं नाव ! दांडी यात्रा काढून दीडदमडीच्या भाजीवाल्यांनाही त्यांनी 'दांडी' मारायची शिकवण दिली.....''

''अहो....अहो !'' मी म्हणालो, ''अगं ती दांडी यात्रा 'दांडी' मारायचं शिकण्यासाठी किंवा दांडी मारायची शिकविण्यासाठी नव्हती. कायदेभंग चळवळीचा तो प्रतीकात्मक भाग होता.''

''राहू द्या तुमचं अगाध ज्ञान.'' तिने जरब दिली. म्हणाली, ''ती दांडी यात्राच होती.''

''हो मम्मी,'' मी खिंडीत सापडलो की बाळ्या नेमकी साथ देतो, ''ती दांडी यात्रा मिठासाठी होती.''

आणि बाळ्या गाऊ लागला,

'उचललेस तू मीठ मूठभर ! सामाज्याचा खचला पाया !''

''चुप रे कार्ट्या.'' अज्ञानकोश फिसकारले, ''म्हणे मिठासाठी होती ! मीठ काय फक्त दांडीलाच होते ? सुरतेला नव्हते ? मग गांधींनी सुरत यात्रा का काढली नाही?''

''असेल असेल,'' मी म्हणालो, ''पण गांधीजींना दांडीच सोयीची वाटली असेल.''

''कां नाही वाटणार ? शेवटी बनियाच ते. म्हणतात ना चोर चोरी से जाय बनिया दांडी से ना जाय.''

''अहो पण कुठे मीठ, कुठे कांदे आणि कुठे दांडी ? काही ताळमेळ नको का?'' मी काकुळतीला आलो.

''म्हणे ताळमेळ. मिठाचा आणि माणसाचा ताळमेळ तो कसला ? '' तिने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली, ''मीठ काय माणसाला आवश्यकच आहे ? तसं असेल तर सिरोंचा गडचिरोली भागातल्या आदिवासींचं कसं भागतं ? त्यांना मीठ माहीतच नाही ! त्याच्या बोलीभाषेत मिठाला नाव देखील नाही !''

''अगं पण ते लोक दुर्गम भागात राहतात. आणि मिठाऐवजी लाल मोठमोठ्या मुंग्या वाळवून साठवतात. अन् गरज पडेल तेव्हा तू जसं अर्धा एक टेबलस्पून मीठ भाजीत टाकतेस, तसंच ते मुंग्या टाकून भाजी करतात. मुंग्या खारट असल्यामुळे त्यांना त्या भाजीत मिठाची चव मिळते म्हणतात.''

''तेच ते,'' निष्णात वकिलाच्या आविर्भावात ती पुन्हा विचारू लागली, ''असं आहे बघा, तुम्ही म्हणता की गांधींनी मिठासाठी दांडी यात्रा काढली ?''

''हो, ठामपणे काढली !''

''तुम्ही म्हणता आपल्याला ५० वर्षांपूर्वी मिळालेलं स्वातंत्र्य मिळवून देण्यात गांधींचा वाटा मोठा

होता ?''

''हो. तेही खरं आहे; असं ऐकतोय.''

''मग का हो, स्वातंत्र्य तर सगळ्यांनाच मिळालं नं ?''

''हो. यच्चयावत् सगळ्या भारतीयांना.''

''आत्ता एक सांगा. सर्व भारतीयांना स्वातंत्र्य मिळालं. गांधींनी मिळवून दिलेलं स्वातंत्र्य ! मग गांधींनी मिळवून दिलेलं मीठ त्या आदिवास्यांना का नाही मिळत ?''

मी अवाक् ! मी निरुत्तर !!

''म्हणून मी म्हणते गांधींनी कुठल्याही मिठाबिठासाठी दांडी यात्रा काढली नाही तर दांडी मारायची शिकायला आणि ती आपल्या अनुयायाला शिकवायलाही यात्रा काढण्यात आली. सांगा हे सिद्ध होते की नाही.''

पी. रामचंद्र संद्री नावाचे एक गृहस्थ ! आमच्या गावी राहावयास आले होते. माझा व्यवसाय मुद्रणालयाचा. तर ते व्यवसायाने कंत्राटदार. आपल्या व्यवसायात या परप्रांतीयाने एवढे कमावले की, ते साठवायचे कसे हे त्याला समजेनासे झाले.

माझा स्वानुभव नाही. पण ऐकीव माहिती अशी की, कंत्राटदारीच्या व्यवसायात थोडा दिलदार उदार माणूस असला की, कमाईला पारावार उरत नाही. पी.रामचंद्र संद्री अतिउदारता तर जणू अगदी पोसल्यागत बाळगून होता.

त्याला अधून मधून अनेक झटके येत. एकदा असाच एक झटका आला आणि मराठीचे अवाक्षरही लिहिता न येणाऱ्या या माणसाने चक्क मराठी साप्ताहिक सुरू केले. आणि तेलगू भाषिक गृहस्थाच्या मराठी साप्ताहिकाचे मुद्रक अस्मादिक झालो.

गावातील त्यांचा रुबाब, आर्थिक दानतीचे किस्से मी दुरून ऐकून होतो. एक रोखीचा नियमित गिऱ्हाईक मिळाल्याच्या समाधानात मी होतो.

चार□दहा अंक निघाले. आणि माझ्या लक्षात आले. अरे ! पी.रामचंद्र संद्री यांच्या या साप्ताहिकाचे लेखक□मुद्रकच आपण नाही, तर एकमेव वाचकही आपणच आहोत. तुम्ही म्हणाल मीच लिहिलेले मीच परत का वाचत बसेन ? पण मी वाचायचो. म्हणजे मला वाचावे लागायचे. अंक निघाला की,

सायंकाळी पी.रामचंद्र संद्री गाडी पाठवून मला बोलावून घेत. मी पोचलो की, सर्व नोकरांना एकसाथ बोलावून आपल्या मराठीत आज्ञा करत, ''हम अब घरात नही. कोणी आया तो सांग देना साब घरात नहीं.''

आणि मग त्यांच्या स्टडीत आम्ही बसू. त्यांच्या स्टडी टेबलवर तळलेले काजू, फरसाण, वॅट ६९ ची बाटली,ग्लास आणि आइस क्यूब सजवून ठेवलेले असत. इतरत्रही पुस्तकाच्या रॅक व फाइलिंग कॅबिनेट ऐवजी बार कॅबिनेट आणि रेफ्रिरेटरच असायचे.

बीयरची एक एक बाटली व एखाद दुसरा व्हिस्कीचा पेग संपेपर्यंत ते माझा व्यवसाय, माझे लेखन याबद्दल आस्थेने विचारत. दुसरी बीअरची बाटली फोडली किंवा तिसरा पेग भरला की, ते म्हणत, ''हां तो आत्मारामजी, अब पढके बताओ हमारा आजचा पेपर. क्या क्या लिखा है उसमें ?''

मग मी ताजा अंक घेऊन त्यांना वाचून दाखवू लागायचो. त्यावेळी त्यांनी मग सोडून बीअरची बाटली तोंडाला लावलेली असायची. मी वाचत असल्याची संधी साधून ते अर्ध्या झालेल्या बीअरच्या बाटलीत व्हिस्की ओतून घ्यायचे. आणि निर्विकारपणे पीत रहायचे. माझा अंक वाचून संपायचा. मी थांबायचो.

''अरे क्यू थांब गये ? वाचो वाचो. हम ऐकता है.'' ते म्हणायचे.

''संद्री साब ! मै पूरा पेपर पढ चुका.'' मी काळजीभरल्या स्वराने म्हणायचो.

''पढ चुके ?...

...बहुत चांगला लिखा है. अब तुम बीअर घेवो. व्हिस्की घेवो. काजू घेवो. जो लागेल वो घेवो.''

''नहीं बस्स ! मै और नहीं लूंगा.'' मी म्हणायचो.

''अरे ! असा कसा होगा. आत्मारामजी तुमको पैसा मिळायला मंगता ? तो घेवो; अब पाहो, हमारे इंजीनियर, डी.इं., बडे बडे साब लोक रात रात पिते बैठता. हमें सोबत देता. उने हम चांगला लगता. तुम भी करो. मग हम तुमको इन्ट्रोड्यूस करता. फिर तुम कॉन्ट्रॅक्टर झाला समझो. ''

''मगर, संद्री साब मेरा प्रेस ? '' मी चाचरायचो.

''उसका क्या ? ते चलानेको क्या अक्कल लगता ? वो मी चलाता.''

मी बीअरचा मग भरायचो. संद्री सुरू व्हायचे. ''आत्मारामजी ! आज का इश्यू वाचके बताया. चांगला लगा.पण आपण समझा नहीं. जरा फीर वाचके बताओ. हिन्दी में.''

मी पिलेली सगळी उतरायची. या तेलगू माणसाला मराठीतला पेपर मग मी हिन्दीत वाचून दाखवायचो...! रात्रीच्या एक दोन वाजेपर्यंत हे वाचन चालायचं.

मी जायला निघालो, की तेही झोकांड्या देत उठायचे. म्हणायचे, ''आत्मारामजी. रिकामे हातसे मत जावो. रात को जादा हो गई की सकाळी सकाळी पिना मंगता. उतारा ! उतारा !! हां. उतारा !!!''

आणि बीअरच्या दोनचार बाटल्या, व्हॅट ६९ चे अध्धे आणि ताज्या अंकाचे लेखन□मुद्रण□ वाचनाचे बील देऊन ते मला आपल्या गाडीतून बोळवायचे.

अंक निघायचा त्या दिवशी लेखन मुद्रणाचे माझे काम संपले तरी अंक वाचनाचे हे काम पुढील अंक निघेपर्यंत चालायचे.

...... पण, हाय ! माझ्या रोजच्या चंगळीचा हेवा वाटला की, चार दोन वरतोंडीचा मत्सर; अज्ञानकोशाने मला संद्रीचे काम सोडायला भाग पाडले. हां बुचकळू नका. अज्ञानकोशाच्या लेखी दारूच्या बाटल्या म्हणजे 'वरतोंडी'. हा हन्त ! हन्त !!

काम बंद झालं म्हणून मी संद्रीच्या मैत्रीला मुकलो असे नाही. अधूनमधून त्याची गाडी यायची, या न त्या निमित्ताने मला बोलावून न्यायची. बहुतेक वेळा अज्ञानकोश हे नाही तर ते निमित्त काढून मला जाऊ द्यायचे टाळायची.

त्या रात्री पी.रामचंद्र संद्री स्वत:च अस्मादिकाच्या घरी पोचला, आल्या आल्या म्हणाला, ''आत्मारामजी इसलीये आलो, की मेरा एक काम तुम करना मंगता.''

''कैसा काम ?'' अज्ञानकोशाची प्रश्नार्थक नजर चुकवीत मी विचारले.

''मैने ऐका है यहां का पोलिस इन्स्पेक्टर तुम्हारा जवळका रीस्तेदार है ! ''

''ये सच है, वो मेरे दामाद होते है.''□मी.

''बस्स. फिर मेरा एक काम उनके कडून करवा दो.''

''कोई केस निकालना है ?'' मी विचारलं.

''नहीं नहीं.'' तो घाई घाईने म्हणाला, ''केस काडनेकू नहीं, बनानेकू मंगता.''

''किसपे बनानी है केस ?'' मी सावधतेने प्रश्न केला.

''मेरे अपनेपे'' संद्री म्हणाले.

''क्या ?'' अज्ञानकोश किंचाळले.

रिमोट हातात घेऊन टी.व्ही. पाहणारा बाळ्या सावध झाला. त्याने व्हॉल्यूम बंद केला. नजर चित्राकडे आणि कान आमच्या बोलण्याकडे लावले.

''वो क्या है बहेनजी, हम इतका सोशलवर्क करता, पण पेपरवाले छापता नहीं. तो अब हमने वो वो वो क्या ? हां वाट रोको मुव्हमेंट करता है. परसो; तो हमपे केस होना मंगता.''

''वो तो होगीही. आंदोलनवालेपे केस होतीही है.'' मी समज दिली.

''वैसी केस नाही. मै अटक होना मंगता.'' तो दयनीय शब्दात म्हणाला.

''क्या ? आप गिरफ्तार होना चाहते है. क्यूं ?''मी चक्रावलो.

''वो क्या है. लीडर को जेल जाना मंगता.'' तो.

''क्यू ?'' बाळ्याने मानभावीपणे विचारले.

''क्यू की, बाबू जेल गेल्या बिगर पब्लिक कीसीको लीडर नहीं मानता.''

मला त्याची कीव आली की, त्याला कटवावेसे वाटले, मी इन्स्पेक्टरला फोन करून सविस्तर सांगितले. ते नातलग म्हणून भिडस्तपणे म्हणाले, ''मामा एखाद्याला असे अटक करता येणे कायद्यात बसत नाही.''

''पण पार्टी आपणहून तयार असेल तर ?''

''काहीही असेल तरी असं कुणाला अटक करता येत नाही. सॉरी.'' ते दिलगीरपणे म्हणाले.

''एक सांगा, मी या माणसाला काय सांगू ? प्लीज.'' मी हळूच विचारलं.

''सकाळी भेटा. सांगतो. '' फोन ठेवत ते म्हणाले.

''थँक्यू.'' म्हणत मी पण फोन ठेवला.

पी. रामचंद्र संद्री माझ्याकडे याचनापूर्ण नजरेने पाहत होता. मी खोटे हसत म्हणालो, '' वेल, संद्रीसाहब, कल आपका काम हो जायेगा. सुबह इन्स्पेक्टरसाबने बुलाया है.''

''मुझे ?'' त्याने उत्साहाने विचारलं, ''गिरफ्तार होण्या को?''

''नहीं . आपको नहीं, थानेमें मुझे जाना है.'' मी.

''क्या ?'' तो घाबरून किंचाळला, ''क्या ? तुमको भी लीडर होण्या का है ?''

''नहीं भई, हमारी कहां ऐसी किस्मत ? वो तो आपके काम के लिए साबने बुलाया है !''

''अच्छा ! अच्छा !!'' तो आनंदून म्हणाला. ''गाडी ठेवके जाता हूं.''

''नको. नको.'' मी म्हणालो, ''मै स्कूटरसे चला जाऊंगा.''

संद्री गेले. जाता जाता ५०० च्या दोन नोटांचा घसघशीत खाऊ बाळ्याला देऊन गेले.

पी.रामचंद्र संद्री ने रात्री झोप घेतली की नाही ? त्यांनाच माहिती. पण गाव जागे व्हावयाच्या आधी तो गाडी सोडून सायकलने निघाला आणि रस्त्यावर भेटेल त्याला सांगत सुटला, ''किसी को सांगना मत. पोलीस मेरे मागे है. मुझे अटक करनेवाले है.''

आणि सकाळीच इन्स्पेक्टरचा फोन आला. म्हणाले, ''मामा, तुम्हाला यायची गरज नाही.''

''काय ? संद्रीला अटक झाली ? '' मी विचारलं.

''नो. त्याची गरजही नाही. उद्याचे पेपर वाचा.'' त्यांनी फोन ठेवला.

दुसऱ्या दिवसाच्या पेपरची वाट पहायची गरज पडली नाही. माझ्या घरचा व प्रेसचा फोन दिवसभर खणखणत राहिला.आणि लोक विचारत राहिले, ''संद्रीला अटक होणार ? झाली ? तो कोणाचा हस्तक ? दाऊदचा की गवळीचा ?''

रात्री जेवताना थकल्या आवाजात अज्ञानकोशाने विचारलं, ''कां हो, या पी.रामचंद्र संद्रीचं पूर्ण नाव काय? नाही म्हणजे पी फॅार ?''

मी अडखळलोय हे ताडून बाळ्या ताडकन बोलला, ''पी फॅार पिसा.....''

माझ्या लहापणापासून तो प्रौढपणापर्यंत शिंपी, न्हावी, सुतार मी कधी शोधले नाही. वडिलांनी सांगून ठेवलेल्या लोकांकडे जाणे हा शिरस्ता !

एक शिंपी होता. जणू तो आमचा फॅमिली टेलरच होता. मी त्याच्याकडे नुसते कपडेच शिवायचो असे नाही, तर फावल्या वेळात जाऊन बसायचो पण.

गणपत बुरेदार हे त्यांचं नाव. मोडकं तोडकं दुकान. अति पिण्याने सुजलेला डोळ्याखालील भाग. पांढरे होत चाललेले केस. असा तो एक अतिसामान्य शिंपी होता. पण कोट स्पेशालिस्ट म्हणून त्याची ख्याती होती. त्याला ते जमायचेही. दुर्दैव त्याचे की असा कोट शिवून घेणारा गिऱ्हाईक त्या भागात दोन चार वर्षातून एखादाच येत असे.

असाच एकदा सायंकाळी आठेक वाजता गणपतकडे बसलो होतो. तेवढ्यात कोरी करकरीत सिएलो कार येऊन उभी राहिली. गाडी मी ओळखत होतो. गाडीतून राज्याच्या मुख्यमंत्र्याचा प्रत्यक्ष पुतण्याच उतरत होता. मी त्याला व तो मला ओळखत होता. मी स्टूलवरून उठून उभा राहिलो. त्याने हात पुढे केला. मी हस्तांदोलन केले. ''काय ? पत्रिका मिळाली की नाही ? '' तुषारबाबू ने मला विचारले.

''कशी मिळणार मला ?'' मी गंमत केली.

''म्हणजे काय ?'' तुषार ओशाळून गेला.

''अहो, तुषार बाबू तुमच्या पत्रिका मीच छापल्यात. मग मला द्यायची काय गरज ?'' मी.

''ते काही असो, लग्नाला यायचं हं.'' त्याने विनंती केली.

''ते काय सांगायला हवं ?'' मी लाचारपणे होकार दिला.

वयात फरक असला तरी तो मुख्यमंत्र्याचा पुतण्या होता आणि 'समर्था घरीचे श्वान...' अशी जगाची रीत होती. तुषार बाबूंनी न वळताच आवाज दिला. ''मोतीराम...''

''जी !'' म्हणत मोतीराम पुढे झाला. मोतीराम हा त्या घराण्याच्या कुत्र्यापासून मुलापर्यंतच्यांचं सर्व काही काढी. मोतीराम त्या कुटुंबातल्या सगळ्या सदस्यांचा Personal Secretory, Peon पासून सर्व काही होता. तो समोर येताच तुषार बाबू म्हणाले, ''हे आत्मारामजी येताहेत लग्नाला. त्यांनी कोणत्या गाडीत बसायचं ते ठरलं की स्वत: जाऊन त्यांना Inform करशील. ''

''जी'' मोतीराम ने मान नव्हे जणू शेपटी हलवली.

आणि तुषार बाबू ऐटबाज पावलं टाकीत त्या मोडक्या दुकानात शिरले.

गणपत बुरेदार नम्रपणे उभा होता. त्याच्या डोळ्यात आश्चर्य आणि कृतज्ञता मावत नव्हती. ती जोखत तुषारबाबू म्हणाले,

''टेलर ! काकांचं म्हणणं आहे की, अख्ख्या विदर्भात तुमच्यासारखा सूट शिवणारा दुसरा कोणी नाही. म्हणून त्यांनी मुंबईला कापड घेऊन इथे पाठवलंय.''

''साहेबांची दया आहे साहेब ही माझ्या गरीबावर.'' गणपत कृतज्ञतेने म्हणाला.

''मग शिवता ? बघा कापड फार उंची आहे.''तुषारने विचारणा करतांनाच दडपण आणण्याचा खानदानी डाव टाकला.

''त्याची काळजी करू नका बाबूसाहेब. इथे सोनं आलं की, मी त्याचा हिरा करून पाठवत असतो.'' गणपत अभिमानाने म्हणाला.

''ते काकांनी पण सांगितलंय. आता प्रश्न वेळेचा. पंचवीस दिवस आहेत. इतर काम सांभाळून होईल माझा सूट ?'' तुषारबाबू जणू सूट त्याला न देण्यासाठी निमित्त शोधत होते.

''दुसरी कामं ?'' गणपत जणू तिरस्काराने बोलला, ''दुसरी कामं गेली वाऱ्यावर उडत बाबूसाहेब. गावातल्या इतर कारागिरांकडून घेईन ते करून. आज आणि आतापासून मी फक्त तुमच्या आणि तुमच्या सूटवरच काम करीन.''

''Well तुमचं बिल किती ? '' त्याने विचारले.

''साधारण साडेतीन हजार घेतो साहेब लोकांकडून. पण त्यावेळी इतरही काम करत दीडेक महिन्यात देत असतो. आता तुमची तातडी आणि कामाची पोत वेगळी. काय ते द्या'' गणपतने

कावेबाज बोलणे केले.

''ठीक आहे'' तुषारबाबू दानत दाखवत म्हणाले, ''सात हजार दिले. पण काम Exact Proper time मध्ये व्हायला हवे.'' तुषारने तंबी दिली.

''बाबू साहेब'' गणपत स्वाभिमानपूर्ण नमृता दाखवीत म्हणाला, ''मोठ्या साहेबांनी मुंबईहून कापड पाठवलंय आणि ते मी वेळेवर देणार नाही म्हणजे ? त्यांच्या मिठाला मी बेइमान होईन होय ?''

''नाही. नाही. मला तसं म्हणायचं नाही.'' तुषार सावधपणे बोलला, ''नुसतं सुचवलं. बरं तुम्हाला काही ॲडव्हान्स वगैरे लागेल ? किती ?''

''माझा हा बकाल कंगाल धंदा. एवढा सूट शिवायला लागणाऱ्या वेळेत दुसरं उत्पन्न नसणार. घर चालवायचं आणि सूटसाठी लागणारं material आणायचं म्हणजे पाचेक हजार तरी हाती असावे लागतील.''

''No'' तुषारबाबू बोलले. ''या सूटसाठी इथलं material नाही वापरायचं. ते काकांनी मुंबईवरून पाठवलंय. अजून काही लागत असेल तर सांगा. बोलावून देईन, पण इथलं नको. छे !''

गणपतने तुषारबाबूचे माप पुन्हा पुन्हा घेतले. ते पुन्हा पुन्हा लिहिले. मुंबईला कपडे शिवणारे तुषारबाबू ते पाहून प्रसन्न झाले. जाता जाता त्यांनी पाच हजाराची रक्कम गणपतच्या एक पाय लंगडा असलेल्या कापड कापावयाच्या टेबलावर ठेवली.आणि मला नमस्कार करून तुषारबाबू निघून गेले.

मी पाहत होतो. आपल्या लंगड्या टेबलावर पडलेल्या नोटाकडे गणपत अनिमिष नजरेने पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर विचित्र धूर्ततेच्या लहरीवर लहरी उठत होत्या.

तुषारबाबू गणपतकडे आलेले पाहून गणपतबद्दल दुकान आळीत अचानक आदर वाढला. मुख्यमंत्र्याकडील लग्नकार्याचे शिवणकाम गणपतकडे आल्या आल्या तो गणपतराव झाला. गणपतकडून आपल्यालाही आपापल्या व्यवसायानुसार काम मिळावे म्हणून सोनार, बनिये, वाहतूक दलाल सगळे त्याच्या 'च्या प्यायची येवस्था' करू लागले. गणपतचे दुकान सताड उघडे राहायचे. मात्र त्यात तो नसायचा. नेहमी शिवून झालेले कपडे टांगावयाच्या खुंट्या ओक्या ओक्या वाटायच्या. फावल्या वेळात गेलोच तर मी बसून यायचो.

त्या दिवशी जाऊन बसलो न बसलो गणपत आला. तर्रर नसला तरी त्याने जराशी लगावली होती.

पण वास जरा वेगळाच होता. मी विचारलं, ''टेलर, आज ब्रॅन्ड बदलला ?''

''अरे, आतू बाबा ! सगळंच बदलत चाललंय. त्याला खूप दिवस झाले. मी आज बदललो. स्वातंत्र्य संग्राम सैनिक 'देशी देशी' करत मेले. आणि त्या जागी आलेल्यांनी विदेशी आणली. त्यात 'और मजा है' आत्तू बाबा...'' गणपत बोलला.

गणपत दिवसभर कुठेतरी बाहेर रहायचा. कधीतरी आपल्या उघड्या दुकानात यायचा. हा तुषारबाबूचा सूट शिवणार की नाही ? याची काळजी उभय पक्षांपेक्षा मलाच जणू लागून राहिली.

सहा-सात दिवसांनंतर असेच बसून होतो. वेळ तीच. तुषारबाबू पहिल्यावेळी आल्याची. दूर गाडीचा कर्णा वाजला. गणपतने तो ओळखला. चष्मा डोळ्यावर चढवत तो घाईघाईत तुषारबाबूची वाट पाहू लागला. गाडी येऊन थांबली, तुषारबाबू उतरले. त्यांनी प्रश्न केला, ''काय टेलर, कुठवर आलं काम ?''

''बस्स कटींग झालं आहे बाबूसाहेब. ओव्हरलॉकला दिलंय पहा. हे तुमचीच मापं पाहतोय; काही चुकू नये म्हणून.'' गणपतने मापं लिहिलेली वही पुढं केली. तुषारबाबूने समाधानाने मान हलवली. न वळता त्यांनी आवाज दिला, ''मोतीराम...''

''जी'' -मोतीराम तयार.

''उकाडा आहे. तीन-चार कोल्डि-क्स आण.''

''गाडीत आहे. ते देऊ तुषूबाबू-भाऊ ?''

''दे.''

मोतीरामनं दिलेलं थंड पेय आम्ही घेतलं. तुषारबाबू एक दोन घोट घेऊन बाटल्या ठेवून निघून गेले. त्यांचं लग्न होतं. त्यामुळे ते घाईत होते.

पुन्हा चार सहा दिवसांनी तुषारबाबू प्रकटले. नेमका त्यावेळी गणपत दुकानातच होता.

''काय टेलर ! कुठवर आलं ?'' त्यांनी विचारले.

''बस्स बाबूसाहेब ! झालंच समजा. काज बटण आणि तुरपाई तेवढी राहिलीय. फिटींगला अस्सं झक्कास जमलंय म्हणता व्वा.''

गणपत आपल्याशीच बोलल्यागत बोलू लागला, ''व्वा! व्वा !! काय कापड आहे, काय पोत आहे. आयुष्यात असं कापड पाहिलं नाही. खरं सांगू बाबूसाहेब ? इतकं चांगलं कापड कापताना असं जिवावर आलं होतं म्हणून सांगू ? पण तुमचा म्हणून कापला ......''

खूष झालेल्या तुषारबाबूनं मागे वळून नुस्तं पाहिलं. मोतीरामने गारेगार पेयाच्या तीन बाटल्या

आणून उघडून आमच्या हाती दिल्या. एक दोन घोट घेऊन तुषारबाबू मागे वळत बोलले, ‘‘मग कधी येऊट्रायलला?’’

‘‘ट्रायल ?’’ गणपत तुच्छतेने बोलला, ‘‘बाबूसाहेब, गणपतनं शिवलेल्या सुटाची ट्रायल द्यायची नसते. तो सरळ घालायचा असतो.’’

या सूटमध्ये ऐन लग्नात आपण कसे दिसू ? याचे स्वप्न पाहत तुषारबाबू निघून गेले.

नंतरचे दिवस लगीनघाईचेच म्हणा, तुषारबाबू व्यस्त असणार. आता सकाळ-संध्याकाळ मोतीराम येऊ लागला. गणपत टेलरची उत्तरं मला पाठ झालेली. ‘‘काज बटणाच्या फिनिशिंगला पाठवले.’’

‘‘तुरपाईच्या फिनिशिंगला पाठवले.’’

आणि शेवटी ‘‘इस्त्रीला पाठवले.’’

कपडे शिवून काय कापूनही झाले नव्हते. हे मला माहीत. गणपत उरलेल्या चार दिवसांत काय करणार ? मला कळेना.

आमच्याकडे हळद लागल्यावर नवरदेवाला बाहेर फिरकता येत नाही .तुषारबाबूला हळद लागल्याचे कळले. लग्नाच्या ३ दिवस आधी मोतीराम आला. ‘‘टेलर’’ तो म्हणाला, ‘‘तुषुबाबू भाऊंना हळद लागली. आता तरी सूट द्या.’’

‘‘सूट देऊ ?’’ गणपतने थंड आवाजात म्हटले, ‘‘कसा देऊ ? तुषारबाबूचं मापच सापडत नाहीये......’’

मोतीरामच नव्हे मी पण उडालो.

तुषारबाबूचे लग्न सासऱ्यांनी शिवलेला सूट घालून पार पडले. लगीन वरात परतायच्या दिवशी दुपारी गणपत दुकानातून बाहेर पडला तो धाय मोकलून रडत. ‘‘काय झाले ?’’ दुकानआळीतील लोक विचारू लागले. हातातील घडी केलेला तारेचा कागद दाखवत तो फक्त ‘‘ आई... आई... ’’ म्हणायचा व अधिक जोरजोराने रडू लागायचा. शेजाऱ्यांनी त्याचे दुकान आवरले, बंद केले आणि त्याला घरी पोचवले. मी सोबतच होतो. घरीदेखील जणू एक तार पोचली असावी ! सगळे लोक तयार होते. गणपत आपल्या कुटुंबाला घेऊन आईच्या मयतीला गावी निघून गेला.

गणपत परतला तेव्हा त्याच्या डोक्यावर गुळगुळीत गांधीकट होता. तुषारबाबू मधुचंद्राला दूर उत्तरेत गेलेले होते. गणपतने त्यांच्या वडिलांना गाठले. विमनस्क चेहऱ्याने माफी मागितली. आणि आईच्या मृत्यूमुळे झालेले दु:ख व खर्च आणि कर्ज याचा आकडा सांगितला. त्यांना दया आली, की लगीनघरी रडगाणे नकोसे वाटले ? मला माहीत नाही. पण गणपतला शिलाईचे उरलेले दोन हजार रुपये

मिळाले. लगेच गणपतने एवढे दिवस घर रिकामे पाहून कोटाचे कापड उंदरांनी चाळणी केल्याची घोषणा केली व काढता पाय घेतला.

पंधरा दिवसांनी गणपतच्या मुलीचे लग्न झाले. तेव्हा आमच्या गावचा मी एकटाच हजर होतो. शिलाईचे सात आणि कापडाचे तेरा असे वीस हजार एकत्र करून आपण हे लग्न पार पाडल्याचे त्याने मला एकट्यालाच सांगितले.

लिहिले म्हणून काय झाले ? ते अजूनही मी कोणाला सांगितलेले नाही !

कांतीलाल आणि गोवर्धन आले तेव्हा मी गाजीभाईकडे बसून होतो. गणपतच्या दुकानाप्रमाणेच माझा हाही एक ठिय्या. गाजीभाई विश्वकर्माचे सॉ-मिल. ''जीजाजी...'' न.पा.चा माजी सदस्य राहिलेला तरूण कांतीलाल लाचारपणे म्हणाला, ''एक सात रुपये द्या. आम्ही दोघं पन्नास-पन्नास मारतो. सकाळ पासून 'घेतलेली' नाही.''

''भिकारचोटांनो'' गाजीभाई गरजले, ''इथं काय बापजाद्याचा खजिना ठेवला आहे ? चालले सकाळीसकाळीच प्यायला पैसे मागायला.''

पुन्हापुन्हा गयावया करूनही गाजीभाईने कांतीलालला एक 'खडकू' द्यायलाही नकार दिला. माझ्याकडे खजिलपणे पाहत निराश पावलं टाकीत ते दोघे निघून गेले.

गणपतप्रमाणेच मी गाजीभाईकडे बसायचो. आठ दिवसांनी गोवर्धन तिवारी सायकलने आला. आणि एक टांग टेकत त्याने विचारले, '' जीजाजी ! कांतीलाल आया था क्या ?''

''सालो .... !'' गाजीभाई तुच्छतेने म्हणाला, ''यहाँ क्या रंडी का कोठा है जो चाहे आ जाये ?''

''अरे जीजाजी '' तिवारी मस्करीनं बोलला, '' अभी तो उसका अकाल गिरा नही, नही तो देखना; तुमकोही बिठा देंगे एखादे कोठेपे.''

''साले .... ! रुक तुझे बताता हूँ अभी .'' गाजीभाई चवताळले.

'' छोडो जीजाजी ! वो कांती आया तो बता देना की मैं उसे ढूँढ रहा हूँ.''

तिवारी निघून गेला. आणि थोड्याच वेळात कांतीलाल प्रकटला. त्यानेही घाईघाईतच विचारले ... ''जीजाजी ! वो गोवर्धन आया था ?''

गाजीभाई तिवारीपेक्षा या कांतीला दबायचे. म्हणाले, '' आया था साला भैन×× इधर को गया.

तुझे ढूँढ रहा है.''

''गधा है, जीजा !'' कांती खट्याळपणे बोलला, ''वो तिवारी गधा, किसको कब कहाँ ढूँढना ये भी नही समझता. आया तो बता देना मैं खान की सॉ□मिलपे हूँ.''

कांती गेल्या गेल्या तिवारी आला. आता तो पायी होता. त्याला पाहून गाजीभाई म्हणाले, ''वो तेरी भैन×× का कांती खान के सॉ□मिल पे गया है.''

''अरे साला जीजाजी !'' तिवारी चुकल्यागत बोलला, ''मुझे पहलेही समझ लेना चाहिये था , पण लगा वो रोज इधर आता है, तो आज भी आयेला होगा.''

''क्यूं ?'' चिडत गाजीभाईने विचारले.

''नही... वो... क्या है कि वो... लकडा.... हा लकडा बेचना है ना कांती को इसीलिए ...'' तिवारीने बोलणे अर्धवट टाकले आणि सटकण्याला पाहू लागला.

गाजीभाईने त्याचा हात धरत प्रेमाने विचारले, ''लकडा ? कौनसा ? कैसा ? किसका लकडा ?''

''अरे जीजाजी ! छोडो भी. वो कांतीलाल आपको नही देगा. '' तिवारी बोलला.

''अरे मगर क्यूं नही देगा ? है क्या वो लकडा ये तो बता ? '' गाजीभाई लाळ टपकवू लागला.

''जीजाजी ! वो सेलू रोड है ना. उसमे पटेल साहबके खेत में एक बबूल का पेड था. कोई पाँच घनमीटर का माल निकलेगा. वो कांतीलाल बेच रहा है ... बस्स इतनीसी बात है..''

गाजीभाईच्या तोंडाला पाणी सुटले. पाच घनमीटर माल निघणारं बाभळीचं झाड कसं डेरेदार असेल ?

तो स्वप्न पाहू लागला. कांतीलालने ते लाकूड स्वत: खाँ च्या सॉ□मिलवर विकावं हे त्याला पटेना. तो तिवारीला गोंजारत म्हणाला, ''देख भाई ! तुम उठते बैठते मेरे पास. कभी कभी दारू□पानी मंगते हो वो मेरे पास. और लकडा बेचते हो खान के पास. तुम्हे शरम नहीं आती ?''

''आती है जीजाजी'' तिवारी थबकत बोलला, ''मगर वो कांती कह रहा था कि जीजाजी से सौदा नहीं कर सकते. ज्यादा झीक□झीक नहीं कर सकते. आप हमारे अपने जो ठहरे ! इसलिए वो खान के पास गया.''

''अरे सालो, '' गाजीभाई साखरबोली बोलू लागला, ''तुमको मैं गालीया देता हूँ वो तुम मेरे अपने हो करके ! तू ऐसा कर, कांती को ले आ. हम आपस में तुम जैसा कहोगे वैसा मामला तय करेंगे.''

''ओ जीजाजी. मेरे पास सायकल नही. सुबहसे पेट में कुछ नही. वो खान का सॉ□मिल साला इतना दूर, कैसे जाऊ?'' □तिवारीची तक्रार.

''देख तिवारी. वो लकडी अपने यहाँ आयेगी. समझा ? तू कांती को ले आ. पटाके ले आ फिर तेरे गंगाजल की ....'' गाजीभाई.

''ना ना जीजाजी, फिर की फिर. पैसा मिलने पे तो कांती भी पिलायेगा. पण अभी कुछ करो; नहीं तो मैं चला घर...'' तिवारीने तंबी दिली.

''हा.हा.. तिवारी तू इस मे से पाच की मारके आ. तब तक मै कोई सायकल देखता हूँ तेरे लिए ....'' गाजीभाईने तिवारीच्या हाती दहाची नोट ठेवत म्हटले.

तिवारी तरातरा निघून गेला. येताना त्याच्या चेहऱ्यावर समाधानाबरोबरच नुकतीच घेतल्याची झिंग दिसत होती. आल्या आल्या तो म्हणाला, ''जीजाजी, साला ! वो, वो उसके पास छूट्टा नही था; दस की मार दी, माफ करना.''

'' कर दी ना औकातवाली बात.'' सवयीने बोलून गेलेला गाजीभाई चरकला. मग सावरत बोलला, '' अबे ! सुबह सुबह इतनी नहीं लेना. कुछ खा पीके लिया कर. अच्छा ये बता. वो लकडा कांती का कैसे हुआ ?''

''जीजाजी !'' तिवारी तोल जाता जाता सावरत म्हणाला, '' वो लकडा नहीं, सोना है सोना. कांतीने पटेल के बच्चोको जुते चप्पल बना दिये थे. पटेलने पैसे के बदले वो पेड दे दिया. जीजाजी, वो काटनेकोच कांतीने एक सौ नब्बे रूपये लगाये नकदी में.''

तिवारीने टाकलेल्या मृगजळाच्या जाळ्यात गाजीभाई अडकू लागला. त्याने विचारले, ''तुझे मालूम है वो लकडा कांती कितने में बेच रहा है ?''

''ना...'' तिवारी बोलला, ''कांती कितने में बेच रहा ये मुझे मालूम नहीं. मगर खान कितने में ले रहा है ये मुझे मालूम है.''

''कितने मे ?'' गाजीभाईने उत्सुकतेने विचारले.

''वो बोल रहा था...'' तिवारी म्हणाला. ''लकडे के आठसौ पचास. कटाई के एक सौ नब्बे और मेरे पचहत्तर....''

''तेरे ?'' तोंडाला सुटलेले पाणी गिळत गाजीभाई गरजले, ''तेरे कैसे ?''

''जीजाजी, स्साला...'' तिवारी बरगळल्यागत बोलला,'' वो कटाईवालेके साथ तीन दिन मै था. उसकी मजदूरी कौन देगा ? मैने कांती को कह दिया है तू तेरा लकडा चाहे फोकट मे दे दे. मै मेरी मजदूरी पुरे देड सौ लुंगा.''

''हां. बराबर '' गाजीभाईने पुस्ती जोडली, '' तुझे देड सौ मिलना चाहीये, मिलेंगे भी. अब तू ऐसा

कर, कांति को ले आ.

‘‘ किसलिए ?’’ तिवारीने वेड्यागत विचारले.

‘‘अरे तुम अपुनका आदमी हो. लकडा मुझे मिलेगा तो दो पैसा जादा दुंगा. और कभी कभार तो यार… इतनी बार तुमको फुकटमें पिनेको देता रहा हूँ. ’’ गाजीभाई उपकाराची उजळणी करू लागला. त्याच्या लेखी पाच घनमिटर बाभूळ हजार अकराशेचे, म्हणजे कवडीमोल मिळणारं सोनं होतं. तो ते मिळवायला एवढा उतावीळ झाला होता की, त्याने तिवारीला सायकल न देता रिक्षा करून पाठविले. वरती रिक्षेवाल्याला तंबी दिली , ‘‘इसको छोडके खाली हात लौटा तो एक ठेला नहीं मिलेगा. और तिवारी, कांति को ले के जल्दी आ; और पचास पिलाता हूँ. नाश्ते के साथ !’’

तिवारीने मानेने होकार द्यावयाच्या आत रिक्षेवाल्याने पायडल मारले. या दोघांच्या व्यवहारात त्याची मजुरी बुडायची भीती त्याला असावी.

थोड्याच वेळात कांति व तिवारी आले. गाजीभाईंनी त्यांना सख्ख्या साळ्यापेक्षा अधिक प्रेमाने बसविले. कांतिचे हात किंचित थरथरत होते. ते गांजीभाईने चाणाक्षपणे ओळखले. तो प्रेमाने म्हणाला, ‘‘ क्यू कांती, ठीक तो हो ?’’

‘‘कैसा ठीक रहेगा ?’’ तिवारी मध्यातच बोलला, ‘‘ सुबह से एक घोट चाय भी नहीं पिया.’’ त्याने मूठ वळून अंगठा तोंडाशी नेला.

‘‘तो पहले क्यू नहीं बोला ?’’ गाजीभाईने त्यास दटावणीतून आपुलकी दाखविली. आणि शर्टमधील बनियनीच्या खिशातून नेमकी वीस रुपयाची नोट काढून तिवारीला देत इशारा केला. क्रिकेटवीराने झेल घ्यावा त्या चपळाईने तिवारीने ती नोट झेलली.

नंतर कांतीलालने तेथेच तिवारीने आणलेल्या बाटलीचा ‘मान’ राखला. आणि सौद्याला सुरुवात झाली. हो□ाही म्हणता सौदा साडेनऊशे रुपयांत ठरला. तिवारी आशाळभूतपणे गाजीभाईकडे पहात होता. गाजीभाईने त्याला मानेनेच हिरवी झेंडी दिली. व त्याला पंच्याहत्तर रुपये देण्याचे कबूल केले. लगेच गाजीभाईने ट□क्टर आणवला, आणि तो सेलू रोड कडे निघून गेला. बाभळीचे ते भले मोठे धूड त्याने आणून मशीनवर टाकले. सायंकाळी गाजीभाईने ईमानदारीने कांती व तिवारीला पैसे देऊन टाकले. व्यवहार पूर्ण झाला.

व्यवहार कसला पूर्ण होतो ? तीन चार दिवसांनी तिवारी आला आणि म्हणाला, ‘‘ जीजाजी वो लकडा तुमने काट डाला ?’’

‘‘अभी नही, कल परसो देखूंगा’’ □गाजीभाई .

‘‘ना. अब मत काटना’’ □तिवारी.

‘‘क्यू ? ’’ गाजीभाईने दरडावून विचारले.

‘‘नही; जीजाजी, मै कल सेलू गया था.’’ □तिवारी.

‘‘तो ?’’ □गाजीभाईने डोळे वटारले.

‘‘पटेल मिला था सेलू का.’’ □तिवारी.

‘‘तो ?’’ □गाजीभाईचे दरडाविणे.

‘‘वो .. वो कहता है मेरा लकडा चोरी गया. ’’

‘‘.....’’ गाजीभाई अवाक् .

‘‘सब गडबड हो गई. तुमने अबतक काट डालना था.’’

‘‘पर ..पर’’ चोरी शब्द ऐकूनच वाघाची शेळी झालेला गाजीभाई कसाबसा केविलवाणा बोलला, ‘‘ तू तो कहता था लकडा पटेलके लडकेने कांती को दिया था ?’’

‘‘मैने पटेल को बोला था’’ □तिवारी.

‘‘क्या बोला था ?’’ □गाजीभाई.

‘‘बोला था, लडकेको पूछ के देखो. उसने किसी को दे दिया होगा.’’ □तिवारी.

‘‘तो क्या बोला पटेल ?’’ □गाजीभाई.

‘‘बोला लडके को क्यो पूछू ? लकडा उसके बाप का थोडाच है. मेरा है.’’ □तिवारी .

‘‘फिर ?’’ □गाजीभाई.

‘‘फिर क्या मै वहाँ से भाग निकला...’’ □तिवारी .

‘‘अब ?’’ □गाजीभाईचा भेदरलेल्या स्वरातला प्रश्न.

‘‘अब यहाँ से भागता हूँ’’ लंगडा तिवारी बोलून चालता होऊ लागला. गाजीभाईने त्याचे ते दीड पाय धरले ! गंभीर विचारविनिमयानंतर ते लाकूड जेथून आणले होते, तेथे परत नेऊन टाकण्याचे ठरले. कांतिचा पत्ता नव्हता. आणि लंगडा तिवारी मिळालेले पंच्याहत्तर रुपये पुरवणार किती ? शेवटी गाजीभाईने पैसे दिले. तिवारीने ट□क्टर आणला. चोरीचे बाभळीचे लाकूड परत नेऊन टाकायला गाजीभाईवरील प्रेमापोटी तिवारी ट□क्टरवर बसला.

त्याच रात्री त्या बाभळीच्या लाकडाचे एवढे तुकडे झाले की खानसाहेबाच्या सॉ□मिलवरील कामगाराला मोजता आले असतीलच असे नाही...

एकदा आम्ही सागवानाचे म्हणून गाजीभाईकडून आणलेले कपाट नंतर चक्क आंब्याचे निघाले

होते. कांतिचा किस्सा कळल्यावर अज्ञानकोश म्हणालं, ''दुष्टांना शिक्षा देणारे कांति व लंगडा तिवारी सारखे लोक आहेत म्हणूनच तर आपण सगळे हयात आहोत !''

''बापूश्री !'' घरी गेल्यागेल्या बाळ्या किंचाळला की धस्स होतं. हा कुठकुठले दिवे पाजळणार ? त्याचा नेम कोणी सांगावा ? मी त्याच्याकडे कसेबसे पाहतो न पाहतो तो तो म्हणाला, ''दोन प्रश्न आहेत.''

''कसले ?'' मी दरडावून विचारण्याचा प्रयत्न केला. समोर अज्ञानकोश होतं.

''उत्तर द्याल ?'' —बाळ्या.

''आधी प्रश्न तर विचार.'' —मी.

'' पहिला प्रश्न; जगात माणूस शहाणा की जनावर ?'' —बाळ्या.

''माणूस; कारण त्याला बुद्धी असते.''

''बुद्धी असेल बापू, पण ....'' बाळ्यानं गुगली घेतली, ''अकलेचं काय ?''

त्रिफळाचीत झाल्यासारखा मी बाळ्याकडे पाहत होतो. पण उत्तर देणं भाग होतं. म्हणालो,

''मग तुला काय वाटतं ? माणसापेक्षा प्राणी शहाणे असतात ?''

''हो .'' तो ठामपणे म्हणाला.

''का रे ? असा अचानक तुला आजोळचा पुळका कसा काय आला ? '' मी प्रश्नोत्तरं संपवण्यासाठी म्हणून विचारलं.

''माझं माहेर यात आणायचं नाही.'' अज्ञानकोश आवेशानं म्हणालं.

''बापूश्री, प्राणी माणसापेक्षा कमी बुद्धीचे ना ?'' आईकडे दुर्लक्ष करत बाळ्यानं प्रश्न केला.

''नक्कीच रे '' —मी.

'' पण बापू, वाघ—सिंहासारखे मांसाहारी प्राणी कच्चे मांस खातात. बुद्धीहीन असूनही त्यांना कधी अजीर्ण झाल्याचं कोणी पाहिलेलं, लिहिलेलं नाही. आणि माणूस, जाऊ द्या बापू, काय खाईल अन् कधी ओकेल कोण सांगणार ?''

''बाळ्या ! '' मी दरडावलं, ''अभ्यासाच्या सोडून भलत्या प्रश्नात डोकं खपवू नकोस.''

'' ठीक बापूश्री '' बाळ्यानं नरमाई घेतली. की नाटक केलं, कोणास ठाऊक ! विचारलं, '' आता अभ्यासातला एक प्रश्न. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात कोण हरला ?''

''गाढवा. नुस्त्या नको त्या गोष्टीत हुशारी दाखवत फिरतोस. अन् या प्रश्नाचं जगप्रसिद्ध साधं उत्तर तुला माहिती नाही ?'' मी डाफरलो.

''तुम्हाला माहीत आहे बापूश्री या प्रश्नाचं खरं उत्तर ? माहीत असेल तर सांगा ! '' —बाळ्या.

''गाढवा, पानिपतच्या युद्धात मराठे हरले.'' —मी.

''ते तर मला पण माहीत आहे बापूश्री. पण ते चूक नाही ?'' बाळ्याने विचारले.

'' ते कसे ?'' मी चक्रावलो.

''असं आहे बापूश्री ! जेव्हा अटकेपार झेंडे गेले तेव्हा ते पेशव्यांनी नेले ! अन् पानिपतात हरले तेव्हा मराठे हरले !!! म्हणजे जिंकले तर पेशवे ? आणि हरले तर मराठे. हो ना?''

मी निरुत्तर तर झालोच होतो. पण मला वाटत होते आपल्या डोक्यात एखादी उल्का कोसळलीय अन् तिथे नक्कीच लोणार सरोवरापेक्षा मोठा खळगा पडलाय. नुसता खळगा. कोरडा ठाम. न राहवून तो खळगा भरायला मी किचनकडे धावलो. फ्रिज उघडला आणि आपली जराशी घेत बसलो ....

आटपाट नगरात एक अनाथ माणूस राहत होता. त्याला पोटापुरते शेत होते. एक बैलजोडी होती. पण जवळचा नातलग नव्हता. तो आपले मीठपीठ शेजारच्या म्हातारीला द्यायचा . ती भाजी—भाकरी करून द्यायची. तीच तो खायचा.

रोज रोज नुसती भाजी भाकरी खायचा त्याला कंटाळा आला. एक दिवस तो म्हातारीला म्हणाला, ''आजी आजी, नुसती भाजी भाकरी खाऊन खाऊन कंटाळलोय. आता दूध, दही, तूप खावंसं वाटतंय. म्हणून म्हैस घेतो म्हणतोय. तू करशील सगळं ? म्हणजे विरजण घालणं ? दही घुसळणं ....?''

म्हातारी म्हणाली, ''बघ हं बाळ, मी झाले म्हातारी. मला तुझंच होत नाही, तर दही कसं घुसळणार ? त्यापेक्षा तू आता लग्न करून घे. तुझी बायको येईल. तुझं सगळं करील.''

त्याने म्हातारीचे ऐकले. त्याचे लग्न झाले. त्याने एक गाभण म्हैस घेतली. काही दिवसांनी ती जनली. त्याला आनंद झाला.

तो रोज सकाळ सायंकाळ म्हैस दोहायचा. तिचे दूध काढायचा. अन् शेतात निघून जायचा.

त्याची बायको होती खादाड. ती दह्याला घुसळायची. आलेल्या लोण्याचे तीन गोळे करायची. मग

भिंतीला पाय लावून विचारायची,

''भिंत सांग घराची रीत ?

खनकाऊ की दनकाऊ?''

मग आपली आपणच म्हणायची , ''दणकाव ना ! काय पाहतेस मागंपुढं ? ''

आणि सगळे लोणी मटकावून टाकायची. बिचारा तो सायंकाळी थकूनभागून यायचा. जेवायला बसायचा. ताटात ताक भाकरी पाहून कळवळून विचारायचा,

''काय आज पण ताक भाकरीच ?''

'' मग ?'' ती त्याला उलट विचारायची, ''जळ्ळी मेली ती म्हैस ! विरजण घातलं तरी लोणीच काय नुसतं दही पण होत नाही.''

रोज असे चालू होते. तो ताक भाकरी खाऊन खंगून गेला. एके दिवशी म्हातारीने त्याला कारण विचारले. तो म्हणाला, '' काय करू, म्हैसच अशी निघाली.''

म्हातारीला वाटले, यात काही वेगळे आहे. पाणी नव्हे दही, लोणी कुठंतरी मुरतंय. तिने पाळत ठेवली. शोध घेतला. आणि जे पाहिले ते सगळे त्याला सांगून टाकले.

दुसऱ्या दिवशी तो शेतात निघाला. जाताना त्याने बायकोला भाकरी घेऊन लवकर यायला सांगितले. पण तो मात्र गेला नाही. लपून बसला. त्याने सगळे पाहिले. म्हातारी खरं बोलली होती. तो गुपचूप घाईघाईने शेतात पोहचला.

त्याची बायको आली. सावलीसाठी केलेल्या माळ्याखाली थांबली. औत थांबवून तो आला. त्याने बळेबळे तिला कुंकू लावले. तिने विचारले, '' हे काय आज नवीनच ?''

''आज तुझी पूजा करायचीय.'' तो म्हणाला. ''नवीन पद्धतीची पूजा. माझ्या गुरूने सांगितलीय.''

खुळचट बावळट वाटणाऱ्या तिच्या नवऱ्याने पूजा बांधायच्या नावाने तिचे हातपाय बांधले. तिला माळ्याला लटकावले. चिंचेच्या फोका घेऊन आला. आणि त्याने माळ्याला विचारले,

'' माळा सांग घरचा चाळा

खनकाऊ की दनकाऊ?''

पुन्हा तो स्वत:शीच म्हणाला, ''खनकाव नं ! काय पाहतोस मागंपुढं !''

आणि तो बायकोला फोकाने सपासप झोडपायला लागला.

मी गोष्ट थांबवली. तरी बाळ्याने विचारले, '' पुढे काय झालं ?''

''पुढे काय होणार रे. तिनं त्याची क्षमा मागितली. पुन्हा भिंतीशी बोलली नाही. दोघं गुण्यागोविंदानं

राहू लागले.'' मी उत्तर दिले.

''बापूश्री !'' बाळ्याने विचारले, ''तुम्हाला शेत असते तर ! तुम्हीपण शेतात माळा उभारला असता ?''

मी काय बोलणार ? सांगा ?

कायकाय पहायला ऐकायला मिळालं म्हणून सांगायचं ? तिची एक मैत्रीण आहे. अर्थशास्त्राची प्राध्यापिका. नवरा कृषि पदवीधर पण नोकरी नाही. बाईने त्याला म्हशी घेऊन दिल्या. स्कूटर घेऊन दिली. बिचारा स्कूटरवरून दूध टाकायचा. म्हशीचा चाराही आणायचा. बाई अर्थशास्त्राच्या, त्यामुळे अर्थार्जन, बचत हे दोघांनाही वळणी पडलेलं.

परवा तो गडी दिसला. खरं तर त्याला पाहिल्याबरोबर मला हसू फुटलं. पण मी स्वत:ला आवरलं. नमस्कार करून काढता पाय घेतला. तोही ओशाळला होता. न ओशाळेल तर काय ? बिचारा या जेट युगात घोड्यावरून म्हशीचा चारा आणत होता.

मी घरी गेल्यागेल्या हिला विचारलं, ''...अहो तुमच्या त्या मैत्रिणीकडे तर स्कूटर होती ना ?''

''हो होती. ती विकली त्यांनी.''

''का ? जुनी झाली होती ?''

''नाही हो. ती माझी मैत्रीण किती हुशार. व्यवहार कळतो तिला.''

''कळणारच. ती अर्थशास्त्राची प्राध्यापिका ना.'' मी म्हटले.

''तेवढंच नाही काही. नवराही अर्ध्या शब्दात राहतो तिच्या.''

''अगं पण नवऱ्याचा आणि घोड्याचा संबंध काय ?''

''कांही नाही हो. माझ्या त्या मैत्रिणीला एक चांगली कोरी करकरीत नवी नाल सापडली. आता सापडलेल्या वस्तूचा उपयोग करायला नको का ? म्हणून तिनं स्कूटर विकून घोडा घेतला.''

''केवळ नाल सापडली म्हणूनच म्हणतेस ?''

''हो हो नाल सापडली म्हणूनच'' ती ठसक्यात म्हणाली, ''अहो यु.जी.सी. च्या आर्थिक सल्लागार समितीवर आहे ती माझी मैत्रीण.''

एकदा अज्ञानकोशाचा निरोप घेऊन तिच्याकडे जावं लागलं. दार उघडं होतं. ते जोडपं गंभीरपणे

चर्चा करत होतं. प्राध्यापक बाई नवऱ्याला म्हणाल्या, ''अहो तुम्ही चार चार म्हशींचा चारा घोड्याच्या पाठीवरून आणता. ते मुकं जनावर किती ओझं सहन करणार तुमच्यासह ?''

''मग ?'' तो म्हणाला, '' मग मी पायी येत जाऊ म्हणतेस घोड्यासोबत ?''

'' छे हो. मी असं कसं म्हणेन तुम्हाला पायी यायला. येत जा तुम्ही घोड्यावर बसूनच. पण भारा तेवढा तुमच्या डोक्यावर घेत जा. तेवढाच त्याला आधार...'' अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका सांगत होत्या.

एकेकाचे दुर्दैव म्हणतात. पण म्या बापड्या एकट्याच्या दुर्दैवासारखे कित्येकांचे असावे. आता परवाचेच पहा ना !

मी बसमध्ये चढलो. जागा पण मिळविली. तीही खिडकीची. तेवढ्यात दोन मुलं शेजारी येऊन बसली. माझ्याकडला चौदा वर्षाचा तर पलीकडला बारा वर्षाचा असावा. मला बरे वाटले. प्रवासात बोलकी माणसं शेजारी बसली तर कानाला ओकारी येईल की काय अस्सं वाटायला लागतं. माझ्या जवळचा म्हणाला, '' आजोबा तुम्ही इकडनं बसा ना ! आम्हाला खिडकीकडून बसायला आवडतं.''

मी चमकलो व त्याला म्हणालो, ''बाळ ! मी म्हातारा माणूस. तंबाखू खात असतो. थुंकावं लागतं. म्हणून मला बसू दे खिडकीकडनं.''

कंडक्टर चढला तसा पलीकडनं बंट्या म्हणाला, '' पिंट्या, तुला उलटी आली तर खिडकीकडनं कर ! माझ्याकडे नको समजलास.''

शेजारचा उलटी करणारा आहे म्हटला की मला ओकारी यायला लागते. मी ताडकन उठलो. आणि शेजारच्या त्याच्याकडच्या बाकावर बसलो. खिडकी गेली.

गाडी सुरू झाली. पुढच्या गावाला गाडी बरीच रिकामी झाली. ती मुलं सतत फिदीफिदी हसत होती. मला वाटले पोरवय आहे. हसणार मुलं. मी डोळे मिटून घेतले व माझे बालपण आठवू लागलो. बंट्या आणि पिंट्याला वाटले असावे मी झोपलोय आणि ते बोलू लागले.

''नाही रे बंट्या, हे बरं नाही. ते आजोबा वयस्कर आहेत. त्यांना असं फसवायला नको होतंस तू'' पिंट्या म्हणाला.

''अरे हट'' बंट्या त्वेषाने म्हणाला, '' सगळ्या वयस्क माणसांना विमानातून नेऊन बिगर हवाई

छत्रीचे जमिनीवर आदळले पाहिजे.''

'' तसं नाही रे.'' पिंट्यानं वकिली केली. '' आई म्हणते मोठ्यांचा आदर करावा.''

''कोणत्या काळातली आहे रे तुझी आई ? हं ?'' बंट्यानं जोरदार सवाल केला, '' द्रोणाला थोर समजून अंगठा देऊन टाकलेल्या एकलव्याच्या की, शिवाजी आणि संभाजीतला फरक न कळालेल्या जिजाऊच्या.''

''तसं नाही रे'' पिंट्या आपल्या आईवर आलेल्या आळाला टाळण्यासाठी म्हणाला, ''आपल्यापेक्षा वयस्कांचा, निदान प्रौढत्व आलेल्यांचा आदर करावा असं सगळेच म्हणतात.''

''ते सगळे एकजात मूर्ख आहेत'' बंटी .

'' ते कसे ?'' पिंट्याने भाबडेपणाने विचारले.

''अरे कोणालाच कसे कळत नाही, की हे प्रौढ वयस्क एकजात चोर लुटेरे असतात.'' बंटी म्हणाला.

''पण ते कसे रे ?'' पिंट्याने पुन्हा प्रश्न केला.

''कसे म्हणजे ? कारगील गिळायला येणारा नवाज शरीफ काय युवक होता ?'' बंट्याने प्रतिप्रश्न केला.

''ते खरं रे'' पिंट्या पडते घेत म्हणाला, ''पण ....''

''काही पण बिण नाही. हे वयस्क होणारे काय खातील, काय ओरपतील, काय तोंडी लावतील, याचा काही नेम नाही आता !'' बंटीने दावा मांडला.

'' आणखी कुणाबद्दल बोलतोस तू ?'' आईवरचा ऐतिहासिकतेचा आळ गेला या समाधानात पिंट्याने विचारले असावे.

''कोणाबद्दल बोलू ?'' बंट्याचा त्वेष कायम होता. तो म्हणाला, '' तो साला सद्दाम हुसेन मुद्दामपणे कधी तोफगोळे तर कधी रणगाडे, कधी बाँबर विमान खातो. रोजची असंख्य. तो काय वयस्क नाही ?''

'' आहे. आहे.'' पिंट्याने दुजोरा दिला.

''आणि अमेरिकेचा बिल क्लिंटन वयस्क आहे की नाही ?'' बंटीचा प्रश्न.

'' आहे . पण त्याचे काय ?'' पिंट्याने भाबडेपणाने विचारले.

''काय म्हणजे अरे त्याने अख्ख्या जगाची शांती खाऊन टाकली. मोनिका लेवेन्स्कीला तोंडी लावत.'' बंटी बोलला.

‘‘अरे ते सगळे परदेशातले वयस्क. आपल्या भारतातील वयस्कांशी त्यांचा काय संबंध ?’’ पिंट्याने प्रतिवाद केला.

‘‘ भारतातले म्हणतोस ?’’ बंटी पुन्हा त्वेषाने बोलू लागला, ‘‘ तो वीरप्पन कोण आहे ? सांग आहे की नाही वयस्क ?’’

‘‘फोटो पाहिले मी वर्तमानपत्रातले. तो आहेच वयस्क.’’ पिंट्याने होकार दिला.

‘‘ मग तो कधी वन अधिकारी खातो, तर कधी पोलीस अधिकारी, कधी डॉक्टर तर कधी अॅक्टर. वरती चंदनरस पण ओरपतो म्हणतात.’’ बंटी म्हणाला.

‘‘चंदनरस म्हणजे देवलोकाच्या सोमरसासारखा असतो काय रे ?’’ पिंट्याचा भाबडा प्रश्न.

‘‘असेल नसेल.’’ बंटी अनिश्चिततेने म्हणाला, ‘‘कारण देवाला अमरत्व प्राप्त व्हायचे ते सोमरसाने नव्हे तर अमृताने. या वीरप्पनला चंदनरसाने भारतात अमरत्व मिळाले की तो वयस्क आहे म्हणून मिळाले यावर अजून संशोधन व्हायचे आहे.’’

‘‘वयस्क एवढे बदमाश असतात ?’’ □पिंट्या.

‘‘ असतात म्हणजे असतातच ते.’’ बंटी माहिती पुरवू लागला, ‘‘आपले वयस्कपण लोकांना कळू नये म्हणून ते कधी बाळ होतात तर कधी भैय्या. पण या बाळ आणि भैय्या झालेल्या वयस्कांनी अख्खी दगड□विटांची बाबरी मस्जिद खाऊन टाकली की नाही ?’’

‘‘हंऽऽ’’ दीर्घ सुस्कारा टाकीत पिंट्याने होकार दिला.

‘‘आणि बरं का पिंट्या !’’ बंट्याने दिलासा देत त्याला नवी माहिती पुरविली, ‘‘या अशा वयस्कांचे देखील वेगवेगळे वयोगट असतात.’’

‘‘ते कोणकोणते ?’’ पिंट्याची उत्सुकता ताणतच गेली.

‘‘अरे त्याची विभागणी संपूर्णपणे अपूर्णच असते. तरीपण बालयोगी, बृम्हचारी बुवा, विदेही वेडे हे बाल वयस्क असतात. सामाजिक व्यवस्थेच्या नावे जन्माला जात जोडणारे, राजे म्हणवत गर्दभ गर्जना करणारे नवपुढारी हे कुमार वयस्क असतात. सामान्यांना लुटण्यात सगळ्यांना संधी देत आमदारापासून ते मुख्यमंत्री होऊन चारा, सिमेंट, भूखंड वगैरे खात वरच्या नेत्यांना वेठीस धरू पाहणारे युवक वयस्क म्हणवतात.’’ बोलता बोलता बंट्या थांबल्याची संधी घेत पिंट्याने लगेच प्रश्न टाकला,

‘‘आणि बंट्या, युरीया खाणारे म्हातारे नरसिंग कोणत्या गटातले रे ?’’

‘‘हात लेका, ते नुसते युरीया खाऊन थांबले असते तर युवक वयस्कच राहिले असते. पण त्यांनी खासदार देखील खाल्ले. मात्र त्यांना ते पचवता आले नाहीत म्हणून ते प्रौढ वयस्क गटात मोडतात.’’

बंट्या म्हणाला.

''आणि समजा त्यांनी पचवले असते ते खासदार, तर राव कोणत्या वयस्क गटात मोडले असते ?'' पिंट्याचा पुन्हा प्रश्नच.

''तर ते 'अटल' वयस्क गटात मोडले असते !'' बंट्या ठामपणे बोलून पुढे म्हणाला, '' पण पिंट्या आता एक नवाच वयस्क जन्माला येतोय. त्याचा वयोगट माहीत नाही. पण तो आला वयस्कात की अख्खा देश खाऊन टाकील आपला....''

''कोण रे तो ?'' पिंट्या घाबरून विचारून गेला, ''नाव काय त्याचे ?''

''मी नाही सांगणार'' बंट्या म्हणाला, ''मला भीती वाटते. तो आधी मलाच खाऊन टाकील की काय !''

''सांग ना रे बंटी'' पिंट्या गयावया करीत म्हणाला, ''मी कुणालाच तुझं नांव कळू देणार नाही. प्लीज.''

''अरे तो वयस्क होऊ घातलेला आहे, असाच आपला एक आड (मूठ) वाणी'' बंट्या बोलला. तेवढ्यातच माझे गाव आले आणि मी गाडीतून उतरलो.

हे संभाषण ज्यांच्यात झाले ती भाबडी मुले कोण ? त्यांची खरी नावे, निदान ते ऐकणाऱ्याचे नाव मला कळले असते तर किती बरे झाले असते ! नाही ?

गोष्ट पुन्हा माझ्याच गावातली. माझ्या गावात एक धोंडा नावाचा माणूस रहात होता. धोंडा आमच्या पंचक्रोशीत गाजलेला पहेलवान. पहेलवान असूनही तो स्वभावाने नम्र होता. त्यातून त्याला माझ्या तांड्यात सर्वात जास्त जमीनजुमला होता. तांड्यातला खरा सुखी म्हणून त्याची गणना व्हावी असाच धोंडा होता तो.

माझ्या तरूणपणी असेच दिवस जात होते. कसे कुणास ठाऊक धोंड्याला दारूचे व्यसन जडले. तो खूप पिऊ लागला.

गावच्या लोकांना धोंड्याचे पिणे खटकू लागले. तांडा एकत्र आला. आणि त्यांनी आपले गाव 'गांधी गाव' करण्याचे ठरवले. बैठक ठरली. बैठकीला धोंडा पण आला. अर्थात तो पिऊनच होता.

निवेदकाने निवेदन केले, ''भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी झिजलेल्या गांधींनी 'नशाबंदी'

आवश्यक मानली होती. त्यांच्या गुजरातेत नशाबंदी आहे. म्हणून त्याला 'गांधीराज्य' म्हणतात. आपल्या महाराष्ट्रातही गांधी जेथे राहिले त्या वर्धा जिल्ह्यात नशाबंदी आहे म्हणून त्याला 'गांधी जिल्हा' म्हणतात. अशा या थोर गांधींच्या शिकवणीप्रमाणे आपले गाव 'गांधी गाव' व्हावे असा ही बैठक निर्णय घेत आहे. यापुढे गावात कोणीही दारू पिणार नाही असे आपण ठरवूया. बोला, जो दारू पिईल त्याला काय दंड करायचा ? तुमचे तुम्हीच सांगा.''

''मी पिलो तर एक शंभर रुपये दंड देईन.'' एकजण म्हणाला.

''मी पिलो तर अडीचशे रुपये दंड देईन.'' दुसरा म्हणाला.

हा आकडा वाढतच गेला. लोक साडेसातशे रुपयांपर्यंत गेले. पिऊन आलेला धोंडा उठून उभा राहिला व म्हणाला, '' मी पिलो तर एका वेळेला हजार रुपये दंड देईन.''

पंचांच्या बैठकीने ज्याचे त्याचे आकडे लिहून घेतले, आणि निर्णय घेतला, ''जो पिणार त्याच्याकडून कबूल केल्याप्रमाणे दंड वसूल केला जावा. आणि एखाद्याने पिल्याची बातमी दिली तर त्याला त्याच्या दंडातून २५ % म्हणजे एक चतुर्थांश रक्कम बक्षीस दिली जावी.''

चार दिवस झाले. गाव 'गांधीग्राम' म्हणून कोरडा राहिला. पाचवे दिवशी धोंडा पिऊन तांड्यात आला. एकाने बातमी दिली. पंचायत जमली. पंच मिळूनच धोंड्याकडे गेले. धोंडाने दंडाची रक्कम काढूनच ठेवली होती. ती पंचाला दिली. ती घेऊन पंचांनी धोंडाला परत न पिण्याची समज दिली. अडीचशे रुपये बातमी देणाऱ्याला दिले. आणि जो तो आपापल्या घरी गेला.

दुसरे दिवशी धोंडा पुन्हा पिऊन आला. एकाने बातमी दिली. पंच त्याचे घरी गेले. त्याने दंडाचे हजार रुपये काढून ठेवलेलेच होते. ते पंचांना दिले. बातमी सांगणाऱ्याला अडीचशे रुपये देऊन पंच आपापल्या घरी गेले.

असे चार दिवस गेले. पाचवे दिवशी धोंडा स्वत:च पंचाच्या नायकाकडे गेला. म्हणाला, '' मी दारू पिलो आहे. हे साडेसातशे रुपये घ्या. मीच बातमी दिल्यामुळे माझे अडीचशे रुपये एक हजार रुपयांतून कापून घेतले आहेत.''

मी नायकाकडेच बसून होतो. मला शेख चिल्लीची गोष्ट आठवली.

म्हणतात, ''शेख चिल्लीकडे एक गाढव होतं. ते फार देखणं आणि उमदं जनावर होतं.

गाढवपणाची सगळी चांगली लक्षणं त्यात होती. ते खाऊन झालं की उकिरड्यावर व्यवस्थित लोळून यायचं. आणि कधीही गढूळ पाणी प्यायचं नाही. शेख चिल्ली त्याच्यावर खूप माया करायचा. पण एक गोष्ट होती, त्याला कामाला लावायला गेला की ते उलट होऊन लाथा झाडायचं. ते गाढव शेख चिल्लीच्या बायकोला मुळीच आवडेनासं झालं. शेवटी शेख चिल्ली ते गाढव विकायला बाजारात गेला.

ते गाढव होतंच देखणं. गिऱ्हाइक यायचे. भाव सांगायचे. शेख चिल्ली त्याचे सगळे गुण सांगायचा. आणि रक्कम घेताना म्हणायचा, ''एक आहे राव ! हे गाढव आहे देखणं, उमदं. याला खायला खूप आणि चांगलं लागतं. पण हे काम मात्र काही करत नाही.'' गिऱ्हाइक ते ऐकून निघून जायचा.

हा सगळा प्रकार त्या ढोर बाजारातला एक दलाल पाहात होता. तो शेख चिल्लीकडे आला आणि त्याने त्याला विचारले, ''हे गाढव तुम्हाला नक्की विकायचंय ना ? ''

''हो. नक्की विकायचं.'' शेख चिल्ली म्हणाला.

''ठीक तर. मी ते विकून देईन. तुम्हाला शेवटच्या गिऱ्हाइकानं किती रुपये याचं मोल सांगितलं ?''

''साडेचार हजार.'' शेख चिल्ली म्हणाला.

''ठीक आहे. मी हे गाढव सहा हजाराला विकीन. आणि एक चतुर्थांश रक्कम दलाली म्हणून घेईन. मात्र अट एक. तुम्ही दूर उभं रहायचं आणि काही एक बोलायचं नाही.''

शेख चिल्ली कबूल झाला.

दलाल गिऱ्हाइकांना सांगू लागला, ''हे गाढव देखणं आहे. जनावर उमदं आहे. याला खायला देखील फारसं काही लागत नाही. आणि कामाला तर हे गाढव फारच जबरदस्त आहे. हे दहा गाढवांचं काम एकटंच करतं.''

गिऱ्हाइकं वाढत गेली. शेवटी एक गिऱ्हाइक आलं. त्याने दलालाच्या हाती सहा हजार रुपये ठेवले आणि तो गाढव घेऊन निघाला. शेख चिल्ली दूर उभा राहून दलालाच्या गोष्टी ऐकत होता. सगळं पहात होता. गिऱ्हाइक गाढव नेताना पाहून तो धावत आला आणि म्हणाला, ''छट् ! हे गाढव एवढं चांगलं आहे हे मला माहीत नव्हतं. आता मला ते विकायचं नाही.''

शेख चिल्लीने दलालीचे दीड हजार रुपये आपल्या खिशातून काढून दलालाला दिले. आणि आपले गाढव घेऊन तो घरी परतला.

मला एक अजूनपर्यंत कळलेले नाही की, शहाणा कोण ? धोंडा की शेख चिल्ली ? तुमच्यापैकी कोणाला कळल्यास कृपया कळवावे.